|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १३ अंक : १२ सोमवार दि. ३१ मार्च २०२५ ते रविवार दि. ६ एप्रिल २०२५ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड


## प्रेमाच्या त्रिकोणाने मनात काहूर उठवले दुसरीसाठी त्याने पहिलीला मार्गातून हटवले

म्हापसा (गोवा)/क्राईम रिपोर्टर

अनैतिक संबंधात सेक्स हीच महत्वाची गरज असते. त्या गरजेपोटी विवाहित किंवा घटस्फोटीत महिला पुरुष एकत्र येतात, परंतु असे संबंध फार काळ टिकत नाहीत. शिवाय अशा संबंधातून कधी कधी विपरीतही घडू शकते. दिल्लीतील राहुल महेश्वरी याने सोशल मिडियावरून खांडवा येथील भावना या घटस्फोटीत महिलेला पटवले होते. थोडे दिवस तिच्या सोबत मजा मारून झाल्यावर त्याने रश्मी नावाच्या दुसऱ्या एका घटस्फोटीत महिलेला पटवले. त्यामुळे प्रेमाचा त्रिकोण तयार झाला. ...पान २ वर

## सततच्या लैंगिक अत्याचाराने तिचे मन विटले संतापलेल्या मुलीने सावत्र बापाचे गुप्तांग छाटले

नालासोपारा/क्राईम रिपोर्टर





बाप लेकीचे नाते हे पवित्र नाते असते. बाप भलेही सावत्र असला तरी त्याने सावत्र मुलीला आपल्या पोटच्या पोरीप्रमाणे वागवायचे असते. कारण ज्या महिलेने त्याच्याशी पुनर्विवाह केलेला असतो तिची हीच अपेक्षा असते कि ज्याच्याशी आपण नव्याने संसार मांडतोय त्याने आयुष्यभर आपली आणि आपल्या मुलांची काळजी घ्यायला हवी. अर्थात काही लोक आपल्या दुसऱ्या पत्नीचा आणि तिच्या मुलांचा चांगल्या प्रकारे सांभाळ करतात. पण सगळेच सावत्र बाप तसे नसतात. काही सावत्र बाप आपल्या सावत्र मुलांना अत्यंत वाईट वागणूक देतात. मुलगी वयात आली कि त्यांची पापी नजर आपल्या सावत्र मुलीवर पडते आणि मग तिच्याशी लगट करणे, अश्लील चाळे करणे आणि पुढे पुढे तर त्या सावत्र मुलीचे लैंगिक शोषण करणे असे प्रकार सुरु होतात. अशा वेळी मुलीच्या आईची मजबुरी असते. तिला हे सर्व सहन होत नसले तरी नाईलाजाने गप्प राहावे लागते. आणि आपल्या नवऱ्याकडून आपल्या पोटच्या पोरीचे होत असलेले लैंगिक शोषण उघड्या डोळ्यांनी पाहावे लागते. अशावेळी प्रतिकार करण्याची इच्छा असूनही ती नवऱ्याला रोखू शकत नाही. कारण तिचे शारीरिक बळ आणि मानसिक इच्छाशक्ती कमी पडते. समाजात अशा अनेक दुर्दैवी महिला आहेत ज्यांना हे सर्व नाईलाजाने सोसावे लागते. कारण त्या मानसिकदृष्ट्या हतबल असतात. आणि तीच परिस्थिती त्यांच्या मुलीची असते. सावत्र बापाकडून होणारे शारीरिक अत्याचार काही मुली निमुटपणे सहन करीत असतात. पण नालासोपाऱ्यातील एका मुलीने मात्र धाडस दाखवले. बापाकडून होणाऱ्या शारीरिक अत्याचारामुळे संतापाच्या आगीत होरपळणाऱ्या एका मुलीने रागाच्या भरात चक्क अत्याचारी निर्लज्ज बापाचे गुप्तांग छाटले आणि त्याला जन्माची अद्दल घडवली. यात गंभीर जखमी झालेल्या बापाला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, तर आरोपी मुलीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या घटनेने नालासोपारा पूर्वेच्या संतोषभवन परिसरात खळबळ माजली आहे.

नालासोपारामधून सावत्र वडिलांकडून होणाऱ्या लैंगिक अत्याचाराला कंटाळून तरुणीने वडिलांवर चाकूने हल्ला केल्याची सांतापजनक घटना समोर आली आहे. सावत्र बापाकडून वारंवार होणारे अत्याचार याला कंटाळून तरुणीने सावत्र वडिलावर चाकूने हल्ला करत त्याला जखमी केल्याची घटना नालासोपाऱ्यामध्ये घडली आहे. या मुलीने तिच्या सावत्र बापाच्या गुप्तांगावर आणि संपूर्ण शरीरावर चाकूने वार केल्याने आरोपी वडील गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. नालासोपारा पूर्वच्या बावशेत पाडा परिसरात ही घटना घडली आहे. सावत्र बापाने आपल्यासोबत दुष्कर्म केल्याचा आरोप त्या तरुणीने केला आहे. त्यामुळेच संतापलेल्या मुलीने चाकूने सावत्र बापाच्या शरीरावर आणि गुप्तांगावर वार करून त्याला जखमी केलं. संतोष भवनच्या बावशेत पाडा येथील एका चाळीत काल (सोमवारी, ता २५) दुपारी सावत्र वडिलांकडून होणाऱ्या लैंगिक अत्याचाराला कंटाळून तरुणीने वडिलांवर धारदार चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी मुंबईच्या शताब्दी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी तुळींज पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पीडित मुलीच्या आईने दुसरं लग्न केले होतं. तिचे सावत्र वडील रमेश भारती हे दोन वर्षापासून तिच्यावर अत्याचार करत होते. सोमवारी देखील त्यांनी तिच्यावर शरीरसंबंध ठेवण्यासाठी दबाव टाकला होता. त्यानंतर तिने हल्ला करण्याचं ठरवलं. शरीरसंबंध ठेवण्यासाठी लाज वाटते, असे सांगून तिने तिच्या वडिलांच्या डोळ्यांवर पट्टी ...पान २ वर

## दोघांचे भांडण फार विकोपाला गेले दारुड्या पतीने पत्नीलाच ठार केले







सांगली/क्राईम रिपोर्टर

दारुड्या माणसाला किती जरी समजावले तरी तो ऐकत नाही. मात्र त्याचे दारूचे व्यसन कुटुंबासाठी तापदायक ठरलेले असते. दारूमुळे अनेकांचे संसारही उध्वस्त झाले आहेत. सांगलीच्या शिरला तालुक्यातील मांगले येथील मंगेश कांबळे याचेही तसेच झाले होते. मंगेशला दारूचे व्यसन लागल्याने तो काही कामधंदा करीत नव्हता. उलट पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेवून तिला मारहाण करीत असायचा एकेदिवशी असेच पती-पत्नीचे भांडण झाले हे भांडण इतके विकोपाला गेले कि चिडलेल्या मंगेशने साडीने पत्नीचा गळा आवळून तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी त्याला अटक केली आहे, त्याच्या या कृत्यामुळे त्याची दोन मुले मात्र उघड्यावर पडली. कारण आईचा खून झाला आणि बाप तुरुंगात गेला.

शिराळा तालुक्यातील मांगले वारणानगर रस्त्यावरील रामचंद्र वाघ याच्या भाडयाच्या घरात निलेश कांबळे आणि त्याची आई राहयला आहेत. निलेश याचा भाऊ मंगेश आणि त्याची पत्नी प्राजक्ता हे दोघे ही मुंबई येथे एका खाजगी ठिकाणी कामाला आहेत. मंगेश आणि प्राजक्ताच्या लग्नाला १० वर्ष झाली होती. त्यांना सध्या ६ वर्षाचा शिवम आणि ३ वर्षाची शिवकन्या अशी दोन अपत्ये आहेत. अधून मधून दोघे नवरा बायको मुलांना घेऊन गावी मांगले येथे येथ होते. मुंबई येथे असताना मंगेश याला दारूचे व्यसन लागले होते. त्याच्या कामाचे सगळे पैसे तो दारूतच उधळत होता. त्यामुळे त्याची व प्राजक्ताची रोज भांडणे होत होती. त्या बिचारीला संसार चालविणे अवघड झाले होते. दोन मुलाचा खर्च घरखर्च चालविता चालविता तिला नाकी नऊ आले होते. मंगेश हा घरात खर्चाला पैसे देत नव्हता. सगळी कमाई दारूत खर्च करीत होता. या कारणातून नवरा बायकोची भांडणे वाढीस लागलेली होती. तिने या विषयी आपल्या माहेरी आई वडिल भावाला सांगितले होते की नवरा रोज दारु पिऊन मारहाण करतो. त्यामुळे जीव नकोसा झालेला आहे. काही केल्या तो ऐकत नाही. दारू पिण्याचे सोडत नाही. दारू पिल्यानंतर तो जनावरा सारखा वागतो. त्याचे घराकडे संसाराकडे मुलाबाळाकडे लक्ष नाही. घरात काय पाहिजे काय नको हे तो पाहत नाही अशी तक्रार तिने आपल्या माहेरच्या लोकाकडे केली होती. ...पान २ वर

## गुन्हेगारांच्या नादी लागून फसला लक्ष्मण अखेर जीव गमावून बसला

नाशिक/क्राईम रिपोर्टर



एकदा का माणसाचे चुकीच्या मार्गावर पाऊल पडले कि मग तो सहसा मागे वळून पाहत नाही. नाशिकच्या सप्तशृंगी मंदिर परिसरात राहणाऱ्या लक्ष्मण याचेही तसेच झाले होते. तो गुंड प्रवृत्तीच्या लोकांमध्ये राहू लागला आणि त्यांच्या सारखाच गुन्हेगार बनला. मात्र गुन्हेगारांची सांगत म्हणजे असंगाशी संग आणि आयुष्याचा भंग लक्ष्मण ज्यांच्या नादाला लागला होता. त्यांनीच एके दिवशी त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

कुसंगतीचा परिणाम हा नेहमी वाईटच होतो, त्यामुळे वाईटाची संगत करू नये, असे लोक सांगतात. पण अलिकडे चांगल्याची संगत करण्यापेक्षा वाईटासाबेत फिरणेच काही तरूणांना चांगले वाटते. कारण गुन्हेगारीने दहशत माजवता येते. काही काम न करता आयते खायला प्यायला मिळते असा समज काहीजणांचा असतो. पण हे काही खरे नाही. एक ना एक दिवस वाईटाचे फळ भोगण्याची वेळ येते. तेव्हा मात्र वेळ निघून गेलेली असते. नाशिक जिल्ह्यातील एका तरूणांबाबत असेच घडले. ते गुंड आहेत हे माहित असूनही त्याने त्या तरूणांशी मैत्री केली होती. नंतर त्यांच्यात किरकोळ वाद ...पान २ वर

## सुट्ट्या पैशांसाठी गल्ला उघडणे प्राणघातक ठरले दोघा गर्दुल्ल्यांनी पाणीपुरीवाल्याला ठार मारले



लातूर/क्राईम रिपोर्टर

चरसी गर्दुल्ले पैशांसाठी काहीही करू शकतात. त्यामुळे अश्या लोकांपासून सावधगिरी बाळगणे गरजेचे असते. मात्र लातूर मधील पाणी पुरीवाल्याला हेच कळले नाही. त्याने पाणी पुरी खाण्यासाठी आलेल्या दोन गर्दुल्ल्यासमोर सुट्टे ५ रुपये देण्यासाठी गल्ला उघडला. मात्र गल्यावर नजर पडताच ग्राहक म्हणून आलेल्या त्या दोन गर्दुल्ल्यांची नियत फिरली आणि त्यांनी पाणीपुरीवाल्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.




उत्तर प्रदेश राज्यातील घिलौर ता. नंदीगाव जि. जालोन येथील मनिष रुपसिंग पाल (वय २० वर्षे) हा गेल्या सहा-सात महिण्यापुर्वी लातूरात व्यवसायासाठी आला होता. लातूर शहरातील हरंगुळ रेल्वे स्टेशन परीसरात त्याचे मावशी आणि काका राहत होते. आई-वडिलाला एकुलता एक असलेल्या मनीष पाल यांनी मोठे स्वप्न उराशी बाळगून कमाई करण्याच्या हेतूने लातूर गाठले होता. हरंगुळ रेल्वे स्टेशन समोर आसलेल्या समर्थ नगर, हरंगुळ (बु)



परिसरात असलेल्या दादामिया शेख यांच्या घरात तो भाड्याने राहू लागला. हरंगुळ रेल्वे स्टेशन समोर असलेल्या पाण्याच्या टाकीजवळील चौकात एका झाडाखाली त्यांने नयना पानपुरी नावाने गाडा लावून पानपुरी विकण्याचा व्यवसाय सुरू केला. सुरुवातीला मनीष पाली याचा पानपुरीचा व्यवसाय म्हणावा तितका ...पान ६ वर

## सासऱ्याला लागला होता सुनेचा लळा अडथला ठरणाऱ्या मुलाचा दाबला गळा

नंदूरबार/क्राईम रिपोर्टर

अनैतिक संबंधात वासनेने पछाडलेले स्त्री-पुरुष स्वतःच्या सुखासाठी कोणत्याही थराला जावू शकतात. अशावेळी त्यांच्या अनैतिक संबंधात अडथला ठरणाऱ्याचा जीव घ्यायलाही ते मागे पुढे पाहत नाहीत. आजवरच्या घटना पहाता अनैतिक संबंधात अडकलेल्या काही विवाहितांनी प्रियकरासाठी पोटच्या पोराचाही जीव घ्यायला मागे पुढे पहिले नाही. नंदुरबारमध्ये सुनेबरोबरच्या अनैतिक संबंधामुळे एका इसमाने चक्क आपल्या मुलाचा बळी घेतला. या प्रकरणी आरोपी बापाला अटक करण्यात आली आहे.

सुनेसोबत असलेल्या अनैतिक संबंधात अडसर येणाऱ्या मुलाचा गळा दाबून खून केल्याची घटना अक्कलकुवाच्या मंडारा येथे घडली आहे. याबाबत मयत मुलाचा बाप आणि पत्नीविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुकलाल वसावे असं मयताचे नाव असून ते ३२ वर्षाचे होते. गुन्हा दाखल झालेल्या संशयितांमध्ये ईश्वर वसावे आणि मयताची पत्नी यांचा समावेश आहे. पोलीस सूत्रांनुसार, सुकलाल यांची पत्नी आणि सुकलालचा बाप यांच्यात अनैतिक संबंध होते. या संबंधांना सुकलाल अडसर येत असल्याने त्याचा काटा काढण्याचे दोघांनी ठरवले. २४ मार्च रोजी घरात कुणी नसताना दोघांनी सुकलाल याचा गळा दाबून खून केला. त्यानंतर त्याच्या मृत्यूचा बनाव रचला. सुकलालच्या ...पान २ वर

## पैशांवरून दोघांमधील वाद वाढला प्रेयसीने प्रियकराचा काटा काढला



दहिवडी/क्राईम रिपोर्टर

काही बायका आपल्या सौंदर्याचा वापर करून एखाद्याला प्रेमाच्या जाळ्यात अडकवतात आणि त्याच्याकडून सतत पैसे काढीत असतात आणि त्याने नकार दिला तर त्याला ब्लॅकमेल करायला सुरुवात करतात. नरवणे गोंदवले येथील योगेश पवार या तरुणालाही रोशनी नावाच्या तरुणीने आपल्या नादी लावले होते. पण योगेशच्या घरच्यांना आणि नंतर योगेशलाही तिची असलीयत समजली तेंव्हा तो तिच्यापासून दूर राहू लागला. कारण तिने आणि तिच्या आईने यापूर्वीही काही लोकांना अशाच प्रकारे फसवले होते. त्यामुळे योगेश सावध झाला आणि तिच्यापासून दूर राहू लागला. योगेश आपल्या पासून दूर राहतोय पैसेही देत नाही हे पाहून रोशनीने त्याला ब्लॅकमेल करायला सुरुवात केली, पण तो घाबरला नाही. त्यामुळे तिने आपली आई आणि इतर साथीदारांच्या मदतीने योगेशचा खून केला व मृतदेह गाडीसह कालव्यात टाकून अपघाताचा बनाव केला. पण पोलिसांनी तिचा बनाव हाणून पडला व तिच्यासह सर्व आरोपींना अटक केली.

योगेश सुरेश पवार हा नरवणे गोंदवले ब्रुदक येथे आपल्या परिवारासह राहयला आहे. मंगळवार दि.१८ मार्च रोजी त्याच्या मोबाईलवर एक फोन आला. त्या दिवशी संध्याकाळी तो जो घरातून बाहेर गेला तो घरी परत आला नाही. त्याच्या घरच्या लोकांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न ...पान ६ वर



## विकृत नराधमाचे डोके फिरले मित्राच्या मुलालाच ठार मारले




मुंबई/क्राईम रिपोर्टर

माणसाच्या मनात कधी काय येईल आणि रागाच्या भरात तो काय करील हे सांगता येत नाही. कांदिवलीत अशीच एक घटना समोर आली आहे. फुटपाथवर झोपलेल्या एका महिलेच्या ४ वर्षाच्या मुलाचे अपहरण करून नंतर त्याची हत्या करणाऱ्या एका नराधमाला पोलिसांनी सुरत मधून अटक केली आहे. विशेष म्हणजे चिमुकल्याचा जीव घेणारा हा नराधम त्या मुलाच्या बापाचा मित्र आहे. त्यामुळे मित्राच्या मुलाला या नराधमाने का मारले याचा आता पोलीस तपास करीत आहेत.

कांदिवलीमध्ये चार वर्षांच्या चिमुकल्याची हत्या करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी सुरतमधून अटक केली आहे. ...पान २ वर

## आईवरचा राग मुलीच्या प्राणावर बेतला शेजाऱ्याने चिमुरडीचा नाहक जीव घेतला





पनवेल/क्राईम रिपोर्टर

कर्जबाजारी माणूस कर्ज देणाऱ्यांच्या वसुलीच्या तगाद्याला कंटाळला कि त्याचे जगणे मुश्कील होते. अशातच त्याचा कुणाशी वाद झाला तर तो आणखी चिडखोर बनतो. नवी मुंबईतील तळोजा येथे अशीच एक भयंकर घटना घडली आहे. ऑनलाईन गेमिंगमध्ये हरल्यामुळे कर्जबाजारी झालेल्या मोहम्मद मजीर अन्सारी याने चक्क शेजाऱ्याच्या २ वर्षाच्या मुलीचे अपहरण करून तिच्या बापाकडून खंडणी मागण्याचा कट रचला. त्यातच त्या मुलीच्या आईचे आणि मोहम्मद अनसारीच्या बायकोचे भांडण झालेले होते याचाही राग त्याच्या मनात होता. त्यामुळे त्याने शेजाऱ्याच्या मुलीचे अपहरण तर केले पण त्याला खंडणी मागण्याचे धाडस काही झाल नाही. त्यामुळे त्याने त्या मुलीची हत्या केली. मात्र त्याच्या या पापाला अखेर वाचा फुटली आणि पोलिसांनी त्याला अटक केली.

महाराष्ट्रात एक थरकाप उडवणारी घटना घडली आहे. नवी मुंबईतील तळोजा परिसरामधून बेपत्ता झालेल्या चिमुकलीचा मृतदेह तिच्याच घरातील बॅगेत सापडला आहे. या घटनेमुळे ...पान २ वर

31 MARCH TO 06 APRIL 2025 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 3/29/2025 8:45 PM Page 1



पान १ वरून...

## प्रेमाच्या त्रिकोणाने मनात काहूर...

मात्र राहुल याला रश्मी अधिक आवडायची त्यामुळे त्याने रश्मी हिच्याशीच लग्न करण्याचा निर्णय घेतला. पण भावनाचा या लग्नाला विरोध होता. अखेर रश्मी व राहुल यांनी भावनाचा काटा काढण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी तिला गोव्यातील नेहमीच्या हॉटेलवर बोलावले. तिला दारू पाजली आणि नंतर दोघांनी मिळून तिची गळा दाबून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे. गोव्यात बाहेरून राज्यातील पर्यटक म्हणून बरेच जण येत असतात.जे पर्यटक वारंवार येत असतात ते नेहमी एकाच हॉटेलात उतरत असतात त्यामुळे त्याची ओळख पटविणे फारसे अवघड नसते. मध्यप्रदेशातील खांडवा येथील भावना तोमर ४० वर्षीय महिला वारंवार गोव्यात येत होती. ती गोव्यात आली म्हणजे कळगुंट बीच वरील एकाच हॉटेलात नेहमी मुक्काम राहत असे. प्रत्येक वेळी तिच्याबरोबर तिचा प्रियकर राहुल माहेश्वरी ही असायचा. राहुल माहेश्वरी हा दिल्लीतील होता. त्याची आणि भावना हिची ओळख सोशल मिडियावरून झाली होती. त्यातून त्याची मैत्री जमली, पुढे मैत्रीचे प्रेमात रूपांतर झाल्यावर ते दोघे नेहमीच गोव्याला मजा मारण्यासाठी येवू लागले. भावना हिचा विवाह गेल्या काही वर्षापूर्वी झालेला होता. तिला तिच्या नवऱ्यापासून एक मुल ही होते. त्याचा संसार बहरत फुलत असताना भावना आणि तिच्या नवऱ्याचे कोणत्या ना कोणत्या कारणातून खटके उडू लागले.त्यातून त्याची भांडणे विकोपाला गेल्यावर त्या दोघांनी ही कोर्टातून घटस्फोट घेतला. भावना ही सोशल मिडियावर नेहमी सक्रिय राहात होती. सोशल मिडियावरूनच तिची ओळख राहुल माहेश्वरी याच्या बरोबर झाली. राहुलने ही आपल्या पत्नीला सोडून दिलेले होते. त्याला ही दोन मुले होती. त्याच्यात आणि त्याच्या पत्नीत नेहमी भांडणे होत असल्याने त्याने ही तिच्यापासून घटस्फोट घेतलेला होता. राहुल आणि भावना हे तसे समदु:खीच होते. एकमेकाची भावना समजून घेताना दोघे ही जवळ आले होते. भावना ही मध्यप्रदेशातील इंदोर येथे हॉस्पिटल मध्ये वैद्यकीय साहित्य पुरविण्याचे काम करीत होते. तेथे तिला चांगला पगार आणि भत्ते ही होते. तसेच राहुलचे ही होते. तो दिल्ली येथील एका कंपनीत चांगल्या ठिकाणी कामाला होता. त्यामुळे दोघांची ही परिस्थीती तशी सधनच म्हणावी लागेल. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाल्यावर दोघे ही मौज मजा करण्यासाठी गोव्यात येत होते. गोव्यात येवून चार पाच दिवस राहून दोघे ही एकमेकांची गरज पुर्ण करून मस्त जगत होते. तसे दोघांना ही त्याची गरज असल्याने दोघे ही आपली ती गरज पुर्ण करण्यासाठी त्यांनी गोव्या सारखे निर्सग रम्य ठिकाण निवडले होते. ते दोघे ही गोव्यात आले की, कळगुंट मधील एका नेहमीच्याच हॉटेलमध्ये उतरत असल्याने हॉटेलमधील वेटरपासून मॅनेजर पर्यत सर्वजण त्या दोघांना ही ओळखत होते. अलिकडे मात्र राहुल हा भावनाला भेटण्याचे आणि तिच्याशी संपर्क करण्याचे टाळत होता.याला कारण ही तसेच होते. राहुलला सोशल मिडियावर अजून एक मैत्रिण भेटली होती. सोशल मिडियावर तो चॅटिंग करीत असताना तिची त्याची ओळख झाली होती. तिचे नाव रेश्मी सुरेंद्र सोळंखी असे होते. ४३ वर्षीय रश्मी ही ४० वर्षीय राहुलच्या प्रेमात पडली.तशी रश्मी ही घटस्फोटीतच होती. तिने ही आपल्या नवऱ्यापासून घटस्फोट घेतलेला होता. तिला ही एक मुल होते.सोशल मिडियावरू न राहुलने अजबच प्रेमाचा त्रिकोण साधलेला होता. रश्मी ही भावना तोमार पेक्षा दिसायला सेक्सी आणि मादक असल्याने राहुल तिच्या प्रेमांत आकंठ बुडालेला होता. टंच अशा रश्मीला तो सोडू इच्छित नव्हता. भावनाच्या माघारी तो तिला ही त्या कामासाठी गोव्यात घेऊन येत होता. गोव्यात ते दोघे आले म्हणजे कुळगुंटमधील त्या हॉटेलातच ते राहत होते. रश्मी ही मध्यप्रदेशातील इंदोर येथील होती. ती ही एका कंपनीत जॉब करीत असल्याने तिला ही चांगला पगार होता. वयाच्या ३५ ते ४० शीत महिलांना सेक्सची आधिकच गरज असते म्हणून त्या जोडिदाराच्या शोधात असतात त्यातच घटस्फोट झालेल्या महिलांना सेक्सबाबत आवर घालणे जास्तच कठिण जात असल्याने त्यांना तो जोडिदार पाहिजेच असतो नेमकी हिच गरच राहुल माहेश्वरी याने भावना आणि रश्मीच्या बाबत शोधली होती. तो दोघीना ही खेळवत होता. त्यातून त्याची ती गरज तर पुर्ण होत होती. मादक सेक्सी आणि टंच अशा रश्मी सोबत त्याला लग्न करावेसे वाटत होते. तसे त्याने तिला बोलून ही दाखविले होते. तिने ही त्याचे लग्नाचे प्रपोज मान्य केले होते परंतु तिला ही राहुल भावनाबरोबर रिलेशनशीपमध्ये असल्याचे कळाल्याने तिने अगोदर भावना हिला समजावून सांग असे राहुलला सांगितले होते कारण राहुलचे आणि भावनाच्या अंतरंग क्षणाचे पुरावे भावनाजवळ असल्याने ती त्या दोघांच्या लग्नात अडसर ठरू शकते याची तिला कल्पना होती. तसे ते दोघे ही भावनाला भेटले होते. आम्ही दोघे ही लवकरच लग्न करणार आहोत असे त्यांनी भावनाला सांगितले होते. परंतु भावनाने राहुलला धमकी देवून सांगितले की, तु जर रश्मीबरोबर लग्न केलेस तर मी तुला सोडणार नाही. त्याचे गंभीर परिणाम त्याला भोगावे लागतील असे ही तिने त्याला धमकी दिलेली होती. आता काय करायचे असा प्रश्न रश्मी आणि राहुल याच्या समोर होता.आपल्या मार्गातून भावनाला बाजुला काढले तरच त्यांना लग्न करता येणार होते हे त्या दोघांना ही माहित होते. यातच भावना ही राहुल याला वारंवार भेटायला बोलवित होती. पण तो काही तिला भेटायला येत नव्हता.अलिकडे तर त्याने तिचा फोन घेणे ही बंद केले होते. म्हणून भावनाने त्याला व्हाईस मेसेज करून सांगितले की, त्याने जर तिच्याशी गद्दारी केली तर गाठ तिच्याशी आहे.तो रश्मीशी कसे लग्न करतो हेच तिला पाहयचे होते. प्रेमाचा त्रिकोण असा होता की एकाची कात्री दुसऱ्यात अडकत होती. त्यामुळे राहुल आणि रश्मी यांना ही काही करता येत नव्हते. लग्न करण्यासाठी त्या दोघांनी आता एक वेगळाच प्लॅन केला.आपल्या मार्गात अडसर ठरणाऱ्या भावनालाच संपवून टाकण्याचा त्यांनी निर्धार केला. ८ मार्चला भावना हिने आपण गोव्यात कळगुंट येथे आलो असल्याचे सांगून राहुल याला तेथे भेटायला बोलाविले. भावना गोव्यात गेली आहे हे राहुल याला समजताच त्याने याची माहिती रश्मी हिला दिली. तसे त्या दोघांनी प्लॅन करून इंदोर येथून १४ मार्चला गोवा गाठले. गोव्यात ते ज्या हॉटेलमध्ये भावना उतरली होती तेथे दाखल झाले. हॉटेलमधील त्या रुममध्ये त्या तिघांनी ही ड्रिंक आणि जेवणाची पार्टी केली. भावनाला त्यावेळी नशेत सेक्सची भावना झाल्याने ती राहुल याला आपल्या अंगावर ओढून घेऊ लागली. पण मध्येच रश्मीने आधी आमच्या लग्नाला परवानगी दे. मगच राहुल तुझ्यासोबत सेक्स करेल असे सांगितले परंतु कोणत्या ही परिस्थीती भावना ही त्यांच्या लग्नाला परवानगी दयायला तयार होईना. त्या दोघांनी तिची खुप समजुत घातली. तसे ते तिघे ही दारूच्या नशेत तर्र असल्याने कुणी ही कोणाचे काही ऐक ऐकत नव्हते. भावनाला सेक्स पाहिजे होता. म्हणून ती राहुलला सोडयाला तयार नव्हती. तर रश्मीला राहुल कायमच पाहिजे होता म्हणून ती लग्नासाठी आडून होती. दारूच्या नशेत असणाऱ्या भावना आणि रश्मी यांनी राहुलवरून भांडायला सुरूवात केली. हॉटेलमधील त्या रुममध्ये त्याची वादावाद सुरू होती. त्या वादात राग अनावर झाल्याने रश्मीने भावनाचा गळा आवळून धरला. तसे राहुलने ही तिला मदत करीत भावनाचा त्याने ही गळा जोरात आवळून धरला. त्या दोघांच्या ताकदीपुढे भावनाची ताकद कमी पडली. क्षणार्धात तिची हालचाल मंद झाली तिचा श्वासो श्वास बंद पडला. तिचा जागीच मृत्यू झाला. ती हॉटेलच्या त्या रुममध्ये बेडवरून खाली पडली. तिच्या डोक्याला थोडे फार लागले ही. तिचा आपल्या हातून खून झाला आहे हे रश्मी आणि राहुलच्या लक्षात आल्यावर दोघांनी तिचा मृतदेह तेथेच टाकून तिची बॅग आणि मोबाईल घेऊन अर्ध्या रात्री त्या हॉटेलमधून पळ काढला. तेथून रश्मी ही इंदोरला गेली तर राहुल हा दिल्लीला पळाला. दुसऱ्या दिवशी त्या रुमचा दरवाजा उघडला नसल्याने वेटरने याची माहिती मॅनेजरला दिली. मॅनेजरने येवून रुम उघडण्याचा प्रयत्न केला परंतु ती रुम काही उघडत नव्हती. त्यातच त्या रुममधून दुर्गंधी येवू लागल्याने मॅनेजरने याची माहिती कळगुंट पोलीसांना दिली. पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी हॉटेलच्या कर्मचाऱ्याच्या मदतीने रुमचा दरवाजा तोडून उघडला. रुममधील फरशीवर भावना तोमार (वय ४०) या महिलेचा अर्धनग्न अवस्थेत मृतदेह पडला होता. मयत महिलेचा गळा आवळल्याच्या खुणा तिच्या गळयावर दिसत होत्या. पोलीसांनी घटनास्थळाचा आणि मयताचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी म्हापसा येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. पोलीसांनी या घटनेची माहिती हॉटेलच्या मॅनेजरकडून घेतली असता मयत महिला भावना तोमार ही मध्यप्रदेशातील असून ती सारखी राहुल माहेश्वरी नावाच्या मित्राबरोबर हॉटेलात येत असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. घटनेच्या आदल्या रात्री मयत भावना हिच्या रुमवर राहुल माहेश्वरी आणि त्याची आणखी एक मैत्रिण रश्मी सोळंकी हे दोघेजण तिला भेटायला आल्याचे तसेच मध्यरात्रीच्या सुमारास राहुल आणि रश्मी हे दोघेजण हॉटेलमधून हातात बॅग घेऊन बाहेर पडताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दिसत होते. या घटनेतील संशयीत दोन्ही आरोपीच्या शोधासाठी पोलीसांची दोन पथके दिल्ली आणि मध्यप्रदेश येथे रवाना करण्यात आली. मध्यप्रदेशातील इंदोर येथून रश्मी सोळंकी हिला तर दिल्ली येथून राहुल माहेश्वरी याला ताब्यात घेऊन त्या दोघांना ही पोलीसांनी गोव्यात आणले. कळगुंट पोलीस त्याच्याकडे भावना तोमार हिच्या खूनाविषयी चौकशी करीत असताना ते दोघे ही पोलीसांना उडवा उडवीचे उत्तरे देत होते. पोलीसांनी त्यांना सीसीटीव्ही फुटेज दाखविले असता त्या दोघांनी ही आपला गुन्हा मान्य करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. मयत भावना हिच्या बरोबर आणि रश्मी सोबत राहुलचे प्रेमसंबंध जुळले होते. त्याचे प्रेमाचा त्रिकोण असा बनला होता की, तेथे कुणी ही माघार घ्यायला तयार नव्हते. यातूनच मग खूनाची ही घटना घडली होती. या घटनेची फिर्याद हॉटेल मॅनेजरकडून घेण्यात आली. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून भावना तोमार (वय ४०) रा.मध्यप्रदेश खांडवा हिचा गळा दाबून खून केल्या प्रकरणी राहुल राकेश माहेश्वरी (वय ४०) रा.दिल्ली आणि त्याची दुसरी प्रियेसी रश्मी सुरेंद्र सोळंकी (वय ४३) रा.मध्यप्रदेश याच्या विरोधात भा.दं.वी.कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करून त्या दोघांना म्हापसा येथील कोर्टात पोलीसांनी उभे केले असता मा.कोर्टाने त्या दोघांना ही पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.या घटनेचा पुढील तपास कळगुंट पो.निरी.परेश नाईक याच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

## सततच्या लैंगिक अत्याचाराने तिचे मन...

बांधली. त्यानंतर तिने अचानक हल्ला केला. रक्तबंबाळ अवस्थेत सावत्र वडील रमेश भारती घराबाहेर पडले. तेव्हा तिने त्यांना रस्त्यात गाठून पुन्हा त्यांच्यावर वार केले. माझ्यावर लैंगिक अत्याचार करत असल्याने मी त्यांच्यावर हल्ला केला, असे तिने लोकांना सांगितले. तुळींज पोलिसांनी त्या तरुणीला ताब्यात घेतले आहे, त्याचबरोबर ते पुढील तपास करीत आहेत. या प्रकरणाचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. त्यामध्ये त्या अल्पवयीन मुलीच्या हातात चाकू दिसत असून तिचा बाप समोर रक्तबंबाळ होऊन पडला आहे. यावेळी जमलेले नागरिक त्या मुलीला समजवण्याचा प्रयत्न करत असल्याचं दिसून येतं आहे. तू हातातला चाकू फेकून दे, पोलिस तुला न्याय देतील असं त्या मुलीला सांगताना नागरिक दिसत आहेत. यानंतर त्या मुलीने चाकू फेकून दिला आणि नंतर जमलेल्या नागरिकांनी त्या आरोपी बापाला रुग्णालयात दाखल केलं. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित आरोपी आणि मुलगी ही नालासोपारा पूर्वच्या संतोषभवन येथील सर्वोदय नगर चाळीत राहतात. या मुलीच्या आईचे आरोपी रमेश भारती सोबत दुसरे लग्न झालेले आहे. आरोपी हा त्याच्या सावत्र मुलीवर शारीरिक संबंधासाठी दबाव टाकत होता. आताही तसाच प्रकार घडल्यानंतर मुलीने आरोपीवर चाकूने वार करत हल्ला केला आणि त्याचे गुप्तांग कापले. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी लगेच धाव घेतली आणि त्या मुलीला ताब्यात घेतले. सध्या संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरू असून पुढील कारवाई केली जात आहे.

## दोघांचे भांडण फार विकोपाला गेले...

तिच्या माहेरच्या लोकांनी ही तिला आणि मंगेश याला समजावून सांगून संसार नीट करा, मुलाबाळाकडे लक्ष दया असे सांगितलेले होते. त्याचे सांगणे हे मंगेशच्या दृष्टीने पालथ्या घडयावरचे पाणीच होते. तो तेवढयापुरते त्याचे ऐकत होता. पुन्हा ये रे माझ्या मागल्या प्रमाणे वागत होता. त्याच्यात काही फरक पडत नव्हता. त्याला एक दिवस दारू प्यायला मिळाले नाही की त्याचा हात थरथरत होता.त्यामुळे तो रोज दारू पित होता. दारूसाठी त्याला पैसे मिळाले नाही तर तो त्यासाठी उसणवारी करीत होता. तर कधी प्राजक्ताकडे पैसे मागत होता. तिने पैसे दिले नाही तर तो तिला जबर मारहाण करीत होता. त्याला राग फार लवकर येत होता. तो रागाच्या भरात घरातील भांडी कुंडी विस्कटत होता. त्याच्या रागापुढे तिचे काहीच चालत नव्हते. त्यातच तो दारूच्या नशेत अलिकडे तिच्या चारित्र्यावर ही संशय घेत होता. त्यामुळे ती ही त्याच्या संशयी वृत्तीला कंटाळलेली होती. तो सांगूनही ऐकत नव्हता. दारूच्या नशेत तो बायकोला शिव्या देत तिचे संबंध कोणाबरोबर तरी जोडत होता. त्याच्या या अशा संशयी वृत्तीला कंटाळून ती मुलांना घेऊन आठ पंधरा दिवस आपल्या माहेरी जात होती. तरी त्याच्या वागण्यात सुधारणा होत नव्हती. दारू पिऊ नकोस, बायकोला मारहाण करू नकोस असे जवळचे नातेवाईक ही त्याला सांगून दमले होते. त्याला कायमच दारूच्या नशेत राहयला आवडत होते. खरे तर दारू ही शरीरासाठी अपायकारक तरी ही अनेकजण श्रम परिहार म्हणून दारू पित असतात त्याची हिच सवय व्यसन बनते. व्यसनी माणासाला व्यसनापेक्षा दुसरे काहीच महत्वाचे नसते. तसेच मंगेशचे ही झाले होते. हल्ली तो दारू साठी काही ही करीत होता.त्याला कामधंदा ही नकोसा झालेला होता. तो घरात ऐतखाऊ प्रमाणे बसून राहत होता. म्हणून तिने त्याला मांगले येथे गेल्या १५ दिवसापूर्वी आणले होते. इथे ही तो काम धंदा करीत नव्हता. त्यामुळे त्याची आई आणि भाऊ यांनी देखील त्याला कामावर जा घराकडे लक्ष दे असे सांगितले. त्यांच्या सांगण्याकडे तो दुर्लक्ष करीत होता. मांगले इथे तर ते भाडयाच्या घरात राहयला होते. किती दिवस दीर आणि सासू याच्या जीवावर राहयचे असे प्राजक्ताला वाटत होता. त्यामुळे ती सारखी मंगेशच्या मागे काम करा म्हणून लागत होती. तिने काम करा लावलेला तगादा त्याला सहन होत नव्हता. तो तिच्याकडे रागाने पाहत दात ओठ खात तिला गप्प बसायला सांगत होता. रोजचीच भांडणे त्या संगे कोण मरे म्हणत भावाने आणि आईने ही त्याच्या भांडणाकडे दुर्लक्ष केले होते. महिना भर राहतील आणि परत मुंबईला जातील असे त्यांना वाटत होते. गुरूवार दि.२७ मार्च २०२५ रोजी तो सकाळी सकाळीच फुल्ल दारू पिऊन घरी आला. त्यावेळी सकाळचे १० वाजले होते. त्याचा भाऊ आणि आई हे दोघे मंगेशची दुचाकी गाडी घेऊन देववाडी येथे एका नातलगाच्या रक्षा विसर्जनासाठी गेले होते.घरात फक्त प्राजक्ता, सहा वर्षाचा शिवम आणि तीन वर्षाची शिवकन्या असे चौघेजणच होते. मंगेश हा सकाळी सकाळी फुल्ल दारू पिऊन घरी आल्याचे बघून प्राजक्ता त्याचेवर चिडली.ती त्याला रागाच्या भरात काय वाटेल ते बोलत होती. तो दारूच्या नशेत झिंगतच होता. तुला फक्त पोर काढायचे माहित आहे, त्याचा सांभाळ करायचे माहित नाही, कशाला एवढे मुतु पितोस, काही तरी कामधंद कर. बायको पोराना खायला घाल असे ती त्याला म्हणाली. एवढया कारणातून त्या दोघांची भांडणे लागली. भांडणात तो तिला मारहाण करू लागला होता. त्यामुळे ती मी आता घर सोडून मुलांना घेऊन माझ्या माहेरी जाते असे ती त्याला म्हणाली. ती माहेरी गेली म्हणजे परत जास्तच भांडणे वाढणार हे त्याला माहित होते म्हणून तो तिची समजुत काढत होता. ती म्हणजे त्याचे काही ऐकत नव्हती. दोन्ही लहान मुले आई बाबाचे चाललेले भांडण बघत होते. त्यांना काही समजत नव्हते. ती ही बाबा आईला मारहाण करताना रडत होती. त्यातच त्याच्या रागाचा पारावर जास्तच चढला त्याने तिला भांडणात खाली पाडून तिच्याच साडीने तिचा गळा आवळयला सुरूवात केली. त्याने त्या साडीचा फास तिच्या गळयाभोवती इतका घट्ट टाकला की, तिला काहीच हालचाल करता येत नव्हती. तिचा श्वसो श्वास घुटमळत होता. ती मला सोडा, मला वाचवा असे म्हणत होती. पण त्याच्या रागाचा पारा इतका चढला होता की, त्याने तिचा फास जोरात आवळला. तसा तिचा श्वास बंद पडला. तिची हालचाल बंद पडल्यावर तिचा आपल्या हातून खून झाला आहे हे याच्या लक्षात आले. तो आता तिच्या मृतदेहाची कशी विल्हेवाट लावायची याचा विचार करू लागला. त्याच वेळी त्याचे लक्ष समोरच असलेल्या विघुत मोटार पंपाच्या पेटीकडे गेली. ती पेटी अडीच बाय अडीच अशी होती. ती पेटी रिकामीच होती. त्याने तिचा मृतदेह त्या पेटीत ठेवण्याचा विचार केला. त्या पेटीत तिचा मृतदेह ठेवीत असताना मृतदेह पेटीत बसत नव्हता म्हणून त्याने तिच्या मृतदेहाचे हात पाय मोडले आणि त्या पेटीत कोंबून ठेवला. त्याने त्या पेटीचा दरवाजा बंद केला. त्या पेटीपुढे एक रिकामी मोठी बॅग ठेवली. त्यावर अंथरून झाकले.आणि घराला बाहेरून कुलूप लावून तो पसार झाला.गावाच्या बाहेर येवून त्याने भाऊ निलेश याला फोन करून सांगितले की, माझी गाडी घेऊन ये. मी शिराळ्याला जाणार आहे. मंगेशचा निरोप मिळाल्यानंतर निलेश हा आईला घेऊन दुचाकी घेऊन आला. त्यावेळी घरात कुणी नव्हते. घराच्या बाहेर लहानगा शिवम हा रडत बसला होता. त्याला निलेशने तु का रडत आहेस असे विचारले असता शिवमने रडत रडतच काका निलेशला सांगितले की, आई बाबांचे जोरात भांडण झाले असून बाबाने आईला मारून समोरच्या पेटीत ठेवले आहे हे ऐकून निलेश आणि त्याच्या आईचे हात पायच गळाले. लगेच निलेशने पेटी समोरील पसारा काढून उघडून बघितले असता पेटीत वहिनी प्राजक्ताचा मृतदेह हात पाय मडचलेल्या अवस्थेत होता. त्याने लागलीच मंगेश याला फोन करून तु कुठे आहेस हे विचारले असता तो त्याला म्हणाला की, प्राजक्ता ही भांडण करून कुठे तरी गेली आहे, तिला शोधायला मी गोरक्षनाथ मंदिराकडे आलो आहे. त्यावेळी निलेशने त्याला सांगितले की, तु तेथेच थांब मी तुझी गाडी घेऊन येत आहे. तोपर्यंत निलेशने आपली बहिण आणि तिच्या नवऱ्याला ही गोरक्षनाथ मंदिराकडे येण्यास सांगितले. काही वेळात निलेश त्याची आई बहिण भावोजी हे सर्वजण गोरक्षनाथ मंदिराजवळ पोहचले असता तेथे मंगेश हा इकडे तिकडे येर झऱ्या मारत असताना दिसला.त्यावेळी निलेशने आणि त्याच्या बहिणीने मंगेशला तु काय करून आला आहेस, तु प्राजक्ताला का मारले आहेस अशी विचारणा केली. त्यावेळी मंगेशने काही ही उत्तर दिले नाही. निलेशने आता आम्हाला त्रास होईल तु ताबडतोब असाच शिराळा पोलीस स्टेशनला जा. आणि हजर राहून आपला गुन्हा कबुल कर. सगळ्यांनी पोलीस स्टेशनला त्याला हजर राहण्यास सांगितल्याने तो तसाच गाडी घेऊन शिराळा पोलीस स्टेशनमध्ये स्वत:हून हजर झाला. त्याने पोलीसांना घडलेली सगळी घटना सांगितली. त्याला घेऊन पोलीस मांगले येथील घटनास्थळी रामचंद्र वाघ याच्या कौलारू घराजवळ आले. तोपर्यंत दुपार झालेली होती. खूनाची ही घटना गावातील लोकांना समजल्याने त्यांनी ही घटनास्थळी मोठी गर्दी केली होती. पोलीसांनी गर्दी हटवून विझ्ुत मोटार पेटीतून प्राजक्ताचा मृतदेह बाहेर काढून पंचनामा केला. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत प्राजक्ता हिच्या आईला आणि भावाला सांगितले ते ही घटनास्थळी दाखल झाले. मयत प्राजक्ताच्या आईने माझ्या पोरीला मारून टाकले हो म्हणत मोठयाने अक्रोश केला. पोलीसांनी मृतदेह उतरीय तपासणीसाठी शिराळा येथील उप जिल्हा रुग्णालयात दाखल केला. घटनास्थळी अप्पर पोलीस अधिक्षक रितु खोखर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी मंगेश चव्हाण यांनी भेट देवून या घटनेची पाहणी करून पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. या घटनेची फिर्याद मयत प्राजक्ताच्या भावाने शिराळा पोलीसात दिल्याने पोलीसांनी त्याच्या फिर्यादीवरून प्राजक्ता मंगेश कांबळे (२६) हिच्या खून प्रकरणी तिचा पती मंगेश चंद्रकांत कांबळे (३२) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला शिराळा येथील प्रथमवर्ग कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोडठी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली साडी जप्त केली.या घटनेचा तपास पोलीस निरी.सिध्देश्वर जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली शिराळा पोलीसांनी केला.

## गुन्हेगारांच्या नादी लागून फसला...

झाला आणि या वादातून गुंड मित्रानीच त्याचा खून केला. एकीकडे थर्टी फर्स्ट जल्लोषाला सुरूवात झाली आणि दुसरीकडे नाशिक शहरातील उंटवाडी रोडवरील क्रांतीनगर भागात एका सराईत गुन्हेगाराचा त्याच्याच गुन्हेगार मित्रांनी मद्यपान करतांना जुन्या भांडणाच्या कारणावरून त्याच्या डोक्यात दगड घालून खून केल्याची घटना घडली. लक्ष्मण पोपट गारे हा गल्ली नं. २ सप्तशृंगी मंदिराजवळ क्रांतीनगर, उंटवाडी रोड, नाशिक येथे रहात होता. तो त्याची आई मंदाबाई पोपट गारे, बहीण सुरेखा विजय भांगरे आणि चुलत भाऊ दिपक गणपत गारे यांच्यासोबत रहात होता. लक्ष्मण हा सराईत गुन्हेगार होता आणि त्यामुळे त्याची मित्र मैत्री, उठणे-बसणे हे गुन्हेगारांसोबतच होते. रिझवान काझी, गणेश भावसार, शुभम मिरके उर्फ वांग्या व अरूण वळवी या सराईत गुन्हेगारांबरोबर लक्ष्मणची मैत्री होती, मात्र अलिकडेच त्यांच्याशी लक्ष्मणचे काही कारणावरून भांडण झाले होते. नाहीतर त्यांच्यात वेगवेगळ्या कारणावरून सतत भाडण व्हायचे आणि झालेले भांडण विसरून ते परत एकत्र यायचे, त्यामुळे त्यांच्यात झालेले भांडण हे काही ते फार मनावर घेत नसत. पण लक्ष्मणचे या चौघा मित्रांसोबत काही दिवसांपूर्वीच भांडण झाले होते, ते मात्र थोडे वेगळे ठरणारे होते. कारण या भांडणामुळे रिझवान, गणेश, शुभम उर्फ वांग्या व अरूण हे चौघेजण त्याच्यावर प्रचंड चिडले होते, त्यामुळे चौघा जणांनी त्याला चांगला घडा शिकवण्याचा निर्णय घेतला. दि. ३१ डिसेंबर २०२४ रोजी रात्री साडेनऊ ते दहा वाजण्याच्या दरम्यान २०२४ वर्षाला निरोप देण्यासाठी सर्वत्र जल्लोषाला सुरूवात झाली होती. त्याचवेळी लक्ष्मण गारे हा उंटवाडी रोडवरील सप्तशृंगी मंदिराजवळ उभा होते. तिथे रिझवान व शुभम उर्फ वांग्या हे दोघेजण रिझवानच्या स्कुटीवरून त्याच्याजवळ आले. काही वेळाने गणेश भावसार आणि अरूण वळवी हेही तेथे आले. चौघे मित्र नेहमीप्रमाणे भेटले होते. ते गप्पा मारत उभे राहिले. लक्ष्मणला काही अंदाज नव्हता. पण ते चौघे मात्र पूर्ण तयारीनेच आले होते. आज लक्ष्मणचा शेवट करायचे याचे त्यांनी प्लॅनिंग केले होते. त्याप्रमाणे त्या चौघांनी मागील भांडणाची कुरापत काढून लक्ष्मणशी भांडण उकरून काढले. भांडण करता- करता गणेश भावसार आणि अरूण वळवी या दोघांनी लक्ष्मणला हातांनी मारहाण केली. तसेच त्याला बळजबरीने रिझवानच्या स्कुटीवर बसवले. त्याच्या मागे बसलेल्या शुभम मिटके याने लक्ष्मणला पकडून ठेवले. ते चौघे लक्ष्मणला आपल्यासोबत स्कुटीवर बसवून बळजबरीने घेऊन गेले. ते त्याला घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागील बाजूस असलेल्या कंपौडच्या भिंतीलगत असलेल्या मोकळ्या जागेवर घेवून गेले. आधी झालेल्या भांडणाची कुरापत काढून चौघांनी लक्ष्मणला शिवीगाळ व दमबाजी करत मारहाण करायला सुरूवात केली. चौघेजण त्याच्यावर तुटून पडले. हाताच्या बुक्क्यांसह लाथा-बुक्क्यांनी त्याला तुडवत लक्ष्मणच्या डोक्यात दगड घालून त्यांनी त्यास क्रूरपणे जीवे ठार मारले. उंटवाडी ते मिलिंदनगर रोडवरील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागील बाजूस लागून असलेल्या कंपौंडच्या भिंतीलगत मोकळ्या जागेत रक्तबंबाळ होवून लक्ष्मण मृतावस्थेत पडलेला होता. त्याच्या डोक्यावर दगडांनी मारहाण केल्याने त्याच्या डोक्याचा चेंदामेंदा झाला होता. दरम्यान, रात्री साडेनऊ ते दहा वाजण्याच्या सुमारास लक्ष्मणचा चुलत भाऊ दिपक गणपत गारे हा सप्तशृंगी मंदिराजवळून घरी निघाला होता. तेव्हा त्याला रिझवान काझी, गणेश भावसार, शुभम मिरके उर्फ वांग्या व अरूण वळवी हे लक्ष्मणला मारहाण करून बळजबरीने त्याला स्कुटीवर बसवून घेवून जात असतांना दिसले. तेंव्हा दिपकने त्यांना आवाज दिला, मात्र ते थांबले नाहीत. त्यामुळे तो ताबडतोब घरी आला आणि चौघाजणांनी स्कुटीवर बसवून लक्ष्मणला पळवून नेल्याची माहिती लक्ष्मणची आई व बहिणीला दिली. मग तिघेजण ताबडतोब या घटनेची माहिती देण्यासाठी मुंबई नाका पोलीस ठाण्याला पायी निघाले. पायी जात असतांना तिघांना रात्री १० वाजण्याच्या सुमारास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागील बाजूस असलेल्या कंपौडच्या भिंतीलगत मोकळ्या जागेत लक्ष्मण हा रक्तबंबाळ झालेल्या अवस्थेत निपचित पडलेला दिसला. त्यांनी त्याला आवाज दिला. त्याला हलवून पाहिले, मात्र तो काहीच हालचाल करत नव्हता. त्याच्या डोक्याचा चेंदामेंदा झालेला होता. चौघाजणांनी त्याच्या डोक्यात दगड घालून त्याचा निघृणपणे खून केल्याचे दिसून आले. दिपक गणपत गारे याने मुंबई नाका पोलीस ठाणे गाठले आणि पोलिसांना या घटनेची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळ व लक्ष्मणच्या मृतदेहाचा पंचनामा करून मृतदेह विच्छेदनासाठी जिल्हा रूग्णालयात पाठवला. दरम्यान दिपक गारे याने दिलेल्या फिर्यादीवरून मुंबई नाका पोलीस ठाण्याला गुन्हा र/२०२५ बी.एन. एस. १०३(१), १४० (१) व.३+(५) कलमाखाली रिझवान काझी, गणेश भावसार, शुभम मिरके उर्फ वांग्या आणि अरूण वळवी या चौघांवर गुन्हा दाखल केला.

## विकृत नराधमाचे डोके फिरले...

कांदिवलीत रस्त्याच्या कडेला आईच्या कुशीत झोपलेल्या चार वर्षाच्या चिमुकल्याचे अपहरण करून त्याची निघृणपणे हत्या केली. त्यानंतर या मुलाचा मृतदेह रस्त्यावर फेकून आरोपी पसार झाला होता. या आरोपीला पोलिसांनी गुजरातमधून अटक केली असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलीस आरोपीपर्यंत पोहोचले. या आरोपीचं नाव अक्षय अशोक गरुड असं असून तो २५ वर्षांचा आहे. अक्षय हा मलाडमधील रहिवाशी असून त्याला कांदिवली पोलिसांनी सुरतमधून अटक केली आहे. मागील चार दिवस सातत्याने तपास करीत कांदिवली पोलिसांनी सुरत गाठलं. तब्बल २०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फूटेज पडताळून पाहिल्यानंतर पोलिसांनी आरोपीला अटक केली. नालासोपारा येथे राहणारी २४ वर्षीय फातीमा ऊर्फ सोनी अन्सारी ही ४ वर्षांचा मुलगा अंश आणि १० महिन्यांची मुलगी रेणू यांना घेऊन कांदिवलीतील इराणीवाडीमध्ये फुटपाथवर राहणाऱ्या आईकडे आली होती. २१ मार्चच्या रात्री फातीमा तिच्या मुलांबरोबर फुटपाथवर झोपलेली असताना सायकलवरून आलेल्या अक्षयने अंशला उचलून नेले. त्यानंतर अक्षयने अंशची हत्या करून मृतदेह येथून जवळच असलेल्या एका बांधकाम सुरु असलेल्या साइटजवळ फेकून पळ काढला. कांदिवली पोलिसांनी आता अक्षयविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. अक्षय हा मृत मुलाच्या वडिलांचा मित्र होता. तो खासगी कंपनीत नोकरी करायचा. तो अंशला अनेकदा त्याच्या दुचाकीवरून फिरायला घेऊन जात होता. याच माहितीच्या आधारे पोलिसांनी अक्षयचा शोध सुरू केला. आरोपीचा शोध घेण्यासाठी कांदिवली पोलिसांनी २०० ठिकाणांवरील सीसीटीव्ही फुटेज तपासून पाहिले. यामध्ये कांदिवली, बोरीवली, मालाड, अंधेरी, सांताक्रुझ, विरार आणि गुजरातमधील सुरत येथील सीसीटीव्ही फुटेजचा समावेश होता. या तपासामधून सदर प्रकरणाचं सुरत कनेक्शन समोर आले. पथकाने सुरतमध्ये सापळा रचून अक्षयला अटक केली. मुलाला फिरायला नेण्यासाठी आणले होते, असा दावा अक्षयने अटक केल्यानंतर केला आहे. आंघोळ घालत असताना अंश रडू लागला. अखेर रागाच्या भरात अक्षयने अंशला पाण्यात बुडवून ठार मारल्याची कबुली दिली आहे. पण, मुलाचे अपहरण करण्यामागे खरं कारण काय आहे आणि त्याची हत्या करण्यामागे नेमके कोणते कारण निमित्त ठरले यांचं गूढ कायम असून पोलीस त्याचाच शोध घेत आहेत.

## सासऱ्याला लागला होता सुनेचा ...

अचानक मृत्यूने सगळेच हैराण झाले. मात्र संशयितांनी गावातील लोकांना आणि नातेवाईकांना त्याच्या छातीत दुखत असल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे सांगितले. याबाबत मयताच्या आईने फिर्याद दिल्याने दोघांविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास अक्कलकुवा पोलीस ठाण्याचे सहाय्यक तपास अधिकारी योगेश चौधरी करत आहेत. दरम्यान, अलीकडेच अनैतिक संबधांतून होणाऱ्या हत्येच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. उत्तर प्रदेशात मेरठ येथे प्रेम प्रकरणातून पत्नीने प्रियकराच्या मदतीने पतीचा काटा काढल्याचे समोर आले. याठिकाणी लंडन येथे काम करणारा पती भारतात आल्यानंतर त्याची प्रियकराच्या मदतीने हत्या करण्यात आली. हत्या करून पतीच्या मृतदेहाचे तुकडे करून ते ड्रममध्ये सिमेंटमध्ये गाडण्यात आले. त्यानंतर औरैया येथेही लग्नाच्या १५ दिवसातच पतीची हत्या करण्याचं षडयंत्र पत्नीने रचल्याचं समोर येताच पोलिसांनी तिला अटक केली.

## आईवरचा राग मुलीच्या प्राणावर ...

एकच खळबळ उडाली. या मुलीची हत्या करणारा आरोपी तिच्याच घरा शेजारी राहत असल्याची धक्कादायक माहिती पोलिस तपासात उघडकीस आली आहे. मोहम्मद मजीर वझीर अन्सारी (वय २९ वर्षे) असे आरोपीचे नाव आहे. तर मृत मुलगी ही दोन वर्षे दहा महिन्यांची होती. बुधवारी उशीरा रात्री या चिमुरडीचा मृतदेह तिच्याच घरातील बाथरुमच्या माळ्यावर एका रेग्झिनच्या बॅगेत आढळून आला. या नंतर पोलिसांनी तपास करत आरोपीला अटक केली आहे. तळोजा औद्योगिक वसाहतीला खेटून असणाऱ्या देवीचापाडा गावात राहणारी दोन वर्षांची बालिका मंगळवारी दुपारपासून बेपत्ता होती. तीच्या पालकांनी यासंदर्भातील तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात नोंदवली होती. बुधवारी रात्री घरातील पोटमाळ्यावरुन दुर्गंधी येत असल्याने शोध घेतल्यावर एका पेटीमध्ये बेपत्ता बालिकेचा मृतदेह सापडला. यामुळे देवीचा पाडा गावामध्ये एकच खळबळ माजली. अद्याप बालिकेच्या मृत्यूचे कारण स्पष्ट झाले नाही. देवीचा पाडा येथील विनायक मेडिकल जवळील माऊली कृपा इमारतीच्या तीसऱ्या मजल्यावर पीडित मुलीचे कुटुंब राहत होते. मंगळवारी बालिकेच्या पालकांनी तळोजा पोलिसांनी दिलेल्या तक्रारीमध्ये मंगळवारी दुपारी साडेबारा वाजता बालिका बेपत्ता झाल्याचे म्हटले. संबंधित तक्रार नोंदवण्यासाठी पावणेपाच वाजले. त्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. ज्या इमारतीमध्ये हे कुटूंब राहतात त्याच्याजवळ त्यांचे काही नातेवाईक सुद्धा राहतात. या घटनेनंतर नवी मुंबई पोलीस उपायुक्त अमित काळे यांनी घटनास्थळी गुरुवारी भेट दिली. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात संबंधित कुटुंबियांच्या संपर्कात मंगळवार ते बुधवारी आलेल्यांची चौकशी पोलिसांनी सुरू केली आहे. चिमुरडीची आई आणि आरोपी अन्सारीची पत्नी यांच्यामध्ये नेहमी भांडण व्हायचे. यामुळे आरोपी या चिमुरडीचा राग राग करायचा. ऑनलाईन गेमींगमध्ये पैसे हरल्याने या चिमुरडीचे अपहरण करुन तिच्या वडीलांकडुन पैसे उकळण्याचा कट आरोपीने रचल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. आरोपी मोहम्मद अन्सारी याला तीन मुले आहे. चिमुरडी अन्सारी याच्या मुलांसोबत खेळत असताना त्याने तिचे अपहरण केले. मुलगी कुठेच सापडत नसल्याचे लक्षात येताच चिमुरडीच्या पालकांनी शोधा शोध करत पोलिसांशी संपर्क साधला. यामुळे अन्सारीचा चिमुरडीच्या वडीलांकडुन पैसे उकळण्याचा डाव फसल्याचे समजते. चिमुरडीच्या घरातून दुर्गंधी येत होती. तिच्या पालकांनी पोलिसांना याबाबत सांगितले. तेव्हा पोलिसांनी तिच्या घरी जाऊन तपास केला असता पोटमाळ्यावरील बॅगेत या मुलीचा मृतदहे आढळून आला. लेकीचा मृतदेह बॅगेत पाहून तिच्या आई वडिलांच्या पायाखालची जमीन सरकली. अन्सारी यानेच चिमुरीडीची हत्या केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. दरम्यान, चिमुरडीची हत्या कशी झाली. तसेच तिचा मृतदेह तिच्याच घरातील पोटमाळ्यावरील बॅगेत कसा आला हे समजू शकलेले नाही.

# बेकायदेशीररित्या सील केलेले यशवंतराव चव्हाण कॉम्प्लेक्स पुन्हा खुले करण्याची लातूर तहसील प्रशासनावर नामुष्की!

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर तहसील प्रशासनाने बेकायदेशिररित्या सील केलेले यशवंतराव चव्हाण व्यापारी संकुल अखेर यशवंतराव चव्हाण व्यापारी संकुल असोसिएशनच्या आक्रमक पाठपुराव्यामुळे खुले करण्याची नामुष्की तहसिल प्रशासनावर आली. सोमवार दि. २४ मार्च रोजी सकाळी आठ वाजता गाळेधारकांना कसलीही पूर्वकल्पना न देता तहसीलदारांनी यशवंतराव चव्हाण कॉम्प्लेक्सचे सर्व गाळे सील केले होते. महसूल विभागाचे महानगरपालिकेकडून दोन कोटी पेक्षा जास्त रुपये अकृषिक कर म्हणून येणे आहे, वारंवार पत्र देऊन पालिका त्याचा भरणा करत नाही, त्यामुळे पालिकेच्या मालमत्ता सील करण्याचा आम्हाला अधिकार आहे असं तहसीलदारांचं म्हणणं होतं. २४ तारखेला सकाळी ११ वाजता कॉम्प्लेक्स मधील सर्व गाळेधारक एकत्र आले व त्यांनी पालिका आयुक्तांची भेट घेतली. आयुक्तांनी त्यांना सांगितले की, तहसील कार्यालयाने लावलेला कर हा अवाजवी आहे आणि कार्यवाही तहसील ऑफिसने केली आहे. तेव्हा आयुक्तांनी आपण तहसीलच्या अधिकाऱ्यांना बोलावे, असे सांगून उडवाउडवीचे उत्तर देऊन जिम्मेदारी झटकली. त्यानंतर गाळे धारकांनी तहसीलदार यांची भेट घेतली.




तहसीलदार यांनी आम्ही केलेली कारवाई योग्य असून आम्ही लावलेला कर हा नियमानुसारच लावलेला आहे. जानेवारी महिन्यापासून आम्ही पालिकेला पालिकेची पत्रव्यवहार करत आहोत. त्यामुळे जोपर्यंत पालिका कर भरत नाही आम्ही सील काढणार नाही अशी भूमिका घेतली. कॉम्प्लेक्स असोसिएशनचे अध्यक्ष मनोज सूर्यवंशी व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी, तहसीलदार यांना एक बाब निदर्शनास आणून दिली, ती म्हणजे एक तर तुम्ही आम्हाला नोटीस न देता आमचे गाळे सील केले व आम्हाला आमच्या व्यवसायाच्या ठिकाणी जाण्यास मज्जाव केला. तुम्ही न्याय दंडाधिकारी असून आमच्या सोबत अन्याय केलेला आहे. पालिका तुमचं देणं आहे तर तुम्ही पालिका सील करायला पाहिजे, आम्ही पालिकेचे सर्व कर वेळच्यावेळी भरणा केलेला आहे. आणि दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे यशवंतराव चव्हाण कॉम्प्लेक्स हे बीओटी तत्त्वावर बांधलेले कॉम्प्लेक्स आहे, आम्हाला ऑक्युपंसी राइट्स आहेत, जोपर्यंत करार आहे तोपर्यंत आम्ही तेथील मालक आहोत. त्यामुळे अकर्षिक कर भरण्याची नोटीस आम्हाला देणे हे बंधनकारक होतं. परंतु आपण पालिकेला नोटीस दिली त्यामुळे गाळे सील करण्याची कार्यवाही ही बेकायदेशीर व अन्यायकारक आहे. त्यानंतर गाळेधारकांनी जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांची भेट घेतली व या सर्व कायदेशीर बाबी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या, बेकायदेशीररित्या गाळे सील केल्यामुळे आमचे आर्थिक नुकसान झाले आहे त्याची भरपाई आपणास करून द्यावी लागेल, आपल्या कार्यवाहीच्या विरोधात न्यायालयात दाद मागू. असे लेखी निवेदन सुद्धा दिले. गाळे धारकांच्या मागणीचा संवेदनशील पणे व गांभीर्याने विचार करून उपविभागीय अधिकाऱ्यांनी दि २५ मार्च रोजी तहसीलदारांना पत्र दिले व त्या पत्राच्या अनुषंगाने तहसीलदारांनी यशवंतराव चव्हाण कॉम्प्लेक्सचे सील काढण्याचे लेखी आदेश २५ मार्च रोजी दुपारी दिले. या प्रसंगी यशवंतराव चव्हाण व्यापारी संकुल असोसिएशनचे अध्यक्ष मनोज सूर्यवंशी, ॲड.रविकिरण गिरी, ॲड. निखिल मुंजाने, मुकेश रांदड, रामदास भोसले, विठ्ठल बेंबडे, अरुण बिराजदार, गोपी तापडिया, विजय जगदाळे, सुनील शेळके, तोष्णीवाल, माने व्यंकट वामनराव, नेट कॉम सर्विसेस, नागनाथ कोळी, व्हि.पी. पाटील, के.के. शिंदे, मनियार एजाज, सुदीप देवकते, विजयकुमार डागा, भुतडा गिरीश, पांडुरंग काबरा, देशपांडे उदय, मोहन समशेटे, डॉ. चेतन जाजू, ॲड.राम केंद्रे, सागर राजेंद्र मदवाड, नाईकवाडे भारत, जितेंद्र, महेश पिंपळे, हेमंत कुलकर्णी, कृष्णा डागा, गणेश शिंदे, आनंद नायगावकर, सोमनाथ शिंदे, नागनाथ बोयणे आदींची उपस्थिती होती.

# वाडा नगरपंचायतहद्दीत फूटपाथ लगत लोखंडी ग्रील बसवण्याची मागणी!



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा नगरपंचायत हद्दीतील मुख्य रस्त्यावर फुटपाथ पादचाऱ्यांना चालण्यासाठी मोकळे करण्याच्या उद्देशाने तसेच अतिक्रमण रोखण्यासाठी रस्त्यालगत दोन्ही बाजूला गटारीवर, फुटपाथवर लोखंडी ग्रील बसण्याचे मागणी भूमिपुत्र विकास फाउंडेशनच्या माध्यमातून करण्यात आली आहे. वाडा नगरपंचायत हद्दीत फुटपाथवर वाढत्या अतिक्रमणामुळे पादचाऱ्यांचे हाल होत आहेत. दुकानांचे अनधिकृत विस्तार, फेरीवाल्यांची गर्दी आणि अवैध पार्किंग यामुळे पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालण्याची वेळ येत आहे. परिणामी, अपघातांचा धोका वाढला असून नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. नगरपंचायत हद्दीत मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. फुटपाथवर फेरीवाले, भाजीपाला विक्रेते तसेच रस्त्यावर अनधिकृत गाड्यांची पार्किंग, टपऱ्या, हातगाड्या आणि दुकानदारांनी व्यापलेली जागा यामुळे पादचाऱ्यांसाठी जागा उरलेली नाही. पादचारी मार्ग मोकळे न राहिल्याने लोकांना थेट रस्त्यावरून चालत जावे लागते तसेच शाळेत जाणारे विद्यार्थी यांची शाळा सुटल्यावर रस्त्यावर मोठे गर्दी होत असते जे अत्यंत धोकादायक ठरत आहे. रस्त्यावर पादचाऱ्यांचा वावर वाढल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. विशेषतः गर्दीच्या वेळी आणि रात्रीच्या वेळी वाहनचालक व पादचारी यांच्यातील समन्वयाचा अभाव अपघातांना निमंत्रण देऊ शकतो. या वर उपाय म्हणून वाडा नगरपंचायत हद्दीत खंडेश्वरी नाका ते परळी नाका या मुख्य सिमेंट काँक्रीट रस्त्यावर मध्यभागी सिमेंटचे दुभाजक तसेच रस्त्यालगत असलेल्या दोन्ही बाजूस गटारीवर फुटपात करिता लोखंडी ग्रील बसवण्यात यावे ही मागणी भूमिपुत्र विकास फाउंडेशनच्या माध्यमातून वाडा नगरपंचायतचे मुख्याधिकारी मनोज पष्टे तसेच सार्वजनिक बांधकाम वाडा चे संजय डोंगरे यांना निवेदन देऊन करण्यात आलेली आहे. यावेळी भूमिपुत्र विकास फॉउंडेशन चे अध्यक्ष शेखर पवार सह सत्यवान तरे तसेच इतर सदस्य उपस्थित होते.

# देवळी-मानिवली येथील विद्यार्थ्यांना रोटरी क्लबतर्फे १५० सौर दिव्यांचे वाटप

**वाडा/प्रतिनिधी**




ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी रोटरी क्लब ऑफ मुंबई निओ आणि रोटरी क्लब ऑफ बॉम्बे जुहू बीच यांच्या संयुक्त विद्यमाने वाडा तालुक्यातील देवळी-मानिवली विभागातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना १५० सौर दिवे वितरित करण्यात आले. हे सौर दिवे एका चार्जिंगनंतर सलग ६ तास उजेड देतात, ज्यामुळे अभ्यासासाठी अडचण ठरणाऱ्या वीज पुरवठ्याच्या समस्येवर मात होणार आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अनुकूल वातावरण निर्माण करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला. हे सौर दिवे रोटरी क्लब ऑफ मुंबई निओचे अध्यक्ष आर. श्रीधर आणि रोटरी क्लब ऑफ बॉम्बे जुहू बीचच्या अध्यक्षा मानसी ठक्कर यांच्या सहकार्याने उपलब्ध झाले. या दिव्यांच्या वितरणामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी अधिक वेळ उपलब्ध होईल आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. यावेळी रोटरी क्लब ऑफ मुंबई निओच्या वतीने येथील नर्सिंग कॉलेजला दूरचित्रवाणी संच आणि प्रिंटरदेखील देण्यात आले, ज्याचा उपयोग विद्यार्थ्यांच्या अध्यापनासाठी होणार आहे. कार्यक्रमास रोटरीच्या असिस्टंट गव्हर्नर आणि या प्रकल्पाच्या समन्वयक कला श्रीधर, रोटरी क्लब ऑफ वाडाचे अध्यक्ष प्रफुल्ल बोकंद, रोटरी सदस्य शशांक ठाकरे, रमेश पाटील, माऊली शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विलास गोळे, समाजसेविका गीतांजली भिसे, तसेच जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रोटरी क्लबच्या या सामाजिक उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वीज पुरवठ्याच्या समस्येमुळे अभ्यासात होणाऱ्या अडचणी दूर होतील. या सौर दिव्यांच्या वाटपामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आयुष्य प्रकाशमय होईल, असा विश्वास शिक्षक आणि पालकांनी व्यक्त केला. या प्रकल्पाचे उपस्थित मान्यवरांनी आणि स्थानिक नागरिकांनीही भरभरून कौतुक केले. रोटरी क्लब ऑफ मुंबई निओ आणि बॉम्बे जुहू बीच यांनी यापुढेही अशाच प्रकारे ग्रामीण भागातील शाळांमध्ये विविध प्रकल्प राबवून विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्याची इच्छा व्यक्त केली.

# देवणी शहरातील जामा मस्जिद येथे इफ्तार पार्टी व मस्जिद परिचय कार्यक्रम

**देवणी/प्रतिनिधी**



दर वर्षाप्रमाणे यावर्षीही पोलीस विभागातर्फे शहरातील जामा मस्जिद येथे इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तहसीलदार सोमनाथ वाडकर, साह्यक पोलीस निरीक्षक माणिकराव डोके यांची विशेष उपस्थिती होती. शहरातील सर्व धर्मीय बांधव पत्रकार व्यवसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व धर्मीयांना जोडणारा हा अनोखा उपक्रम पोलीस विभागातर्फे दरवर्षी राबवला जातो. यावेळी रोजा त्याचे महत्त्व व इतिहास यावरती प्रकाश टाकण्यात आला. विस्तार व नमाज नंतर सर्व मान्यवरांकरिता मस्जिद परिचय कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी अब्दुल मुजीब मोमीन सर यांनी मस्जिद काय असते. मस्जिदीचे अंतरंग वर्णन केले. मस्जिद हे एकेश्वरत्वाचे केंद्र असून त्यात आपल्या निर्मात्याची आराधना स्तुती प्रशंसा केली जाते असे सांगितले. त्याचबरोबर दिवसातून पाच वेळा दिली जाणारी अजान याचे महत्त्व व भाषांतर मराठी भाषेतून व्यक्त केले. पोलीस निरीक्षक माणिकराव डोके यांनी अतिशय सुंदर उपक्रम असल्याचे सांगितले. तहसीलदार सोमनाथ वाडकर यांनी सांगितले की माझ्या जीवनात हा पहिला प्रसंग आहे की मी मस्जिदीत आलो आहे. कॉलेज जीवनामध्ये इस्लाम विषयी काही अभ्यास करण्यात आला आज या ठिकाणी सखोल माहिती मिळाल्याचेही त्यांनी सांगितले. उपस्थित आणि या उपक्रमाचे कौतुक केले आणि असे उपक्रम प्रत्येक ठिकाणी राबवले जावेत अशी अपेक्षा ही व्यक्त केली. यावेळी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष अजित बेळकोने, व्यापारी संघटनेचे देवणी तालुका अध्यक्ष सोमनाथ लूल्ले,नगरसेवक किशोर निडवंचे, नगर पंचायतीचे पाणी पुरवठा सभापती नदीम मिर्झा, माजी सरपंच बाबुराव लांडगे, वैजनाथ लुल्ले, ज्येष्ठ पत्रकार रमेश कोतवाल, मनोज लांडगे, सुनील चीद्रेवार, जामा मस्जिदचे इमाम नयुम हापिज, सईद पठण, अजीज खेडे, फैय्याज शेख, रशीद मल्लेवाले, करीमलाला शेख, यांच्यासह हिंदू मुस्लिम समाजातील असंख्य नागरिक उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोटेरावे सर यांनी केले.

# जिल्हा न्यायालय परिसरात झाडानां येळणी बांधून पक्ष्याना पिण्याच्या पाण्याची सोय!

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर येथील प्रभुराज प्रतिष्ठान व लातूर जिल्हा वकील मंडळ यांच्या संयुक्त विद्यमानाने जिल्हा न्यायलंय परिसरात झाडानां येळणी बांधून पक्ष्याना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली. कडक्याच्या उन्हात पक्ष्याची पिण्याच्या पाण्यासाठी हेळसांड व भटकंती होऊ नये या करिता एक सामाजिक बांधिलकी जपून पक्ष्याची सोय करण्यात आली. तसेच सध्या पाणी टंचाई भासू नये याकरिता पाणी जपून वापरा आणि पाणी आडवा पाणी जिरवा या संदेशाने पाणीचे जतन करून उन्हाळ्यात पाणी पिण्यासाठी कमी पडणार नाही या करिता जनतेने पाण्याचे अपव्यय व गैरवापर वापर टाळुन त्यातून मुक्या प्राणी व पशु पक्ष्याचे पिण्याच्या पाण्याची सोय करता येईल याची काळजी घ्यावी या उपक्रमाणे पशु पक्ष्याची कडक्याच्या उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होईल चला पाणी वाचवा... जीवन वाचवा... पाणी हे विश्वातील सर्वात मोठी संपत्ती आहे. थेंब थेंब पाणी वाचवा आणि संपूर्ण सजीव सृष्टी वाचवा ही जावाबदारी पूर्ण करण्यासाठी सर्व नागरिकांनी प्रयत्न केले पाहिजे. यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही.व्ही. पाटील साहेब, जिल्हा न्यायाधीश(१) आर.बी.रोटे साहेब, प्रभुराज प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड.अजय कलशेट, जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ॲड. शरद इंगळे, उपाध्यक्ष ॲड.आनंद खांडेकर, सचिव प्रदिपसिंग गंगने, नरेश कुलकर्णी, रोहित सोमवंशी, सचिव ॲड.रोहित सोमवंशी, जिल्हा सरकारी वकील संतोष देशपांडे, प्रबंधक बी.के.राऊत, ॲड.सुरेश सलगरे, ॲड.कल्पना भुरे, ॲड.किरण चिंते, ॲड. वसुदा देशपांडे, ॲड.मोहिनी रामपूर, ॲड.वैशाली निलेगावकर, महिला उपाध्यक्ष मनिषा दिवेपाटील, महिला सहसचिव तृप्ती इटकरी, ॲड.गुरुप्रसाद येरटे, ॲड.शिरीष दहिवाल, ॲड.योगेश जगताप, ॲड. विजयकुमार चिखलीकर, ॲड.जाभूवंतराव सोनकवडे, नामदेव काकडे, ॲड. गुरुप्रसाद संदीकर, ॲड. विजयकुमार खानापुरे, सादिक शेख, ॲड.वैभव बिराजदार उपस्थित होते.



# पत्रकरास जिवे मारण्याची धमकी

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी येथील दै. 'देशोन्नती'चे तालुका प्रतिनिधि दत्ता पाटील रा.तळेगाव ता.देवणी यांना दारूची बातमी छापल्याचा कारणा वरून जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. या प्रकरणी पत्रकार संरक्षण कायद्यानुसार देवणी पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गेल्या आठवड्यात तालुक्यातील अवैध देशी दारू जप्त केल्याची बातमी दै. देशोन्नती या दैनिकात प्रकाशित झाली होती. याचा राग मनात धरून माझ्या मुलाची बदनामी करतो का म्हणुन आर्वाच भाषेत शिवीगाळ व परिवारास जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. या प्रकरणी देवणी पोलिसात पत्रकार संरक्षण कायद्यानुसार हनुमंत रंगराव घोनशे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या बाबतचा अधिक तपास पोलीस उपअधिक्षक नितीन काटेकर यांच्या कडून करण्यात येत आहे. या घटनेचा तालुका पत्रकार संघाकडून निषेध होत आहे.

# संभाजी ब्रिगेडकडून रस्त्याच्या कामासाठी देवणी तहसीलदार यांना निवेदन

**देवणी/प्रतिनिधी**




देवणी तालुक्यातील रस्त्याचे कामे चालु करण्यात यावे, यासाठी संभाजी ब्रिगेड देवणी तालुक्याच्या वतीने देवणी तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. यात इंद्राळ, लक्ष्मी नगर, आंबेगाव एनगेवाडी, देवणी या रस्त्याची खूपच अवस्था वाईट झालेली आहे. हा रस्तावर त्वरित डांबरीकरण करण्यात यावा, तसेच बोळेगाव वडमुरंबी, आंबेनगर, आंबेगाव व दवनहिप्परगा ते अचवला पाटी हे तिन्हीही रस्ते त्वरित चालू करण्यात यावेत, असे संभाजी ब्रिगेड कडून निवेदन देवणी तहसीलदार यांना देण्यात आले. संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राजकुमार माने, विधानसभा अध्यक्ष उत्तमराव फड, जिल्हा सचिव मोहनेश्वर विश्वकर्मा, जिल्हा कार्याध्यक्ष बाळासाहेब चिंचोलकर, देवणी तालुका अध्यक्ष लक्ष्मण देवंगरे, उपाध्यक्ष विनोद कोतवाल, सचिव परमेश्वर भंडे, सह सचिव महेश भंडारे, कार्याअध्यक्ष सुमित पाटील, सदस्य. दिपक कल्याणकर, प्रविण चापटे, माधव सुडे, महेश विळेगावे, कृष्णा माने, डॉ. गुणवंत बिरादार इत्यादी उपस्थित होते.

# पतीच्या विवाहबाह्य संबंधाच्या त्रासाला कंटाळून महिलेची आत्महत्या

ठाणे : पतीच्या विवाहबाह्य संबंधाला कंटाळून ४५ वर्षीय महिलेने घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी महिलेने एक चित्रीकरण केले होते. त्यामध्ये तिने आत्महत्येस तिच्या पतीला आणि त्याच्या प्रेयसीला जबाबदार धरले होते. महिलेच्या मुलाने दिलेल्या तक्रारीच्या आधारे कापूरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. महिलेचा पती भारतीय रेल्वेत तिकीट तपासणीस म्हणून कामाला असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. कोलशेत भागात ४५ वर्षीय महिला तिचा पती आणि तीन मुलांसोबत राहत होती. तिच्या पतीचे तिच्याच एका नातेवाईक महिलेसोबत अनैतिक संबंध होते. या कारणांवरून दोघांमध्ये सातत्याने वाद होत होते. महिलेने जाब विचारल्यानंतर तिला मारहाण देखील झाली होती. या सर्व त्रासाला कंटाळून १६ मार्चला महिलेने राहत्या घरामध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली होती. आत्महत्येपूर्वी तिने मोबाईलमध्यये एक चित्रीकरण तयार केले होते. या चित्रीकरणात तिने पती, त्याची प्रेयसी आणि एका नातेवाईकाचे नाव घेत आत्महत्येस जबाबदार असल्याचे म्हटले होते. याप्रकरणी तिच्या मुलाने सोमवारी कापूरबावडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीनंतर गुन्हा दाखल झालेला आहे.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर**

**ई-निविदा सूचना क्रमांक -१९१ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पालघर बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी, पालघर-बोईसर रोड, ता.जि. पालघर, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडून खालील कामाकरीता बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. सदर निविदा सूचनेमध्ये एकूण ०२ (दोन) कामे समाविष्ट आहे.

टिप : या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1) www.mahapwd.com 2) http://mahatenders.gov.in

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये (जी.एस.टी.वगळून) | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १. | कवटेपाडा अंतर्गत रस्ता तयार करणे. ता. डहाणू, जि. पालघर | रु. ३९८२१३५/- | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४ ५०५४ ५११७ ५३ Trible |
| २. | पालघर तालुक्यातील दापोली गावात सुलभ शौचालय व मुतारीची व्यवस्था करणे. ता.जि. पालघर | रु. २०६८४९०/- | प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

वरील कामाची ई-निविदा उपलब्ध कालावधी - दि. २८/०३/२०२५ ते दि. ०४/०४/२०२५ पर्यंत

ई-निविदा उघडणे - दि. ०७/०४/२०२५ शक्य झाल्यास सकाळी ११.०० नंतर

**जा.क्र. सा.बां.वि./पालघर/निविदा/२६३६**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां. विभाग, पालघर
बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी,
पालघर-बोईसर रोड, ता.जि. पालघर (पश्चिम) ४०१ ४०४
दिनांक : २२/०३/२०२५

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर**

**विमाका/कोवि/२०२४-२०२५/३८९**

31 MARCH TO 06 APRIL 2025 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 3/29/2025 8:47 PM Page 1



# अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा सूर्यास्त!

स्टॅन्ड अप कॉमेडियन कुणाल कामरा याने उपमुख्यमंत्र्यांवर एक गाणे काय लिहिले, संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ माजली. उपमुख्यमंत्र्यांच्या अंधभक्तांनी कुणाल कामराचे कार्यालय तोडले. पण कार्यालय तोडायला जितके लोक होते, त्याच्या दहापट लोक कुणाल कामराच्या बाजूने आहेत. सत्तेत भलेही तुम्ही असाल, म्हणून तुमची मुजोरी चालू शकते असे जर सत्ताधाऱ्यांना वाटत असेल तर, तो त्यांचा फार मोठा गैरसमज आहे. कारण या देशात घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जनतेला संविधानात जे अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले आहे त्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी कोणालाही करता येणार नाही. तसे करण्याचा प्रयत्न केल्यास, हजारो कुणाल कामरा तयार होतील. सरकार कोणाकोणाला रोखणार आहे? परंतु सत्ता आणि सत्तेला अर्थ पुरवठा करणारे उद्योगपती यांचे झोल झपाटे उघडकीस येऊ नयेत म्हणून केंद्र सरकारने आता थेट त्यांच्या विरोधात बोलणाऱ्यांचाच आवाज कायमचा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून केंद्र सरकार लवकरच डीपी डीपी म्हणजेच डिजिटल डेटा पर्सनल प्रोटेक्शन नावाचा कायदा आणणार आहे. या कायद्यान्वये कोणीही एखाद्याचे नाव घेऊन बोलणार असेल, तर प्रथम त्याने त्या व्यक्तीची परवानगी घ्यायला हवी. याचा सर्वाधिक फटका प्रसार माध्यमांना बसणार आहे. कारण एखाद्या भ्रष्टाचारी नेत्याच्या विरोधात लिहायचं झाल्यास किंवा इलेक्ट्रॉनिक मीडियावर आवाज उठवायचा झाल्यास कोणताही पत्रकार त्या नेत्याच्या परवानगीशिवाय त्याचे नाव घेऊ शकत नाही. जर त्यांनी तसे केले तर त्याला अडीचशे कोटींचा दंड ठोठावला जाईल. हा दंड भरला नाही तर दंडाची रक्कम दुप्पट म्हणजेच ५०० कोटी होऊ शकते. आता पत्रकारितेत काम करणाऱ्या लोकांना फार फार लाखभर पगार असेल. मग ज्याला लाखभर पगार आहे तो माणूस ५०० कोटी रुपये कसे आणि कुठून भरणार? आणि त्याने का भरावे? अभिव्यक्ती स्वातंत्र्यअंतर्गत जो भ्रष्टाचाराविरुद्ध किंवा चुकीच्या गोष्टीविरुद्ध आवाज उठवण्याचा अधिकार घटनेने दिलेला आहे, त्या अधिकाराच्या अंतर्गतच पत्रकार असो, आरटीआय कार्यकर्ता असो, किंवा अन्य सामाजिक संस्था असो, नेहमी काम करत असतात. आणि त्याचा अर्थातच समाजाला फायदा होत असतो. परंतु आता या सर्वांचा आवाज दाबण्यासाठी डीपी डीपी कायदा सरकार आणणार आहे. केंद्रात तसे पाहता सरकारचे बहुमत नाही. केंद्र सरकार केवळ नितीश कुमार आणि चंद्राबाबूच्या टेकूवर उभे आहे. जर केंद्राने या बाबतचे विधेयक संसदेत आणण्याचा प्रयत्न केला आणि त्याला चंद्राबाबू किंवा नितीश कुमार यांनी पाठिंबा दिला तर या दोघांचेही त्याच्या राज्यातली जनता कपडे उतरल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे चंद्राबाबू आणि नितीश कुमार यांची मोठी अडचण झालेली आहे. वास्तविक स्वतःच्या पदरात काहीतरी पाडून घेण्यासाठी या लोकांनी केंद्रातील मोदी सरकारला पाठिंबा दिला होता. कारण मागील लोकसभा निवडणुकीत लोकांनी मोदी सरकारला डोळे झाकून मतदान केले नव्हते. परिणामी एनडीएला पूर्ण बहुमत मिळालेले नाही आणि म्हणूनच चंद्राबाबू आणि नितीश कुमार यांच्यासारख्या दलबदलूंच्या पाठिंब्यावर मोदींनी सरकार बनवले. पण त्यांच्या राज्यातील जनतेला हे आवडलेले नाही. त्यामुळे चंद्राबाबू आणि नितीशकुमार यांना अधून मधून केंद्र सरकारच्या विरुद्ध भूमिका घ्यावी लागते. आताही डीपीडीपी ॲक्ट अन्वये जर केंद्राने देशातील पत्रकारांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला, किंवा माहितीच्या अधिकाराचा कायदा रद्द करण्याचा प्रयत्न केला, तर ती या देशातील दुसरी आणीबाणी ठरू शकते आणि त्याच्या विरोधात लोक रस्त्यावर उतरू शकतात. अशा वेळी सत्ताधारी पक्षांचे स्वतःला कार्यकर्ते म्हणून घेणारे जे अंधभक्त आहेत त्यांनाही मार खावा लागेल. कारण लोक भयंकर चिडलेले आहेत. आज तुमच्याकडे बहुमत आहे म्हणून कशाही प्रकारे तुम्ही लोकांची मुस्कटदाबी करू शकता का? अजिबात नाही! कुणालाही तसे करता येणार नाही. अगोदरच २०१४ पासून या देशात जे काही चाललेले आहे त्यावर जनता प्रचंड नाराज आहे. लोकशाही पद्धतीने चालणाऱ्या सरकारमध्ये एका बड्या उद्योगपती विरुद्ध खासदार किंवा जनतेने आवाज उठवल्यानंतर सरकारकडून योग्य उत्तर दिले जात नाही. पंतप्रधान त्याबाबत मौन बाळगून असतात. हे लोकशाहीसाठी योग्य नव्हते. परंतु संपूर्ण देशाने पाहिले की कशाप्रकारे सरकार बड्या उद्योगपतींना पाठीशी घालत आहे. आणि आता तर झोलझपाटे करणाऱ्यांना डीपी डीपी संरक्षण मिळणार आहे. कारण कोणाच्याही विरुद्ध लिहायचे झाल्यास किंवा बोलायचे झाल्यास त्याची परवानगी घ्यावी लागणार आहे. आता ज्या माणसाने गुन्हा केलेला आहे, जो माणूस भ्रष्टाचारी आहे, तो आपल्या विरुद्ध लिहिण्याला किंवा बोलण्याला परवानगी देऊ शकतो का? ज्याने कोणी हा कायदा आणलाय त्याला एवढी तरी अक्कल असायला हवी होती. की आपण काय करीत आहोत. असा प्रकार २००८ मध्ये राजस्थानत तत्कालीन मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांनी केला होता. त्यांनीही पत्रकारांचा आवाज दाबणारा कायदा आणला होता. परंतु अवघ्या काही महिन्यातच हा कायदा रद्द करण्याची नामुष्की वसुंधरा राजेंवर ओढावली. मग जे वसुंधरांना करता आले नाही ते आता केंद्र सरकार साध्य करण्याच्या प्रयत्नात आहे. परंतु भारतीय जनता हे कदापी साध्य होऊ देणार नाही. त्याचबरोबर या देशातील मीडियाची ताकद इतकी जबरदस्त आहे की, अशा प्रकारची आणीबाणी कदापी लोक सहन करणार नाही. काही मूठभर मीडियाकर्मी किंवा ज्यांना गोदी मीडिया म्हणतात ते भलेही एनडीएच्या तुकड्यांवर जगत असतील, आपले इमान विकून सरकारची बाजू मांडत असतील, परंतु बहुसंख्या पत्रकार हे आज जनतेच्या बाजूने उभे आहेत. त्यामुळेच कुणाल कामरासारख्या स्टँडअप कॉमेडीयनला लोकांनी डोक्यावर घेतले. आणि लोकांचा हाच पाठिंबा पाहून कुणालने माफी मागण्यास नकार दिला. ही वस्तुस्थिती सत्ताधारी नेत्यांनी आणि सत्तेत सामील असलेल्या पक्षाने नजरेआड करू नये. आपल्या विरुद्ध लोकमत उभ राहत आहे, आपल्या विरुद्ध जन प्रक्षोभ उसळायला सुरुवात झाली आहे, याची जाणीव लक्षात घेऊन त्यांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गळा घोटण्याचे बंद करावे. अन्यथा त्याची फार मोठी किंमत त्यांना मोजावी लागेल.

## मिरारोड येथे नवीन शिधावाटप कार्यालयाची लवकरच निर्मिती होणार



**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

मिरा- भाईंदर शहरात एकच शिधावाटप कार्यालय उपलब्ध असल्याने लोकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत होती. यावर उपाय म्हणून मिरा- भाईंदर शहरातील भाजप आमदार नरेंद्र मेहता यांनी मिरारोड येथे नवीन शिधावाटप कार्यालयाची निर्मिती करण्याची मागणी पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. या प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्वरित कार्यवाही करण्याचे आदेश संबंधित विभागाला दिले. त्या आदेशानुसार विभागाने यापूर्वी उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली ५ मार्चच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार वित्त विभागाने दिलेले निर्देश विचारात घेता, नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई या कार्यालयाकरता सुधारित आकृती बंधानुसार मंजूर पदांव्यतिरिक्त नवीन अणुशक्तीनगर कार्यालयाकरता नव्याने पदनिर्मिती न करता, पदांचे कार्यालय निहाय पुर्नवर्गीकरण करून, सदरचा प्रस्ताव उपसमितीसमोर सादर करण्याचे व उक्त नवीन कार्यालय निर्माण करण्याची कार्यवाही एक महिन्यात करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसे पत्र अन्न नागरी पुरवठा ग्राहक संरक्षण विभागाचे कक्ष अधिकारी जगदीश खेडकर यांनी नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा अधिकारी मुंबई यांना दिले आहेत. मिरा भाईंदर हे शहर मुंबई लगतचे महत्वाचे शहर असून सध्याची शहराची लोकसंख्या १५ लाख इतकी आहे. दरवर्षी ३० ते ५० हजारांनी ही लोकसंख्या वाढत आहे. सदर लोकसंख्येच्या तुलनेत मिरा- भाईंदर शहरात केवळ एकच शिधावाटप कार्यालय उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांना पत्ता बदलणे, नवीन रेशन कार्ड काढणे, नाव कमी करणे इत्यादी महत्वाच्या कामाकरिता एकच कार्यालय असल्याने अनेक दिवस वाट पहावी लागते. यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. यावर उपाय म्हणून मिरा-भाईंदर शहरात मिरारोड येथे नवीन शिधावाटप कार्यालय स्थापन केल्यास याचा फायदा नागरिकांना होईल या उद्देशाने स्थानिक आमदार नरेंद्र मेहता यांनी मागणी केली होती. त्यामुळे माननीय मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार आणि वित्त विभागाच्या यापूर्वी झालेय बैठकीच्या अनुषंगाने नवीन शिधावाटप कार्यालय मिरारोड येथे निर्माण झाल्यास मिरा-भाईंदर शहरातील नागरिकांची होणारी गैरसोय कमी होणार आहे.

## नारीशक्ती सन्मान पुरस्कार सोहळा २०२५ प्रदान समारंभ




**मुंबई/प्रतिनिधी**

मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी (रजि) अंतर्गत विविध क्षेत्रातील गुणिजनांना राज्यस्तरीय गुणिजन व नारीशक्ती सन्मान पुरस्कार २०२५ दादर मुंबई येथे प्रदान करण्यात आले. यावेळी मार्गदर्शक व संमेलन समारंभ अध्यक्ष म्हणून डॉ. सुनील सावंत (कवी), नंदू सावंत (साहित्यिक), सारिका जाधव (सायबर सुरक्षातज्ञ), नलिनी सोमवंशी (सामाजिक कार्यकर्त्या) इत्यादी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी कविता, लोकगीते, बदलते समाज जीवन यावर मार्गदर्शन केले. आज एकूण विविध क्षेत्रातील एकूण ४० महिला व १० पुरुषांना सन्मानित करण्यात आले. सौ दिपाली परब यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. आजच्या संमेलनात युवा वर्गातील विशेष योगदानात कु कल्पना सावंत यांना सन्मानित करण्यात आले. कु कल्पना दर्शना दिलीप सावंत यांनी महाराष्ट्रातील विविध लेण्यांतील ब्राम्ही शिलालेखांचे अध्ययन व संकलन, ऐतिहासिक मोडी कागदपत्रांतील स्त्रिया व स्त्रीदेवता विषयक १००० हून अधिक नोंदीचे संकलन व संशोधन, भारतातील प्राचीन खेळ (बुद्धिमत्ता) यांवर सातत्याने संशोधन व शालेय विद्यार्थ्यांना अभ्यासपूर्ण मार्गदर्शन, शालेय विद्यार्थ्यांसाठी मोडी लिपी, ब्राम्ही लिपी, संस्कृत भाषा, प्राचीन कथा यांसाठी विशेष मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजन, प्राचीन खेळांचे (बुद्धिमत्ता/ युद्धशास्त्र) महत्व वाढविण्यासाठी विशेष प्रदर्शन व मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन, विविध कार्यशाळा, शासकीय परीक्षा, शालेय प्रशिक्षण, विविध मंडळे आयोजित मोडी लिपी व ब्राम्ही लिपी प्रशिक्षण वर्गात विशेष गुणांनी उत्तीर्ण, पेशवेकालीन स्त्री जीवन यांवर विशेष अध्ययन व संकलन या अनेक विषयावर गेली पाच वर्षे महत्वाचे योगदान देऊन एक आदर्श निर्माण केला आहे. मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी अंतर्गत पुरस्कार सोहळ्याचे हे २५वे वर्षे आहे.

## जिल्हा परिषदेच्या ४६ कामांचे पारदर्शक पद्धतीने वाटप पूर्ण!



**पालघर/प्रतिनिधी**

पालघर जिल्हा परिषदेच्या जिल्हा कामवाटप समितीच्या वतीने २७ मार्च २०२५ रोजी कामवाटप सभेचे आयोजन करण्यात आले. यासाठी जिल्हा परिषदेच्या विविध विभागांनी मंजुरी दिलेली १० लाख रुपयांपर्यंतची एकूण ४६ कामे बांधकाम विभागाच्या कार्यालयाच्या नोटीस फलकावर ठळकपणे प्रकाशित करण्यात आली होती. जिल्हा कामवाटप समितीचे अध्यक्ष, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच सचिव व कार्यकारी अभियंता जागृती संखे यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही सभा हुतात्मा सभागृह, जिल्हा परिषद, पालघर येथे पार पडली. जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंते आणि मजूर कामगार सहकारी संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने या प्रक्रियेत सहभागी झाले. पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने लॉटरी प्रक्रियेच्या माध्यमातून १.४६ लक्ष रक्कमेची एकूण ४६ विकासकामांचे वाटप करण्यात आले. या प्रक्रियेमुळे जिल्ह्यातील अभियंते आणि स्थानिक सहकारी संस्थांना संधी मिळाली असून, विकासकामे वेगाने आणि न्याय्य पद्धतीने पूर्ण होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## जिल्ह्यातील वनक्षेत्रातील अतिक्रमणामुळे वनक्षेत्र ८७ चौरस किलोमीटरने घटले!

**पालघर/प्रतिनिधी**

वनक्षेत्रातील अतिक्रमणामुळे पालघर जिल्ह्यासह राज्यातील वनक्षेत्र घटले आहे. ते रोखण्यासाठी आता वनखाते सक्रीय झाले आहे. वनजमिनीवरील अतिक्रण रोखण्यासाठी डिफरेंशियल ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीमद्वारे (डीजीपीएस) सर्वेक्षण करून सिमा निश्चित करणे आणि व्अतिक्रमणांवर कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. 'इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट रिपोर्ट' च्या अहवालात पालघर जिल्ह्यातील वनक्षेत्र ८७ चौरस किलोमीटरने घटल्याचे नमूद केले होते. विधीमंडळात हा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर वनमंत्र्यांनी ही माहिती दिली. नैसर्गिक वनसंपदा असलेल्या पालघर जिल्ह्यातील वनक्षेत्र तब्बल ८७ चौरस किलोमीटर घटल्याचा अहवाल 'इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट रिपोर्ट' (आयएसएफआर) या संस्थेने दिला होता. भूमाफियांकडून होणारे भराव, बांधकामे आणि झांडाची कत्तल होत असल्याने हिरवा पट्टा नष्ट होऊ लागला आहे. वसई विरार मध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे होत आहे. त्यात सर्वाधित बांधकामे ही वनखात्याच्या जागेवर होत आहेत. राजवली, वाघरळ पाडा येथे वनखात्याच्या जमिनीनवर जंगलतोड करून मोठमोठ्या अनधिकृत वसाहती उभ्या राहिल्या आहेत.

राज्यातील २४ जिल्ह्यातील १ हजार ७७८ वनक्षेत्र घटले असून त्यात सर्वाधिक घट ही पालघर जिल्ह्यातील आहे. याबाबतचे वृत्त लोकसत्ताने प्रसिध्द केले होते. या वृत्त आणि अहवालाचा संदर्भ देत आमदार स्नेहा दुबे पंडित यांनी विधीमंडळात प्रश्न उपस्थित करून वनक्षेत्र घटत असल्याबाबत चिंता व्यक्त केली होती. त्यावर उत्तर देतांना वनमंत्री गणेश नाईक यांनी वनक्षेत्र वाचविण्यासाठी शासनाच्या उपाययोजनांची माहिती दिली. वनजमिनीवरील अतिक्रण रोखली जातील तसेच झालेली बांधकामे निष्काषित करण्यात येतील. त्यासाठी 'डीजीपीएसऋद्वारे सर्व्हे करून सीमानिश्चित करून संवेदनशील क्षेत्राचे सर्व्हेक्षण आणि सीमांकन करण्यात येत असल्याची माहिती नाईक यांनी दिली. ज्यांनी वनक्षेत्रात अतिक्रमण केले आहे अशांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ अंतर्गत कलम ५३, ५४ खाली नोटीस देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. वनक्षेत्र संरक्षणाच्या दृष्टिकोनातून नियमित रात्रगस्त, वनोपज तपासणी नाका बळकटीकरण तसेच दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येत असल्याचे ते म्हणाले. अतिक्रमण निर्मूलनासाठी जिल्हाधिकारी, वसई-विरार महानगरपालिका, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ तसेच जिल्हा परिषद विभाग यांच्यासोबत समन्वय साधण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले. डहाणू वन विभागात सार्वजनिक आणि विकासात्मक प्रकल्पांसाठी नवसंवर्धन कायद्यांतर्गत केंद्र शासनाच्या पूर्वपरवानगीने वृक्षतोड झाली आहे. त्या बदल्यात पर्यायी वनीकरण राज्यातील इतर जिल्ह्यांत प्रस्तावित असल्याची माहिती वनमंत्र्यांनी दिली. वन विभागाच्या क्षेत्रावर अवैध वृक्षतोड आणि अवैध वाहतूक आढळून आल्यास भारतीय वन अधिनियम १९२७ च्या अंतर्गत दोषींविरोधात वन गुन्हे नोंदविण्यात आले आहेत तसेच संबंधित दोषींविरोधात नुकसान भरपाई वसूल करणे, वाहने जप्त करणे, दंड आकारणीसह अन्य दंडात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत, अशी माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी या वेळी दिली. महाराष्ट्र देशातील सर्वाधिक म्हणजे १४,५२५ चौ.कि.मी इतके सर्वात जास्त वृक्षाच्छादन आहे. 'इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट रिपोर्ट' (आयएसएफआर) अहवालानुसार २०२१ ते २०२३ या दोन वर्षात राज्यातील ३६ पैकी २४ जिल्ह्यांनी एकूण १ हजार ७७८ चौ.कि.मी. खुले जंगल आणि २६७ चौ.कि.मी. झुडपी जंगल गमावले आहे. त्यात सर्वाधिक ८७ चौरस किलोमीटर वनक्षेत्र पालघर जिल्ह्यातील घटले आहे.

## दलित वस्तीच्या कामातील भ्रष्टाचाराची चौकशी व कारवाईची मागणी

**वाडा/प्रतिनिधी**

दलित वस्तीमध्ये झालेल्या निकृष्ट कामांची सविस्तर चौकशी करुन संबंधित ठेकेदार , उभियंता व संबंधीत अधिकारी यांनी संगनमताने जाणीवपूर्वक दलित वस्तीच्या कामात भ्रष्टाचार केल्यामुळे अनुसूचित जाती / जमाती कायदयान्वये फौजदारी कारवाई करणे व दलित वस्तीच्या निधीतून खाजगी सोसायटीच्या सुशोभिकरणाचे काम करुन शासनाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप करत सिद्धार्थ नगर येथील रहिवासीयांनी वाडा नगरपंचायत कार्यालयात लेखी निवेदन दिले आहे. वाडा शहरातील सिध्दार्थनगर ते रोहिदास नगर अंदाजे ३० वर्षापूर्वी समाज कल्याण जि.प. ठाणे यांचे मार्फत रस्त्याचे कॉक्रीटीकरणाचे काम अतिशय चांगल्या प्रकारे करण्यांत आले होते. परंतु आता नगरपंचायत द्वारे नव्याने करण्यात आलेले रस्त्याचे व गटारीचे काम निकृष्ठ दर्जेचे व अंदाजपत्रा अनुसरुन करण्यात, आलेले नाही. सदरच्या गटारीमध्ये कुठल्याही प्रकारे स्टीलचा वापर झालेला नाही. फक्त खडी, सिमेंटने गटारी केल्या आहेत. तसेच अंदाजपत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे गटारीवर साफ सफाई करण्यासाठी जागा ठेवलेली नाही जर गटारी तुंबल्यातर दलित वस्तीमध्ये रोगराई पसरण्याची शक्यात नाकारता येणार नाही. रस्त्याची उंची व काम अंदाजपत्रानुसार न करता ठेकेदाराच्या मर्जीने करण्यांत आले आहे. हे काम निष्कृष्ट दर्जाचे झाले आहे यामध्ये दलितवस्तीसाठी सरकारकडून देण्यांत आलेल्या निधीचा मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे असे निर्देशनास येत असल्याचे निवेदनात म्हंटले आहे. तसेच पंचायत समिती कार्यालय समोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजगृह जि.प. समाज कल्याण निधीमधून बांधकाम करुन समाजाच्या ताब्यात दिलेले असतांना सदर समाजगृहाचे दोन ते तीन वेळा समाजाला विश्वासात न घेता दुरुस्ती केली आहे. त्यासाठी किती निधी आला याची समाज बांधवाना कल्पना देण्यांत आलेली नाही. आतापर्यत समाजगृहाचा वापर नसतांना देखील दोन ते तीन वेळा समाजगृहाची दुरुस्त करणे हा सुध्दा शासनाची दिशाभूल करुन अधिकाऱ्याकडून भ्रष्टाचार करण्यांत आला आहे. त्याची देखील चौकशी होऊन कारवाई होणे गरजेचे आहे. नगरपंचायतच्या संबंधित अधिकाऱ्याकडून दलित समाजाला विचारात न घेता रात्रीच्या वेळी ठेकेदारांकडून अचानकपणे कामाची सुरुवात करण्यांत आली सदर ठिकाणी ३० वर्षापासुनचे अगोदर सिध्दार्थनगर रहिवासी यांनी केलेले पायाचे बांधकाम रात्रीच्या वेळी नगरवासीयांना कुठल्याही प्रकारची पूर्व कल्पना न देता अगर चर्चा न करता सदरचे कामास मंजूरी देण्यांत आली आहे. सदर काम करतांना समाजाला विश्वासात घेऊन किंवा चर्चा करणे बंधनकारक असतांना देखील नगर पंचायत प्रशासनाने मनमानी करुन दलित निधीचा गैरवापर करुन तो लाटण्याचा प्रयत्नं करण्यांत आला आहे. सदर समाजगृह हे दलित समाजाच्या मालकीचे असून त्याची देखभाल समाजगृह स्थापन झाल्यापासुन सिध्दार्थनगरवासीय करीत असल्याने सदरचे काम पूर्ण झाले असेल तर ते ताब्यात देण्यांत यावे.अन्यथा या संबंधी आंदोलन करावे लागेल असा इशारा निवेदनातून केले आहे. या निवेदनावर पन्नासुन अधिक नागरिकांनी सह्या करून कारवाईची मागणी केली आहे.

## लोक अदालतीतून ५ हजार ९२७ ग्राहकांच्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा

**कल्याण/प्रतिनिधी**

तालुकास्तरावर २२ मार्चला आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीतून कल्याण व भांडुप परिमंडलातील कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित तसेच वीजचोरीची दाखलपूर्व व प्रलंबित अशी ५ हजार ९२७ प्रकरणे तडजोडीद्वारे निकाली काढण्यात आली. महावितरणच्या उपलब्ध सवलतीचा लाभ घेत संबंधित ग्राहकांनी ७ कोटी ८६ लाख रुपयांचा भरणा केला. कल्याण व भांडुप परिमंडलातील कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित केलेल्या तसेच वीज चोरीची दाखलपूर्व व प्रलंबित प्रकरणे सामंजस्याने सोडवण्यासाठी लोक अदालतीत ठेवण्यात आली होती. कल्याण परिमंडलांतर्गत ५ हजार ६१८ प्रकरणांमध्ये तडजोड होऊ शकली व ७ कोटी ५२ लाख रुपयांचा भरणा झाला. तर भांडुप परिमंडलांतर्गत ३३ लाख ३२ हजार रुपयांचा भरणा करणाऱ्या ३०९ ग्राहकांच्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. ठाणे, रायगड आणि पालघर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सहकार्याने तसेच भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे व कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणि मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक अभियंते, महावितरणच्या विधी विभागाने लोक अदालत यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

## वसईत घोंसालविस गोठा येथे वयोवृद्ध नागरिकांसाठी आरोग्य शिबिर संपन्न



**विरार/प्रतिनिधी**

एवन ग्रेशीयस वृद्धाश्रमाच्या संस्थापिका सिस्टर अलका फर्नांडिस आणि सामाजिक कार्यकर्ते अँथोनी डीकून्हा यांच्या पुढाकाराने ट्री हाऊस स्कूल समोर, घोंसालविस गोठा, कचेरी रोड, वसई येथे ज्येष्ठ नागरिकांचे विशेष आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले होते. बेसिन कॅथोलिक बँकेने ह्या शिबिर आयोजनासाठी मोलाचा आर्थिक हातभार लावला. तर कार्डिनल ग्रेशियस हॉस्पिटलच्या वैद्यकीय डॉक्टर व नर्सेस या वैद्यकीय टीमने उपस्थित ज्येष्ठ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी व चिकित्सा करून त्यांना मोलाचा आरोग्य विषयक सल्ला दिला. एवन ग्रेशीयस वृद्धाश्रमाच्या ज्येष्ठ नागरिकांनी व आसपासच्या परिसरातील नागरिकांचीही आरोग्य तपासणी करून घेतली. त्यांना मोफत औषधे देण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विव्हियन घोंसालविस, जोसेफ फर्नांडिस आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित पाहुण्यांनी आरोग्य शिबिरास सदिच्छा भेटी देऊन वृद्धाश्रमातील वरिष्ठ नागरिकांची आपुलकीने विचारपूस करून त्यांचे मनोबल वाढवले. ह्या मोफत आरोग्य तपासणी शिबिरासाठी एवन ग्रेशीयस वृद्धाश्रमाच्या संस्थापिका सिस्टर अलका फर्नांडिस, ग्रेसी अलेक्स फर्नांडिस, प्रकाश आल्मेडा यांचे मोलाचे योगदान लाभले. एवन ग्रेशीयस वृद्धाश्रमाच्या संस्थापिका सिस्टर अलका फर्नांडिस तसेच शिबिराचे आयोजक अँथोनी डीकून्हा यांनी शेवटी बेसिन कॅथोलिक बँकेचे आभार मानले.

## पालघर जिल्हा प्लास्टिक मुक्त करण्याच्या निर्धार-पालकमंत्री




**पालघर/प्रतिनिधी**

पालघर जिल्हा सायबर गुन्हे मुक्त करण्याच्या मनोदय पाठोपाठ जिल्हा दोन महिन्यात स्वच्छ, दुर्गंधी मुक्त करण्याच्या दृष्टीने प्लास्टिक बंदीची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या निर्धार पालकमंत्री गणेश नाईक यांनी पालघर येथील जनता दरबार दरम्यान व्यक्त केला. ज्या स्थानिक स्वराज्य संस्था आपल्या हद्दीत प्लास्टिक मुक्ती करू शकणार नाही त्याचे शासकीय अनुदान बंद करण्यात येईल असे सज्जड दम भरला. पालघरचे पालकमंत्रीपद स्वीकारल्यानंतर दुसऱ्या जनता दरबारचे आयोजन आज (ता.२८) जिल्हा नियोजन भवनात करण्यात आले होते. त्या प्रसंगी पालक मंत्री उपस्थितांना संबोधित करताना बोलत होते. राष्ट्रीय महामार्गावरून प्रवास करताना थेट घोडबंदर-वर्सोवा पासून पालघर जिल्ह्याच्या हद्दीपर्यंत प्रवास करताना राष्ट्रीय महामार्गाच्या दुतर्फा व विविध ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये साचलेला कचऱ्याच्या ढिगारे पाहून आपण व्यथीत झाल्याचे पालकमंत्री यांनी सांगितले. पालघर जिल्ह्यातील विविध भागांमध्ये स्वच्छता तसेच दुर्गंधी मुक्त करण्यासाठी पालघर स्वच्छ व प्लास्टिक मुक्त जिल्हा अभियानाचा शुभारंभ केला. पुढील दोन महिन्यात याची प्रभावी अंमलबजावणी न झाल्यास ग्रामपंचातीचे शासकीय अनुदान बांधकारण्यात येईल असे त्यांनी सांगितले. परिसरातील स्वच्छता राखण्यासोबत जिल्हा दुर्गंधी मुक्त करण्यासाठी उपाय सुचविताना पालकमंत्री यांनी पावसाच्या पाण्याचा तसेच सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी व्यवस्था करण्याची सूचना ग्रामपंचायतींना दिली. सांडपाण्यामधून दुर्गंधी दूर करण्यासाठी त्यांनी केळीची लागवड करण्याच्या सूचना दिलेल्या. तळ कोकणात सुरंगी झाडांना उष्माच्या दोन महिन्यात येणाऱ्या सुगंधी फुलांमुळे परिसर प्रफुलित होत असतो. या धर्तीवर पालघर जिल्ह्यात वन विभागातर्फे जिल्ह्यात किमान ५००० सुरंगीची झाडं लावण्याचा मनोदय वनमंत्री गणेश नाईक यांनी जनता दरबार द्यावे जाहीर केले. गणेश नाईक यांनी आपल्या महाविद्यालयीन दिवसांच्या काळात धूम्रपान करण्यासाठी दूरवर आडोशाला जाण्याची पद्धत होती. नंतर समाजात वावरताना ती व्यक्ती किमान दोन अनेकदा चूळ भरून पुढे येत असत. पण सध्यस्थितीत महाविद्यालयाने विद्यार्थीच नव्हे तर शालेय विद्यार्थी देखील सिग्रेट राजरसपणे ओढताना दिसत असून अनेकदा त्यामध्ये नशा देणाऱ्या अमली पदार्थांचा सेवन होत असल्याचे दिसून येत असल्याचे पालकमंत्री यांनी सांगितले. यावर रोख लावण्यासाठी पोलीस अधीक्षक यांनी आपल्या कर्मचाऱ्यांमार्फत शाळा महाविद्यालयांसमोर असणाऱ्या पान टपऱ्या यांच्यावर छापे टाकून जिल्हा पुढील दोन महिन्यात नशा मुक्त करावा अशा प्रकारच्या सप्त सूचना दिल्या. दृष्टाला दृष्टाप्रमाणेच वागणूक द्यायला हवी असे सांगत ही कारवाई करताना कोणी वरिष्ठांची शिफारस आणल्यास त्यांना माझ्याशी बोलण्यास सांगा असे गणेश नाईक यांनी जाहीरपणे सांगितले.

## बंदुकधारी दरोडेखोरांना दंडुक्याच्या आधारे सराफा व्यापाऱ्याने लावले हुसकून



**पालघर/प्रतिनिधी**

केळवे रेल्वे स्थानकापासून जवळच असणाऱ्या माँ ममता गोल्ड या दागिन्यांच्या दुकानात गुरुवारी सायंकाळी तीन अज्ञात आरोपींनी बंदुकीचा धाक व दगडफेक करून चोरी करण्याचा प्रयत्न केला. मात्र सराफ दुकानदाराने आरडाओरडा केल्याने आजूबाजूचे नागरिक धावून आल्याने तीन अज्ञात आरोपींनी तेथून पळ काढला. गुरुवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास केळवे रेल्वे स्थानकाला लागूनच असलेल्या सराफाच्या दुकानात खरेदीकरिता गर्दी होती. यावेळी दुकानाबाहेर ३ अज्ञात आरोपी दुकान लुटायच्या तयारीत आले होते. त्यातील एका आरोपीने मारण्याचा धाक दाखवून लुटण्याचा प्रयत्न केला असता दुकानदाराने लाकडी दांडका काढून आरडाओरडा केला. यादरम्यान आरोपीने दुकानाबाहेर जाऊन तिन्ही आरोपींनी एअरगनचा आवाज करून दुकानाच्या काचांवर दगडफेक केली. मात्र आजूबाजूचे नागरिक धावून आल्याने चोरांनी तेथून पळ काढला. याबाबत सफाळे पोलीस ठाण्यात जबरी चोरी करण्याच्या प्रयत्नाबाबत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू असल्याचे सफाळ्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्ता शेळके यांनी सांगितले.

## नवीन मतदार नोंदणीबाबत बविआचे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन



**विरार/प्रतिनिधी**

नवीन मतदार नोंदणीसंदर्भातील कामांचा आढावा येत्या महिन्यात पालघर जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने घेण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर नवीन मतदार नोंदणी, मतदार यादी अपडेटेशन आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या अडचणी या अनुषंगाने बहुजन विकास आघाडीने कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. मनवेलपाडा-कारगिल नगर येथील जेपी स्कूलमध्ये आयोजित या कार्यक्रमात बविआचे संघटक सचिव अजीव पाटील व माजी नगरसेवक विलासबंधू चोरघे यांनी मार्गदर्शन केले. नवीन मतदार नोंदणी करताना अनेकदा नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागतो. या अडचणी दूर व्हाव्यात आणि नागरिकांना सहजसोप्या पद्धतीने नोंदणी करता यावी, याकरता वॉर्ड क्र. २५,२६,२७,२८,३०,३७ अंतर्गत विभागीय कमिटी पदाधिकारी, मतदार यादीनिहाय पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला मंडळ कार्यकर्ते यांच्या मार्गदर्शन सभेचे आयोजन करण्यात आले होते. याशिवाय; एकाच कुटुंबातील सदस्यांना वेगवेगळ्या ठिकाणी मतदान करावे लागते. अनेकदा त्यांचे पत्ते वेगवेगवळ्या ठिकाणी नोंदवलेले असतात. अशा अनेक समस्या-अडचणी दूर करून या नागरिकांना एकाच ठिकाणी मतदान करता यावे, याकरताही मार्गदर्शन करण्यात आले. दरम्यान वसई-विरार पालिका प्रभाग समिती 'बी' मधील वॉर्ड क्रमांक २५, २६, २७, २८, ३० आणि ३७ च्या नागरिकांना विविध सोयीसुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने आवश्यक विकासकामांना लवकरात लवकर मंजुरी मिळावी, या मागणीचे निवेदन घेऊन बहुजन विकास आघाडीच्या शिष्टमंडळाने आयुक्त अनिल पवार यांची भेट घेतली होती. माजी स्थायी समिती सभापती प्रशांत राऊत यांच्या नेतृत्त्वात या शिष्टमंडळाने या सर्व विभागांतील अनेक कामे मार्गी लावण्याकरता आयुक्तांकडे मागणी केली होती. या सर्व कामांची माहितीही या मार्गदर्शन कार्यक्रमा दरम्यान उपस्थित नागरिक आणि कार्यकर्त्यांना देण्यात आली. या वेळी प्रशांत राऊत, चिरायू चौधरी, कुमुदिनी चौधरी, मीनल पाटील, संगीता भेरे, हेमांगी पाटील आणि बहुजन विकास आघाडी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी आमदार हितेंद्र ठाकूर, प्रथम महापौर राजीव पाटील, माजी आमदार क्षितिज ठाकूर आणि संघटक सचिव तथा माजी स्थायी समिती सभापती अजीव पाटील यांच्या मार्गदर्शनात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती प्रशांत राऊत यांनी दिली.

## गुन्ह्यात लहान मुलांचा वापर चिंताजनक -ॲड.पल्लवी जाधव

**डोंबिवली/प्रतिनिधी**



अलीकडे गुन्ह्यांमध्ये लहान मुलांचा प्रभावीपणे वापर केला जात आहे. हे चिंताजनक आहे. अशाप्रकारच्या अपप्रवृत्ती रोखण्यासाठी नागरिकांनी सजग राहाणे आवश्यक आहे. याशिवाय दत्तक केंद्रातून मुले दाम्पत्यांना दत्तक देताना या सगळ्या प्रकारामुळे विशेष काळजी घेतली जात आहे, अशी माहिती ठाणे जिल्हा बाल संरक्षण अधिकारी ॲड. पल्लवी जाधव यांनी येथे एका कार्यक्रमात दिली. डोंबिवली महिला महासंघातर्फे महिला दिनाचे औचित्य साधून जिल्हा महिला व बाल विकास विभागाच्या संरक्षण अधिकारी रेखा हिरे, बाल संरक्षण अधिकारी ॲड. पल्लवी जाधव यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी महासंघाच्या अध्यक्ष सनदी लेखापाल जयश्री कर्वे, उपाध्यक्ष नेत्रा फडके, कोषाध्यक्ष सुनीती रायकर, महासंघ अध्यक्षा डॉ. विंदा भुस्कुटे, ज्येष्ठ पत्रकार सई बने आणि इतर मान्यवर उपस्थित होत्या. अलीकडच्या काळात गुन्ह्यांमध्ये लहान मुलांचा प्रभावीपणे वापर केला जात आहे. लहान मुलांवर झटकन संशय घेतला जात नाही. त्यामुळे चोरी किंवा अन्य गुन्ह्यांसाठी लहान मुलांचा वापर करण्याकडे समाजकंटकांचा कल वाढत आहे. काही दाम्पत्य आम्हाला मुल होत नाही. आम्हाला मुल दत्तक घ्यायचे आहे असे सांगून दत्तक केंद्रात येतात. आणि मुल दत्तक घेतात. त्या मुलाचा नंतर गुन्हे करण्यासाठी वापर केला जातो. त्यामुळे दत्तक प्रक्रिया केंद्रातून मुल दत्तक देताना विशेष काळजी घेण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. शासकीय प्रक्रियेतून मुल दत्तक देताना त्या कुटुंबाची पार्श्वभूमी, मुल दत्तक घेतल्यानंतर दर दोन वर्षांनी त्या मुलाचा योग्यरितीने सांभाळ होतो की नाही याची माहिती घेतली जाते, असे ड. पल्लवी जाधव यांनी सांगितले. बेघर, अनाथ, पीडित मुलांच्या सुविधांसाठी शासनाच्या जेवढ्या योजना त्या योजनेतून त्या मुलांचा सांभाळ केला जातो, असे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागाप्रमाणे शहरी भागातही बालविवाहांचे प्रमाण अधिक आहे. जिल्ह्यात आतापर्यंत ४२ बालविवाह रोखण्यात यश आले आहे. मुलांच्या वागण्यात काही बदल जाणवत असतील तर पालकांनी वेळीच जागृत होणे आवश्यक आहे. जिल्ह्यात २५ बालगृह आहेत. दोन दत्तक संस्था, दोन निरीक्षण गृह आहेत, असे ॲड.जाधव यांनी सांगितले. शासनातर्फे प्रत्येक जिल्ह्यात महिला व बाल विभागाची स्थापन करण्यात आली आहे. बालके किंवा महिलांवर अत्याचाराच्या घटना घडल्यानंतर या विभागाकडून पीडितांना योग्य ते शासकीय सहकार्य केले जाते, असे महिला व बाल संरक्षण अधिकारी रेखा हिरे यांनी सांगितले. स्वरुपीनी भगिनी मंडळाच्या महिला सदस्यांनी ज्येष्ठ पत्रकार सई बने लिखित पीडित महिलेवरील अत्याचार विषयावरील पथनाट्य सादर केले. अहिल्या बाईंच्या जीवनावरील एकपात्री जीवनपट आरती मुनीश्वर यांनी सादर केला. प्राचार्या सुप्रिया नायकर यांनी सूत्रसंचालन केले.

## केशवसृष्टी ग्राम विकास योजनाअंतर्गत जागतीक जल दिन साजरा



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील साई निशेत येथे जागतीक जल दिन व गंगा पुजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रमासाठी आयाम प्रमुख संदेश बोरसे, नितिन शनवारे, राजेश रिकामे, मान्सुन कंपणीचे अशोक राऊत, अविनाश कुंभार तसेच अनेक शेतकरी या सर्वांच्या प्रमुख उपस्थित कार्यक्रम पार पडला. पाण्याचे महत्व व उपयोग या विषयी महत्व पटवून देण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वैतरणा नदिवर गंगापुजन नितिन शनवारे महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. गंगा पुजन व अभिषेक करण्यात आला. त्यानंतर उपस्थित शेतकऱ्याची शिवार फेरी करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. नितिन शनवारे यानी पाण्याचे महत्व सांगुन उपस्तित शेतकर्यांना संबोधित केले. राजेश रिकामे यांनी सुद्धा खुप मोलाचे मार्गदर्शन केले. मान्सुन कंपनीचे मॅनेजर आशोक राऊत यांनी भाजिपाला लागवड व मार्केटींग या विषयी मार्गदर्शन केले. काकडी लागवड, भांडवल पुरवीणे, मालाला हमी भाव देणे, पिकाची निवड करणे या विषयी मार्गदर्शन केले. संदेश बोरसे यांनी पाण्याचे महत्व सांगितले आणि या ठिकाणी उपस्थित कार्यकर्ता म्हणजे केशवसृष्टी आहे, केशवसष्टी ही वेगळी संस्था नाही आपणा सर्वांची आहे असे संबोधित करुन कार्यक्रमाचा समारोप केला.

## निलंगा आगार प्रमुखकाचा मनमानी कारभार; प्रवाशी वैतागले

**देवणी/प्रतिनिधी**

निलंगा आगारात सर्वात जास्त उत्पन्न देणाऱ्या उदगीर मार्गावरील बसच्या फेऱ्या कमी करून आगाराचे उत्पन्न कमी करणाऱ्या निलंगा आगार प्रमुखावर कडक कारवाई लातूर जिल्हा आगार व्यवस्थापकाने करण्याची मागणी होत आहे. निलंगा आगारात उदगीर वाहतूक करणाऱ्या बसचे उत्पन्न सर्वात जास्त आहे. या रस्त्यावर सतत प्रवाशी, नोकर वर्ग, शालेय विद्यार्थी, व्यापारी याची अधिक गर्दी असते. पूर्वी पासून दर तीस मिनिटांनी निलंगा उदगीर ही बस धावते. आता प्रवाशी संख्येत दुप्पट वाढ झाली आहे. त्या प्रमाणत बसची संख्या वाढणे अपेक्षित होते, तसे होण्याऐवजी आहे त्या बसची संख्या कमी करून आगार व्यवस्थापकाने प्रवाशाच्या भावनेशी खेळत आहे. या आगाराच्या गाड्या लातूर फेऱ्या अधिक मरतात मर्जीतील लोकांना सोयी नुसार रूट टाकले जात आहेत. भलेही त्या गाड्या रिकाम्या गेल्या तरी चालते. याचा परिणम उदगीर मार्गावरील प्रवास करणाऱ्या प्रवाशंना भोगावा लागतो, तासभर थांबूनही बस येत नाही आली तर प्रवाशी संख्या अधिक असल्याने महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी यांना गर्दीचा सामना करावा लागतो. अनेक प्रवाशी गर्दी पाहूनच बाजूला थांबतात. या बाबतीत नोकरवर्ग प्रवाशी आगर प्रमुखांना वारंवार बोलून सुद्धा त्याच्या तुघलकी कारभारात बदल घडून येत नाही. निलंगा आगारात बस ची संख्या कमी असल्याचे कारण सांगितले जाते. या मार्गावर प्रवाशाच्या भार कमी करण्यासाठी उदगीर आगराच्या गाड्याही बंद करण्यात आल्या. या बाबीची लातूर आगार व्यवस्थापकाने गंभीर दखल घेऊन वाहतूक व्यवथापनात दिरगाई केल्या प्रकरणी निलंगा आगार प्रमुखवर कारवाई करून उदगीर मार्गावरील वाहतूक सुरळीत करावी अशी मागणी प्रवाश्याकडून करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**

**यांत्रिकी भांडार व विकास विभाग, सहकार विद्या मंदिर समोर, जुना मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग कळवा, ठाणे पिन : ४०० ६०५**

**ई-मेल पत्ता :** eemsddkalwa@yahoo.co.in **दुरध्वनी क्रमांक :** ०२२-२५३७४७७

**ई-निविदा सूचना क्र. ३० सन २०२४-२०२५**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभागस, कळवा-ठाणे, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामांकरीता ई-निविदा B-1 नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ई-निविदा मागवित आहेत. ई-निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर ई-निविदा सूचना व निविदेसोबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग, कळवा-ठाणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| १. | कामाचे नाव | सुर्या उजवा कालवा ० ते ३४ कि.मी. मधील विविध आकाराची कालवाद्वारे निर्मिती, दुरूस्ती, उभारणी व इतर अनुषंगिक यांत्रिकी कामे. |
| | जिल्हा | पालघर |
| | निविदेची किंमत रुपये | रु. २२,२३,३७२/- |
| | कामाचे नाव | सुर्या उजवा कालवा ० ते ३४ कि.मी. मधील ०.८ X १.० मी.-२ नग व २.२ X २.४ मी. - ३ नग निर्मिती, दुरुस्ती, उभारणी व इतर अनुषंगिक यांत्रिकी कामे. |
| | जिल्हा | पालघर |
| | निविदेची किंमत रुपये | रु. २३,२३,५९४/- |

| | |
|---|---|
| निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक : ०७/०४/२०२५ ते दिनांक : १५/०४/२०२५ |
| निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक : १७/०४/२०२५ |


**जा.क्र. यांभाविवि/लेशा-२/८५८/सन २०२५**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयस
यांत्रिकी भांडार व विकास विभाग, कळवा - ठाणे.
दिनांक : २७/०३/२०२५

**सही/-**
**(सं.ना. रोकडे)**
**कार्यकारी अभियंता,**
**यांत्रिकी भांडार व विकास विभाग**
**कळवा-ठाणे**

**जिमाका/पालघर/जाहि २८९/१९५/२०२५ दिनांक : २८/०३/२०२५**

## स्वच्छ भारत अभियान २.० मध्ये उत्कर्ष कनिष्ठ महाविद्यालयाची बाजी

**विरार/प्रतिनिधी**



वसई विरार शहर महापालिका आयोजित स्वच्छ भारत अभियान २.० आणि स्वच्छता सर्वेक्षण २०२४-२५ अंतर्गत वसई विरार पालिका क्षेत्रात स्वच्छता जनजागृतीच्या संदर्भात स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती. या स्पर्धेमध्ये विरारच्या विष्णू वामन ठाकूर चॅरिटेबल ट्रस्टच्या कै. पांडुरंग रघुनाथ पाटील उत्कर्ष माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. विविध आंतरमहाविद्यालयीन आणि शासकीय स्पर्धांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये या महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन केलेले आहे. महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती मुग्धा लेले, श्रीमती कल्पना राऊत, उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे, प्रा. रमेश पाटील आणि प्रा. हेमा पाटील तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील समन्वय समितीचे सदस्य यांनी अनमोल असे मार्गदर्शन केलेले होते. 'स्वच्छ भारत सुंदर भारत' ही काळाची गरज असल्याचे मत प्राचार्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेच्या सचिव अपर्णा ठाकूर व संस्थेच्या सर्व विश्वस्तांनी कौतुक केले.

31 MARCH TO 06 APRIL 2025 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 3/29/2025 8:48 PM Page 1



## पान १ वरून....

### पैशांवरून दोघांमधील वाद वाढला...

केला, परंतु त्याचा शोध काही लागला नाही. त्याचा मोबाईल ही बंद येत होता. शेवटी बुधवार दि.१९ मार्च २०२५ रोजी त्याचा भाऊ तेजस पवार याने दहिवडी पोलीस स्टेशन गाठून आपला भाऊ योगेश पवार (वय २८) हा बेपत्ता असल्याची तक्रार नोदंवली. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना त्याचा मृतदेह नातेपुतेजवळील फडतरवाडी येथील कालव्यात एका कारमधील मागील सीटवर बेल्टने बांधलेल्या अवस्थेत मिळाला. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना या घटनेची चक्रावून सोडणारी माहिती पोलीसांना मिळाली. योगेश पवार याचे रोशनी माने हिच्याबरोबर प्रेमसंबंध होते.रोशनी हिच्या घरची परिस्थीती तशी बेताचीच असल्याने तिला सारखी पैशाची गरज लागत होती. योगेश याचे तिच्यावर मनापासून प्रेम असल्याने तो तिला पैशाची मदत करीत होता. दोघे ही प्रेमात आकंठ बुडाले होते. तसे दोघे ही लवकरच लग्न करणार ही होते. परंतु योगेश याच्या घरच्या लोकांना रोशनी हिच्या कॅरेक्टरसंबधी शंका येत होती. तसे योगेश पवार याचा भाऊ तेजस याने तिच्या विषयी चौकशी केली असता तिचे कॅरेक्टर लुज असल्याची माहिती त्यांना मिळाली. तसेच तिचे या पुर्वी लग्न ठरले होते परंतु काही कारणास्तव ते मोडले ही होते याची ही माहिती त्यांना मिळाली असल्याने तेजस याने त्याच्या लग्नाला विरोध दर्शविला होता. रोशनी आणि तिची आई पार्वती माने या दोघी मायलेकींनी अनेकाकडून पैसे ही उकळले होते. पार्वती माने या पैशासाठी काही ही करू शकतात तसा प्रकार योगेशच्या बाबत घडला असावा अशी शंका तेजस याला होती. त्यामुळे त्याने आपल्या घरच्या लोकांना सांगून योगेशला रोशनीपासून लांब राहण्याचा सल्ला दिलेला होता.परंतु योगेशला ती आवडत असल्याने तो तिच्याशी जास्तच जवळीक करीत होता. त्या दोघांचे प्रेमसंबंध हे गेल्या दोन तीन वर्षापासून चालू होते.अलिकडे तर रोशनी ही योगेशकडे सारखे पैशाची मागणी करीत होती. त्यामुळे तो ही तिच्या वागण्यामुळे वैतागलेला होता. त्यातच त्याला त्याच्या घरचे लोक रोशनीपासून लांब राह असे सांगत होते. त्याला ही रोशनी आणि तिच्या आईचा प्रताप समजलेला होता. त्या दोघी ही पैशासाठी कोणाला ही ब्लॅकमेल करू शकतात हे ही त्याला समजले होते. त्यामुळे तो ही त्याच्यापासून लांब राहण्याचा प्रयत्न करीत होता.अलिकडे रोशनी ही त्याला भाव देत नव्हती याचे ही कारण त्याला समजून येत नव्हते. बहुदा तिने आणखी कोणला तरी आपल्या गळाला लावले असावे अशी शंका त्याला येत होती. त्यामुळे त्याने ही तिच्याकडे दुर्लक्ष केले होते. रोशनी ही खालच्या जातीतील असल्याने आता तो ही घरच्याच्या सांगण्याप्रमाणे तिच्याकडे दुर्लक्ष करीत होता.योगेश याच्या घरची परिस्थीती तशी सधन असल्याने मायलेकींना तो बकरा पाहिजेच होता.त्याच्या घरचे लोक त्याला रोशनीशी संबंध ठेवू नकोस असे सांगत होते. त्याला ही अलिकडे त्याच्या घरच्याचे सांगणे पटत होते. रोशनी आणि तिची आई पार्वती या दोघी योगेश पवार पैशासाठी ब्लॅकमेल करीत होत्या. तरी योगेश हा त्याच्याकडे आपण दिलेले हातउसणे पैसे परत मागत होता. काही झाले तरी त्या दोघी मायलेकी त्याला पैसे परत देण्यास तयार नव्हत्या. या कारणातून त्याचेत नेहमी वाद विवाद आणि भांडण तंटा होत होता. या भांडणाला रोशनी ही वैतागलेली होती. त्यातच योगेश याने आपले पैसे परत मिळाले नाही तर बघून घेण्याची भाषा केली होती. त्यामुळे त्या दोघी ही त्याला तुला आम्ही बलात्कारच्या केसमध्ये अडकतो अशी धमकी देत होत्या.त्याच्यातील वाद विकोपाला गेला होता. त्या मायलेकींनी आपल्या नात्यातील लोकांना योगेश पवार हा आपल्याला पैशासाठी कसा त्रास देत आहे याची माहिती दिली होती. योगेश पवारने रोशनीचा वापर करून घेतला आहे आणि उलट तिच्याशी लग्न न करता पैशाची मागणी करीत आहे आणि तो विनाकारण त्रास देत आहे असे सांगून नातेवाईकांना योगेश याचा कायमचा कसा काटा काढला पाहिजे या विषयी विचार विनिमय केला. योगेश याला मारण्याचा त्यांनी प्लॅन करून त्याला मारून त्याच्या मृतदेहाची कशी विल्हेवाट लावायची आणि आपल्या अंगावर काही येणार नाही याची दक्षता ते घेणार होते. मंगळवार दि.१८ मार्च २०२५ रोजी रोशनी हिने योगेश पवार याला त्याच्या मोबाईलवर फोन केला. त्याला नरवणे येथे येवून तुझे पैसे घेऊन जा असे सांगितले. आपले पैसे परत मिळणार म्हणून योगेश हा संध्याकाळच्या सुमारास घरातून बाहेर गेला. तो नरवणे गावच्या बाहेर रोशनीने बोलविलेल्या ठिकाणी आपल्या कारने गेला. तेथे अगोदरच चार पाच जण एका झाडा आड दबा धरून बसले होते. याची जरा ही भणक योगेशला आली नाही. योगेश कार घेऊन आल्याचे पाहून रोशनी ही पुढे आली. ती त्याच्याशी काही तरी बोलत असताना तिची आई पार्वती या देखील तेथे आल्या.त्या दोघी पैशाच्या कारणातून त्याच्याशी वाद घालत असताना दबा धरून बसलेले चार जण तेथे आले. त्यांनी रोशनी आणि पार्वती माने याची बाजू घेत योगेशशी वाद घालायला सुरूवात केली. त्यातील तीघेजण बहुदा भरपुर दारू प्यालेले होते. तुझे पैसे परत मिळणार नाहीत तुला काय करायचे ते कर जा असे त्यांनी योगेशला म्हटले. योगेशने रोशनीला दिलेली रक्कम ही लाखाच्या घरात होती. त्यामुळे तो सहजा सहजी आपले पैसे सोडणार नाही हे त्या मायलेकींना ही माहित होते त्यामुळे भांडणात पार्वती माने यांनी योगेशला तुला रोशनीचे शरीर वापरताना काही वाटले नाही आणि आता पैसे परत मागतोस काय? असे म्हणत योगेशच्या शर्टाच्या कॉलर पकडली. त्याचेवेळी त्या चौघांनी योगेशला कारमधून ओढून बाहेर काढले. त्याच्या मानेवर, हातावर, पोटावर आणि गळवयावर आपल्याकडील धारदार हत्याराने वार केले. त्या वारात योगेश हा ओरडत खाली पडला. त्याच्या शरीरारातून मोठया प्रमाणात रक्त स्त्राव होत होता. रात्रीचा अंधार ही पडत चालला होता. त्या माळरानावर त्याच्या शिवाय कुणी ही नव्हते. योगेश हा रक्ताच्या थारोळ्यात जमीनीवर पडला त्याचा जागीच मृत्यु झाला होता. आता त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट कशी लावायची याचा ते विचार करीत होते त्याचा खून करून तो अपघात वाटावा असा त्यांनी विचार केला. त्या चौघापैकी एकाला ड्रायव्हिंग येत होते. मृत योगेशचे शरीर त्यांनी त्या कारच्या मागच्या सीटवर बेल्टने बांधून ठेवले. त्याला त्या कारमध्ये घेऊन दहिवडी मार्गे ते नातेपुते जवळील फडतरवाडी गावाच्या हद्दीत एका कालव्याजवळ ते आले. ती कार त्यांनी चालू करून त्याच्या मृतदेहासह त्या कालव्यात सोडली आणि तेथून मिळेल त्या वाहनाने रात्री परत गोंदवले येथे आले. इकडे मंगळवार दि.१८ मार्च रोजी संध्याकाळी कार घेऊन गेलेला आपला भाऊ योगेश हा परत घराकडे आला नाही म्हणून तेजस पवार हा त्याचा शोध घेत होता. दुसऱ्या दिवशी त्याने दहिवडी पोलीस स्टेशन गाठून आपला भाऊ योगेश सुरेश पवार (वय २८) हा कारसह बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. दहिवडी पोलीस ठाण्याचे स.पो.नी दतात्रय दराडे यांनी त्याचा शोध घ्यायला सुरूवात केली असता नातेपुते जवळील फडतरवाडी येथील कालव्यात एक कार पडली असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. पोलीसांनी घटनास्थळी धाव घेत जेसीबीच्या सह्याने त्या कालव्यातून कार बाहेर काढली असता त्या कारमध्ये मागच्या सीटवर योगेश पवार याचा मृतदेह बांधलेल्या स्थीतीत आढळून आला.त्या कारचे दरवाजे लॉक केलेले असल्याने पोलीसांनी ते लॉक तोडून त्याचा मृतदेह बाहेर काढून पंचनामा केला.मयत योगेश पवार याच्या शरीरावर धारदार हत्याराने वार केल्याचे ही दिसत होते. पोलीसांनी या घटनेची माहिती मयत योगेश पवार याचा भाउ तेजस याला दिली. तो ही घटनास्थळी आला. पोलीसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी नातेपुते येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची माहिती तेजस पवार याच्याकडून पोलीसांनी घेतली असता मयत योगेश पवार याचे रोशनी माने हिच्याशी प्रेमसंबंध असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. तसेच योगेश याने रोशनी हिला पैशाची मदत केली असल्याने ते पैसे परत देण्यावरून त्याचेत वाद होत असल्याची ही माहिती पोलीसांना मिळाली. मयत योगेश याचे शेवटचे मोबाईल कॉल डिटेल्यस काढले असता त्याच्या मोबाईलवर रोशनी माने हिचा फोन आल्याचे पोलीसांना दिसत होते. यावरून पोलीसांनी रोशनी माने तिची आई पार्वती माने यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले असता त्या दोघी ही पोलीसांना उडवा उडवीचे उत्तरे देऊन त्याची दिशाभूल करीत होते पोलीसांनी त्या दोघीना महिला पोलीसाकरवी बोलते केले असता त्यांनी आपला गुन्हा मान्य करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती देवून आपल्या इतर चार सहकार्याची नावे सांगितली. त्यांनी दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी त्याच्या इतर साथीदारांचा शोध घेऊन त्यांना ही ताब्यात घेतले. त्यांनी ही आपला गुन्हा कबुल केला. या घटनेची फिर्याद तेजस पवार याने दहिवडी पोलीसात दिल्याने पोलीसांनी त्याच्या फिर्यादीवरून योगेश सुरेश पवार (वय २८) याच्या खून प्रकरणी रोशनी विठ्ठल माने (वय २५) तिची आई पार्वती विठ्ठल माने (वय ४८) आणि त्याच्या इतर साथीदारा विरूध्द भा.दं.वी. कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. त्यांना दहिवडी येथील कोर्टासमोर पोलीसांनी उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलले हत्यार जप्त केले. या घटनेचा पुढील तपास दहिवडी पोलीस करीत आहेत.

### सुट्ट्या पैशांसाठी गल्ला उघडणे प्राणघातक ...

चांगला चालत नाही. नवीन जागा नवीन व्यवसाय असल्याने आणि ग्राहकांना नयना पानपुरी ची पुरेशी माहिती नसल्याने धंदा चालत नसावा असा अंदाज मनीष पाल बांधत होता. येणाऱ्या दिवसात नक्कीच पाणीपुरीचा व्यवसाय जोमाने चालू होईल असा त्याचा आत्मविश्र्वास होता. हातात कला असलेल्या आणि पाणीपुरी बद्दलची सर्व माहिती असलेला मनीष पाल आपल्या पाणीपुरी व्यवसायावर लक्ष केंद्रित करून होता. काही दिवसात त्याच्या पाणीपुरी व्यवसायाला चांगली दिवस आले. दिवसभरात जेमतेम हजार बाराशे रुपये कमवू लागला. कमाई होत असल्याने मनीष पाल देखील उत्साहाने काम करू लागला. दररोज सकाळी ९ ते १० वाजण्याच्या सुमारास पाणीपुरीचा गाडा लावणे व रात्री ९ वाजण्याच्या सुमारास बंद करणे असा त्याचा नित्यनेम ठरला होता. १४ मार्च २०२५ रोजी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास दोन अज्ञात तरुणांनी लुटमार करत नयना पानपुरी चालकाला चाकूने भोसकले असल्याची माहिती एमआयडीसी पोलीस ठाण्याला मिळाली. माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन घटनास्थळाकडे धाव घेतली. हरंगुळ स्टेशन समोरच असलेल्या पाण्याच्या टाकी जवळ नयना पानपुरी चा काढा रस्त्यावर अस्ता व्यस्त पडला होता. गाड्या भोवती बरीच झटापट झाल्याच्या खुणा जाणवत होत्या. एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांनी घटनास्थळावर उपस्थित असलेल्या लोकांना अधिक विचारपूस करत घटनेची प्राथमिक माहिती जाणून घेतली. अज्ञात दोन तरुणाच्या हल्ल्यात जखमी झालेल्या पाणीपुरी विक्रेता मनीष पाल याला उपचारासाठी दवाखान्यात नेल्याचे माहिती समोर आली. दरम्यान घटनास्थळाला लातूर शहर उपविभागीय पोलिस अधिकारी रणजीत सावंत, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांनी घटनास्थळाला भेट देत अधिक माहिती जाणून घेतली. पुढील कारवाईसाठी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांनी मनीष पाल उपचार घेत असलेल्या शासकीय रुग्णालयात धाव घेतली. मात्र उपचारादरम्यान मनीष पाली यांचे निधन झाल्याचे वैद्यकिय अधिकाऱ्यांनी पोलियांनी सांगितले. शासकीय रुग्णालयात मयत मनिष पाल याची मावशी, काका व अन्य नातेवाईक आले होते. दरम्यान एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांनी त्यांच्या नातेवाईकांना भेट देत अधिक माहिती जाणून घेतली. मयताचा भावाने फिर्याद दिल्यावरून पोलीस ठाणे एमआयडीसी लातुर येथे गुरन १८२/२०२५ कलम १०३(१),३११,३ (५) भारतीय न्याय संहीता प्रमाणे अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अप्पर पोलीस अधीक्षक अजय देवरे, लातूर शहर उपयोगाय पोलिस अधिकारी रणजीत सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाचे सर्व सूत्र एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांच्या हाती देण्यात आले. तपासाचे चक्र गतिमान करत एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांनी या खून प्रकरणातील प्राथमिक माहिती घेण्यास सुरुवात केली. पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यातील पोलिसांचे चार पथक तयार करुन त्यांना सखोल मार्गदर्शन व सुचना करुन तात्काळ आरोपीच्या मागावर रवाना केले. दरम्यान एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांना १४ मार्च रोजी रात्री १२ वाजण्याच्या सुमारास लातूर रेल्वे स्टेशन कडे जाणाऱ्या रस्त्यावर काही अज्ञात तरुण वाहन चालकाला अडवण्याचा प्रयत्न करत असल्याची गुप्त माहिती मिळाली. बहुतेक हा वाटमारीचा प्रकार असावा असा अंदाज बांधून पोलीस निरीक्षक सुधाकर धडे यांनी एक पोलिसांचे पथक लातूर रेल्वे स्टेशन कडे रवाना केली. घटनेचे गांभीर्य ओळखून लातूर रेल्वे स्टेशन परिसरात रवाना केलेल्या पोलीस पथकाला अज्ञात दोन तरुण रस्त्यावर दहशत पसरवत असल्याचे दिसले. पोलीस पथकांनी त्यांना ताब्यात घेऊन अधिक विचारपूस केली असता ते मादक पदार्थाच्या व्यसनी असलेले तसेच सराईत गुन्हेगार असल्याचे समोर आले. त्यांच्याकडे अधिक विचारपूस करून हरंगुळ रेल्वे स्टेशन भागात रात्री वाटमारी करणारे कोणी गुन्हेगार गेले होते का याबद्दल माहिती विचारली असता त्यांनी दोन संशयित तरुणांची नावे सांगितली. यावरून एमआयडीसी पोलिसांनी तपासाचे चक्र गतिमान करत लातूर शहरातील कपिल नगर भागात असलेल्या वेगवेगळ्या दोन घरावर पहाटे चार वाजण्याच्या सुमारास छापा मारून दत्ता संजय ढोरमारे ( वय २० वर्षे, राहणार कपील नगर लातुर) व आयान अब्दुल शेख ( वय २० वर्षे, राहणार कपील नगर लातुर) या दोन संशयता आरोपींना अटक केली. दोघांना एमआयडीसी पोलीस ठाण्यात हजर करत त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी सुरुवातीला असमाधानकारक उत्तरे दिली. त्यांना विश्वासात घेऊन अधिक विचारपूस केली असता त्यांनी विसंगत माहिती देण्यास सुरुवात केली. अखेर पोलिसी खाक्या दाखवतात त्यांनी आपल्या गन्ह्याची कबुली घेऊन सांगण्यास सुरुवात केली. दि.१४ मार्च रोजी संध्याकाळच्या सुमारास दत्ता संजय ढोरमारे व आयान अब्दुल शेख हरंगुळ रेल्वे स्टेशन येथे गेले होते. रेल्वे स्टेशनवर असलेल्या वयस्कर लोकांना गंडवण्याचा त्यांचा हेतू होता. दत्ता ढोरमारे आणि आयान शेख हे मादक पदार्थाच्या व्यसनी गेलेले होते. दररोज लातूर शहरात भुंटी चोरी वाटणारी करून त्यातून मिळालेल्या पैशातून ते आपले भौतिक सुखची तलफ भागवत होते. हरंगुळ स्टेशनवर बराच वेळ थांबून ही दत्ता ढोरमारे व आयान शेख यांना कुठलेच सावज मिळाला नाही. हाताश झालेली हे दोघे परत येत होते. दरम्यान हरंगुळ रेल्वे स्टेशन पासून पुढे आल्यानंतर पाण्याच्या टाकीजवळ एक पानपुरीचा गाडा त्यांना दिसला. आयन शेख याला पाणीपुरी खावी वाटत असल्याने त्यांनी दत्ता ढोरमारे याला पाणीपुरी खाऊ घालण्यास गळ घातली. पाणीपुरीचा धंदा आटोपून निघालेल्या मनीष पाल याला गाठुन या दोघांनी पाणीपुरी देण्यास सांगितली. दोघांनी एक- एक प्लेट पाणीपुरी घेतली. पानपुरी खाल्यानंतर मनीष पाल्याच्या हातात वीस रुपये टिकवले. पंधरा रुपये ला प्लेट असल्याने मनीषनी आणखीन दहा रुपयाची मागणी या दोघांकडे केली. मात्र आमच्याकडे एवढीच पैसे असल्याचे सांगून या दोघांनी मनीष पाल याला दमदाटी करण्यास सुरुवात केली. मनीष पाल यांनी माघार घेत वीस रुपये आपल्या गल्ल्यात टाकले. मनीष पाल यांने गल्ला उघडताच गल्ल्यावर या दोघांची नजर पडली. तात्काळ दत्ता ढोरमारे यांनी डायरेक्ट गल्ल्यात हात घालून पैसे हिसकवण्याचा प्रयत्न केला. मनीष पाल याला ही गोष्ट लक्षात येताच त्याने विरोध करण्यास सुरुवात केली. तेव्हा आयान शेख यांने मनीष पाल याला पाठीमागून धरले. या तिघात बरीच झटापट झाली. उंचा पुरा असलेला मनीष पाल दोघांना भारी पडत असल्याकारणाने दत्ता ढोरमारे यांनी आपल्या कमरेत लपवून ठेवलेला चाकू बाहेर काढत मनीष पाल यांच्या हातावर वार केला. तरीही मनीष पाल याचा विरोध संपत नसल्याने अखेर त्यांनी आपल्या हातातील चाकू मनीष पाल याच्या पोटात खूपसला. धारदार चाकूचा वार पोटात लागल्याने मनीष पाल जमिनीवर कोसळला. त्याच्या अंगातून रक्ताच्या धारावाहू लागल्या. एवढ्या क्षणातच दत्ता ढोरमारे व आयान शेख यांनी मनीष पाल यांच्या गल्ल्यातील सर्व रक्कम व त्याचा मोबाईल हिकावून पोबारा केला. पुढे हे दोघे हरंगुळ रेल्वे स्टेशन पासून ते पाच नंबर चौकात आले. पाच नंबर चौकातून त्यांनी एका दारू दुकानातून दारू खरेदी केली. पुढे त्यांना त्याच्या ओळखीचा मित्र भेटला. नंतर या तिघांनी गांजा खरेदी करत गांजा ओढल्या. व ते आपल्या घरी निघुन गेले. पोलिसांनी या खून प्रेरणाच्या तपासात आरोपीने गुन्ह्यात वापरलेले हत्यार, रक्तानी माखलेले कपडे जप्त केले असून पुढील तपास एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे हे करत आहेत. सदरची कामगीरी पोलीस अधिक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधिक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी (लातुर शहर) रणजीत सावंत यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे एमआयडीसी चे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे, सपोनि. द्रोनाचार्य, नेटके, पोउपनि मोरे, राजपुत, सफौ बेल्लाळे,जगताप पोलीस अंमलदार दामोदर मुळे, कांबळे, भोसले, प्रशांत ओगले, राजू मस्के, साखरे, माने, सोनकांबळे, वायगावकर, बुजारे, वाहुळे, जाधव, महिला पोलीस अमलदार चव्हाण यांनी केलेली आहे.

## पान ८ वरून....

### मांडवी पोलीस ठाण्याच्या नव्या...

असेही पांडे यांनी सांगितले. पोलीस आयुक्तालयाचे ट्विटर खाते पुढील काही दिवसात सुरू केले जाईल असेही ते म्हणाले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय हजारे यांनी या इमारतीच्या निर्मितीसाठी केलेल्या प्रयत्नांचे त्यांनी कौतुक केले. नुकत्याच आयुक्तालयातील ४३१ पोलीस कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली. त्यात ३७७ पोलीस अंमलदारांना पदोन्नती देण्यात आली आहे. त्यापैकी ५१ पोलीस अंमलदारांचे सहाय्यक पोलीस उप निरीक्षक ते श्रेणी पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती झाली आहे. तसेच ११७ पोलीस अंमलदार यांची पोलीस हवालदार ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक तसेच ०५ पोलीस अंमलदारांची पोलीस नाईक ते पोलीस हवालदार पदोन्नती झाली आहे. २५८ पोलीस अंमलदारांची पोलीस शिपाई ते पोलीस हवालदार अशी पदोन्नती झाली आहे. या सर्वांचा स्टार ओपनिंग सोहळा आयुक्तांच्या हस्ते पार पडला.

### सहकारी बँकेतील घोटाळे 'आरबीआय' ...

बँकांना सरकारी अभय मिळते परंतु सहकारी बँका या दुर्लक्षित का आहेत? त्यांना न्याय का मिळत नाही असे सवाल त्यांनी उपस्थित केले. यासाठी समाजधुरीण व बँकेच्या ठेवीदारांनी आता एकत्र येऊन लोक वर्गणीतून हे क्षेत्र वाचवण्यासाठी एकत्रित कायदेशीर लढाई केली पाहिजे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक ट्रस्टच्या अध्यक्षा सौ. जयश्री सामंत यांनी तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन पायस मच्याडो ह्यानी केले. यावेळी न्यू इंडिया को-ऑप. बँकेचे माजी संचालक व कामगार नेते मार्कुस डाबरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सभेसाठी वसईतील सहकार क्षेत्रातील अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

### नाशिक अर्धकुंभ मेळाच्या पार्श्वभूमीवर ...

विविध मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक वाढण्याची शक्यता आहे. विशेषतः पालघर जिल्ह्याचा हा महामार्ग धार्मिक, व्यापारी आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचा असल्याने त्याचा विकास अत्यावश्यक आहे. सध्या या महामार्गाची परिस्थिती अत्यंत खराब असून, वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. अपघातांचे प्रमाण वाढत असून, नागरिकांना व वाहनचालकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. खासदार डॉ. सवरा यांनी या मार्गाच्या दुरुस्ती व चौपदरीकरणासाठी आवश्यक निधी तत्काळ मंजूर करण्याची विनंती केली आहे. यासंदर्भात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन लवकरच आवश्यक कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिले आहे.

### पालघर जिल्हा परिषदेचा ७६.५४ कोटी...

शिक्षण - ७.८५ कोटी (९% हिस्सा, ६८% वाढ). जिल्हा परिषद शाळा दुरुस्ती, शौचालय व संरक्षक भिंती दुरुस्ती- २ कोटी. नवीन योजना : इस्रो भेट (६ लाख), कब-बुलबुल योजना (१० लाख). आरोग्य- ५.०५ कोटी (६% हिस्सा, ४८% वाढ). प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्र दुरुस्ती - ५० लाख. नवीन योजना : कर्करोग व ॲनिमिया प्रतिबंधक योजना (५७.५० लाख), किशोरवयीन मुलींसाठी ॲनिमिया तपासणी (२० लाख). महिला व बालविकास- ३.३७ कोटी (४% हिस्सा, २९.६१% वाढ). नवीन योजना : सॅनिटरी पॅड व वेंडिंग मशीन बसविणे (३० लाख), अंगणवाडी केंद्रांसाठी खेळणी खरेदी (३० लाख). कृषी - ४.०८ कोटी (५% हिस्सा, १७% वाढ). नवीन योजना : महिला किसान शक्ती पंख योजना (१७ लाख), बांबू लागवड (२० लाख).पशुसंवर्धन - ४.२७ कोटी (५% हिस्सा, ३% वाढ), नवीन योजना : भटके कुत्रे निर्बिजीकरण (१ कोटी), शेतकऱ्यांना कुक्कुटपालनासाठी हॅचरी उपलब्ध करून देणे (२० लाख). दिव्यांग कल्याण - १.२८ कोटी (५% हिस्सा, २१.९% वाढ), नवीन योजना : इलेक्ट्रिक ट्रायसायकल योजना (१५ लाख), दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी वारली पेंटिंग प्रशिक्षण (५ लाख). लघु पाटबंधारे - ४.५३ कोटी (६% हिस्सा, ४४% वाढ). कोल्हापूर पद्धती बंधारे दुरुस्ती- १.५० कोटीयावेळी अर्थसंकल्प सादर करताना मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी योग्य नियोजन केल्यास विहित मुदतीत सर्व योजना प्रभावीपणे राबवता येतील. सर्व निधी नियमानुसार खर्च होऊन जनसामान्यांना त्याचा लाभ मिळावा, याकडे विशेष लक्ष द्यावे. असे निर्देश दिले. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे यांनी जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांनी विकासकामांसाठी समर्पित राहण्याचा संकल्प करत 'विकासाप्रती कटीबद्ध होऊया' असा संदेश यावेळी दिला. प्रकल्प संचालक डॉ. रूपाली सातपुते यांनी उमेदच्या महिलांना कलागुणांना वाव देण्यासाठी भरीव निधी मंजूर केल्याचे सांगितले. तसेच, आरोग्य विभागात महिलांच्या ॲनिमिया समस्येवर विशेष लक्ष देऊन त्यासाठी स्वतंत्र तरतूद करण्यात आल्याबद्दल समाधान व्यक्त केले.मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज पांडे यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली गेल्या तीन वर्षांत अर्थसंकल्पाच्या रकमेमध्ये जवळपास ३० कोटींची वाढ झाल्याचे नमूद केले.पालघर जिल्हा परिषदेकडून शासनाकडील ५१.३४ कोटींच्या प्रलंबित निधीसाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. हा अर्थसंकल्प जिल्ह्यातील बांधकाम, आरोग्य, शिक्षण आणि कृषी क्षेत्रात मोठा बदल घडविण्यास मदत करेल. असा विश्वास देखील व्यक्त करण्यात आला.यावेळी जिल्हा परिषद वित्त विभागाचे आणि इतर विभागाचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

### पालकमंत्र्यांच्या हस्ते सायबर सुरक्षित ...

किंवा www.cybercrime.gov.in या संकेतस्थळावर आपली तक्रार नोंदवावी, असे आवाहन पाककमंत्री गणेश नाईक यांनी केले. प्लास्टिक मुक्त आणि दुर्गंधी मुक्त पालघर मोहिम यशस्वी करण्यासाठी सर्व नागरिकांनी आपला परिसर स्वच्छ ठेऊन दुर्गंधीमुक्त करावा. या मोहिमेअंतर्गत रस्त्या लगत असलेल्या दुकानांच्या मालकांसोबत चर्चा करण्यात येणार असून रस्त्या लगत होणाऱ्या कचरा व दुर्गंधी यावर उपाययोजना करण्यात येणार आहे. या योजनेमध्ये भरीव योगदान देणाऱ्यांना बक्षीस देण्याचे नियोजन करण्यात येणार असल्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी सांगितले. सात कलमी कार्यक्रमाअंतर्गत पालघर पोलीस दलांनी प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल गणेश नाईक यांनी पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांचे अभिनंदन केले. यावेळी सायबर सुरक्षा विषयी जनजागृती करणाऱ्या चित्ररथाचे लोकार्पण पालकमंत्री श्री. नाईक यांच्या हस्ते झाले.

### नाणे येथील जिल्हा परिषद ...

संजय मळेकर , रोटरी क्लब ऑफ मनोर हायवेचे चार्टर्ड प्रेसिडेंट विलास पाटील साहेब, जि.प.माजी अध्यक्षा सुवर्णाताई पाटील, जिजाऊ संस्थेचे वाडा तालुका अध्यक्ष कैलास पाटील, युवा चळवळीचे ज्ञानेश्वर घरत, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेश पाटील, उपाध्यक्षा कस्तुरी पाटील, डॉ. प्राची राहुल पाटील तसेच नाणे येथील ग्रामस्थ, महिला, आजी-माजी विद्यार्थी, शिक्षक आणि पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदरच्या कार्यक्रमाचे स्वागत शिक्षिका दिपाली खिलारे यांनी, शिक्षिका सुचित्रा ठाकरे यांनी आभार व्यक्त केले तर रांगोळी व इतर सजावट शिक्षिका योगिता घोलप व सान्वी पाटील यांनी केली.

### आदिवासी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण...

भौतिक सुविधांच्या उपलब्धतेसाठी प्रकल्पांतर्गत ७ शालेय इमारती, १ मुलांचे वसतीगृह व १३ मुलींच्या वसतीगृहांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. तसेच धरती आबा योजनेंतर्गत ७ मुलांचे वसतीगृह बांधकामास मंजूरी प्राप्त झाली असून या वसतीगृहाचे काम लवकरच पूर्ण करण्यात येईल. शैक्षणिक संस्थेच्या इमारतीचे लोकार्पण होणे हे जिल्हयाच्या प्रगतीसाठी सकारात्मक पाऊन असून जिल्हयातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रवाह हा अखंड वाहत राहणार असल्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी सांगितले. प्रधानमंत्री आवासयोजनेअंतर्गत पालघर जिल्हयामध्ये मोठ्या प्रमाणात गरजूंना घरकूल प्राप्त झाले आहे. पालघर जिल्हयातील दुर्गम भागामध्ये रोजगार निर्मितीसाठी स्थानिक ठिकाणी विविध कंपन्यांना आमंत्रित करण्यात येणार आहे. दुर्गम भागामध्ये उद्योग स्थापन करणाऱ्या कंपन्यांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध सवलती लागू करण्यात येतील. वाढवण बंदर जगातील १० उत्कृष्ट बंदरांपैकी एक बंदर असणार आहे. वाढवण बंदराच्या जवळच बुलेट ट्रेनचे स्टेशन असणार आहे. तसेच बंदराच्या जवळ आठ पदरी महामार्ग नाशिक निर्माण करण्यात येणार आहे. या बंदराच्या जवळ आधुनिक पध्दतीचे विमानतळ देखील होणार आहे. या विमानतळावरून येत्या पाच वर्षामध्ये विमानाचे उड्डाण होणार आहे. ७५ लाख कोटीच्या माध्यमातून सी पोर्ट होणार आहे. हा प्रकल्प होत असतांना विस्तापित होणारे स्थानिक तसेच प्रकल्पासाठी योगदान देणारे स्थानिक यांचे पुर्नवसन पूर्ण करण्यात येणार आहे. स्थानिक नागरिकांनी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनास सहकार्य केल्यास जिल्हयाचा विकास अधिक गतीने होईल असा विश्वास पालकमंत्री गणेश नाईक यांनी व्यक्त केला. पालघर जिल्हयाच्या विकासामध्ये जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी प्रशासकीय योगदान दिल्याबद्दल पालकमंत्री गणेश नाईक यांनी त्यांचे अभिनंदन केले.

### सोनाळे येथे सादर झाले बातलावणी...

केले जाते.मृत व्यक्तीच्या आठवणी या संगीताच्या रूपाने लोकांसमोर गायनाच्या ओव्यांच्या माध्यमातून मांडले जाते. बस्तावन जाईवा जाईवा या संगीत नाटिके मध्ये ही संपूर्ण बातलावणी काय आहे, हे दाखवण्यात आल होत. आदिवासी समाजातील एका शेतकऱ्याची कथा यामध्ये दिली आहे. विचार करायला भाग पाडणारी ही कथा आहे.पालघर जिल्ह्यामध्ये मनोर कोंढान, दामखिंड विक्रमगड, देहर्जा, जव्हार, मोखाडा खोडाळा ,अशा अनेक ठिकाणी या बात लावणीची प्रथा परंपरा अजूनही कायम ठेवली आहे. परंतु अनेक ठिकाणी ही बातलावणी काळच्या ओघामध्ये जाताना दिसत आहे. त्यामुळे तरुणांनी एकत्र येऊन ती प्रथा लोकांमध्ये जाऊन टिकवून ठेवण्याचे काम आजचे हे तरुण करत आहेत.

क्राईम संध्या | सोमवार दि. ३१ मार्च २०२५ ते रविवार दि. ६ एप्रिल २०२५ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ७

# जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा मनोज रानडे यांनी स्वीकारला पदभार!

**पालघर/प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून मनोज रानडे यांची नियुक्ती झाली असून काल दिनांक २६ मार्च रोजी संध्याकाळी ६.०० वाजता त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून पदभार स्वीकारला. मावळते मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी त्यांच्याकडे पदभार सोपवला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, प्रकल्प संचालिका डॉ. रूपाली सातपुते आणि सर्व विभाग प्रमुख, गट विकास अधिकारी यांनी त्यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी सर्व विभाग प्रमुख आणि गटविकास अधिकारी यांच्याशी परिचय करून त्यांच्या कामाचा थोडक्यात आढावा घेतला. प्रशासन आणि महसूल क्षेत्रातील व्यापक अनुभव असलेल्या रानडे यांची ही नियुक्ती जिल्ह्यासाठी महत्त्वपूर्ण मानली जात आहे. प्रशासकीय कारकीर्द आणि परिचय मनोज रानडे हे M.Sc (Agriculture) पदवीधारक असून त्यांनी आपल्या प्रशासकीय सेवेत विविध महत्त्वाची पदे भूषवली आहेत. त्यांनी उपविभागीय




अधिकारी (रत्नागिरी), जिल्हा पुनर्वसन अधिकारी (सिंधुदुर्ग), उप जिल्हाधिकारी (ठाणे) व महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या मानव संसाधन विभागात कार्यकारी संचालक म्हणूनही जबाबदारी सांभाळली आहे. महसूल, पुनर्वसन, जनगणना तसेच आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. २०१३ मध्ये उत्तराखंड राज्यात आलेल्या महापुराच्या वेळी महाराष्ट्र मुख्यमंत्र्यांच्या वतीने त्यांनी मदतकार्य केले होते, ज्याबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. २००२, २००४, व २०११ मध्य उत्कृष्ट उपजिल्हाधिकारी म्हणून गौरवण्यात आले आहे. उपविभागीय अधिकारी असताना रत्नागिरी जिल्ह्यातील ७/१२ संगणकीकरणाचे काम पूर्ण करण्यास त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. मनोज रानडे यांनी जुलै २०१६ ते नोव्हेंबर २०१९ या कालावधीत महसूल व सार्वजनिक बांधकाम मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचे 'खाजगी सचिव' म्हणून जबाबदारी सांभाळली. २०१९ पासून उपायुक्त सामान्य प्रशासन कोकण भवन या पदावर ते कार्यरत होते. यावेळी विधान परिषद निवडणुका, तसेच कोविड कालावधीत कोकण विभागातील समन्वयाचे काम त्यांनी केले आहे. नवनिर्मित नगरपरिषदांमध्ये तत्कालीन ग्रामपंचायतीच्या पात्र कर्मचाऱ्यांच्या समावेशनाबाबत विभागीय स्तरापर्यंतचे समावेशन पूर्ण करून राज्यस्तरावरील ३४९ पदांचा अधिसंख्य पद निर्मितीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला. नागरी क्षेत्रातील पी.एम. गती शक्ती, पंतप्रधान आवास योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान, पी.एम. व स्वानिधी योजना यामध्ये त्यांनी उत्कृष्ट काम केले आहे. पालघर जिल्हा परिषद येथे रुजू होण्याआधी मनोज रानडे यांनी संचालक नगर परिषद म्हणून ऑगस्ट २०२३ ते आज पर्यंत काम करताना महाराष्ट्र नगर परिषद राज्यसेवा सह वर्गातील १७८२ पदे भरण्याच्या अनुषंगाने २०२४ मध्ये टीसीएस मार्फत यशस्वीपणे परीक्षा पार पाडून नियुक्त्या दिल्या. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर काम करताना ग्रामीण विकास, शिक्षण, आरोग्य, कृषी, जलसंधारण आणि पायाभूत सुविधा सुधारणे यावर त्यांचा विशेष भर असेल. आदिवासी आणि दुर्गम भागातील योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि डिजिटल प्रशासनाला चालना देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू, अशा भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या. त्यांच्या कार्यकाळात जिल्हा परिषद अधिक गतिमान आणि कार्यक्षम होईल.

# भिवंडीत इमारतीचे प्लास्टर कोसळून ६ महिन्याच्या चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू





**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहरातील नागाव परिसरात असलेल्या अन्सारी अपार्टमेंटच्या तळमजल्यावरील खोलीच्या छतावरील प्लास्टर कोसळून सहा महिन्याच्या चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. दुर्दैव म्हणजे ही घटना १७ मार्च रोजी घडल्यानंतर आजपर्यंत त्याची वाच्यता कोठे ही झाली नसल्या बद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे. नागाव परिसरातील सागर हॉटेलसमोर मालमत्ता क्रमांक ३१४२/० ही असगर अली मोहरम अली व हैदर अली मोहरम अली यांच्या मालकीची इमारत असून या इमारतीच्या तळमजल्यावर शमीम अन्सारी हा कुटुंबीयांसह भाड्याने राहत होता. त्याठिकाणी पत्नी शमा परवीन शमीम अन्सारी व सहा महिन्याचा चिमुरडा शोएब हे घरात पलंगावर झोपले असताना अचानक छतावरील स्लॅबचे प्लास्टर पडल्याने त्याचा जबर मार लागल्याने दोघे ही गंभीर जखमी झाले. त्यांना खाजगी रुग्णालयात दाखल केले असता उपचारा दरम्यान शोएब हा मयत झाला.तर आई शमा परवीन या जखमी झाल्या आहेत. या दुर्दैवी घटनेमुळे भिवंडी शहरातील जुन्या आणि धोकादायक व अनधिकृत इमारतीं वर कारवाई करण्यात पालिका प्रशासन करीत असलेल्या हलगर्जीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाला आहे. या घटने बाबत स्थानिक शांतीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनायक गायकवाड यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी या घटने बाबत अपघाती मृत्यूची नोंद केली असून कोणाविरोधाततक्रार नसल्याने गुन्हा नोंदवण्यात आला नसल्याची माहिती दिली. विशेष म्हणजे या घटनेची माहिती पालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षाला अथवा स्थानिक प्रभाग समिती कार्यालयाला नसल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

## उत्तन समुद्र किनाऱ्यावरील अनधिकृत दर्गा हटविणार; महसूल मंत्र्यांचे आदेश!

**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

भाईंदर पश्चिमेकडे उत्तन गावातील समुद्र किनाऱ्याजवळील भागातील कांदळवन नष्ट करून अनधिकृत पणे दर्गा उभारण्यात आली आहे. अनधिकृतपणे उभारण्यात आलेली दर्गा हटविण्याचे आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. भाईंदर पश्चिमेकडे उत्तन गाव परिसर आहे. या परिसरात समुद्र किनाऱ्याजवळच्या भागात कांदळवन तोडून त्या ठिकाणी दर्गा उभारण्यात आला होता. हा दर्गा कोणत्याही प्रकारची परवानगी न घेताच अनधिकृत पणे उभारण्यात आला होता. राष्ट्रीय सुरक्षितेतच्या दृष्टीने घातक असलेल्या दर्ग्याची तक्रार भाजपचे विधानसभा निवडणूक अध्यक्ष रवी व्यास यांनी गेल्यावर्षी तत्कालीन उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच ठाणे जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त, महापालिका आयुक्त यांच्याकडे केली होती. त्यानंतर अपर तहसीलदार निलेश गौंड यांनी दर्गा समितीला दर्ग्याचे अनधिकृत बांधकाम काढून टाकण्यात यावे अशी नोटीस बजावली होती. नुकताच झालेल्या अधिवेशनात ही आमदार निरंजन डावखरे यांनी देखील या दर्ग्याच्या संदर्भात सभागृहात प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाला महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी उत्तर देताना अनधिकृतरित्या १ हजार २९० चौरस मीटर जागेवर अतिक्रमण करून बांधण्यात आलेला दर्गा हटविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## वसईत विवा कट्ट्यावर शहीदांना 'संगीत आदरांजली'चे समर्पण!



**वसई/प्रतिनिधी**

हुतात्मा स्मारक, पापडी येथे ७० व्या विवा कट्ट्यावर होलिकोत्सव विशेष म्हणून करोओकेवर हिंदी मराठी गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सुरवातीस शहिद दिनानिमित्त स्वातंत्र्यसैनिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. होळीनिमित्त सुरांची रंगपंचमी खेळण्यासाठी कराओके संगीत व्यवस्थेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात मकरंद आणि हर्षद या सावे बंधुंनी मेरा रंग दे बसंती चोला या गीताने करुन शहिदांना आदरांजली वाहिली. यानंतर सुरांची उधळण करताना अनेक मराठी भक्तिगीते, भावगीते सादर झाल्यावर हिंदी गीतांचे सादरीकरण झाले. प्रसिद्ध डॉक्टर विजय शिरीशकर यांनी जब दिप जले आना व कोई सागर दिल को बहलाता नही, माजी स्थायी समिती सभापती संदेशभाऊ जाधव यांनी वो शाम कुछ अजीब थी, चार्टर्ड अकाउंटंट अनादी भसे यांना रोजा जानेमन आणि इश्क में हम तुम्हे क्या बताये हि कव्वाली, कोठावळे यांनी सखीमंद झाल्या तारका, शिल्पा पाटील यांनी हे चांदणे फुलांनी शिंपीत रात्र आली, महेश राऊत यांनी तोच चंद्रमा नभात व गुलाबी आंखे, राहूल पाटील यांनी लाखो है यहां दिलवाले, मनाली आचार्य यांनी पिया तु अब तो आजा, ड. सुनिल चौबळ यांनी तेर मेरे सपने अब एक रंग, आनंद नाईक यांनी सांज ढले गगन तले, हर्षद सावे यांनी भोले ओ भोले आणि पल पल दिल के पास, सचिन करवीर यांनी हंसीनी ओ हंसीनी, इंद्रजीत बंडोपाध्याय यांनी मेरे सपनो की रानी कब आयेगी तु, प्रनोती पाटील यांनी का रे दुरावा, सविता पाटील यांनी जब छाये मेरा जादू कोई बच ना पाय आणि रेशमांच्या रेघांनी ही लावणी, रविंद्र परांजपे यांनी ऐसा मौका फीर कहा मिलेगा, प्रीती म्हात्रे यांनी नाविका रे वारा वाहे रे, आणि मकरंद सावे व अनादि भसे या वर्गमित्रांनी बने चाहे दुश्मन जमाना हमारा हे गीत गाऊन आपली मैत्री सांगितली. प्रकाश वनमाळी व स्वाती जोशी यांच्या सहकार्याने झालेल्या या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन विरेंद्र पाटील यांनी केले तर प्रस्तावना व आभार मकरंद सावे यांनी मानले.

## उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. बच्छाव यांचा 'राजमाता जिजामाता'तर्फे सत्कार



**लातूर** : पुणे येथील महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण संचालनालयाचे सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव यांचा लातूरच्या राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातर्फे पुष्पगुच्छ व शाल देऊन संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षा के.ए. जायभाये, संस्थेच्या सहसचिव तथा तुळजाभवानी प्राथमिक विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, तुळजाभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य जी.आर. मुंडे उपस्थित होते. उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. बच्छाव यांनी प्राचार्य केंद्रे यांच्यासोबत नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासह अन्य विविध शैक्षणिक उपक्रमांबाबत चर्चा केली. यावेळी उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## तलासरीत आठ लाखांचा गुटखा पकडला

**तलासरी** : गुजरात राज्यात तसेच केंद्रशासित दादरा नगरहवेली भागातून गुटख्याची वाहतूक होत असते. दररोज शेकडो गुटख्याच्या गाड्या महाराष्ट्रात प्रवेश करत असतात. तलासरी पोलिसांकडून रात्री १२ च्या सुमारास गुजरात राज्यातून भिवंडी येथे परचुरण मालाच्या आड लपवून गुटखा घेउन जात असताना वडवली गावाचे हद्दीत दयानंद हॉस्पिटल समोर पकडला यावेळी ७लाख ६२ हजार ७२० गुटख्यासह ३२ लाख ६२ हजार ७२० रु.चा मुद्देमाल जप्त करून एका आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. असगर भुरा अली, ४६ वर्षे, रा.ग्राम खान पुरघाटी, जि.नूहु मेवात, असे आरोपीचे नाव आहे.

# गॅस पाईपलाईनजवळ अनधिकृत उत्खनन, तिघांवर गुन्हा दाखल!

**वाडा/प्रतिनिधी**

तालुक्यातील खरीवलीतर्फ पौलबारे या गावाच्या हद्दीतून रिलायन्स या कंपनीची गॅस पाईपलाईन गेली असून या पाईपलाईनजवळ अनधिकृत उत्खनन केल्याप्रकरणी तीन इसमांविरोधात वाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई महसूल विभागाने केली आहे. या कारवाईमुळे पाईपलाईन जवळ अनधिकृत उत्खनन करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. संदिप बुदांराम पाटील, संदिप पुंडलिक पाटील, व्यवस्थापक मेसर्स जि.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.व इतर अशी आरोपींची नावे आहेत. पालघर व ठाणे जिल्ह्यातून रिलायन्स या कंपनीची गॅस पाईपलाईन गेली असून यावाहिनीपासून काही मीटर अंतरावर खोदकाम उत्खनन करण्यास बंदी घातली आहे, असे असताना खरीवली या गावच्या हद्दीत रिलायन्स कंपनीची किंवा महसूल विभागाची



कुठलीही परवानगी न घेता अनधिकृत पंणे उत्खनन केले. उत्खननातील दगड व मातीची चोरी केली करून शासनाचा महसूल बुडवला आहे. तसेच सदर इसमांनी गट नंबर २११ प्रियदर्शनी को ऑप इंड्रस्टीपल इस्टेट या जागेत केलेले उत्खनन, हे रिलायन्स कंपनीच्या गॅस पाईपलाईन पासून २०० मीटर दूर असणे आवश्यक असताना देखील त्यांनी नियमांच्या बाहेर जाऊन अनधिकृतपणे उत्खनन केले आहे. सदर उत्खनन करण्यासाठी त्यांनी ब्लास्टींगचा उपयोग केला आहे. सदर उत्खननामुळे मुळ गॅस पाईपलाईनला धोका उत्पन्न होऊन जिवितहानी होण्याची शक्यता आहे. याची दखल घेत संबंधितावर खानिवलीचे मंडळ अधिकारी तथा फिर्यादी सदानंद भोईर यांनी तक्रार दिल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी आरोपींवर कलम २८७.३०५) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम ४८ खाण आणि खनिज (विकास विनियमन) अधिनियम १९५७ चे कलम २९, पेट्रोलियम आणि मिनरल्स पाईपलाईन ॲक्ट १९६२ कलम १५ प्रमाणे वाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून अधिक तपास सहा. पोलीस निरीक्षक अजित गोळे करीत आहेत. प्रकरणाची पडताळणी करून पुढील कारवाई करू, अशी माहिती तपास अधिकारी अजित गोळे यांनी दिली.

## अपघातग्रस्त नौदल अधिकाऱ्यांच्या मृत्यू

**अंबरनाथ/प्रतिनिधी**

अंबरनाथ पश्चिमेतील कल्याण बदलापूर मार्गावरून लादीनाका येथून जाणाऱ्या एका भरधाव टेम्पोने सायकलस्वारासह रस्त्यावर उभ्या दोन रुग्णवाहिकांना १५ मार्च रोजी जोरदार धडक दिली होती. या अपघातात रुग्णालयात उपचार सुरू असलेल्या जखमी सायकलस्वार निवृत्त नौदल अधिकाऱ्याचा गुरुवारी उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या पोलिसांनी संबंधित टेम्पो चालकाला अटक करत टेम्पोही जप्त केला आहे. कल्याण बदलापूर राज्य महामार्गावरील अंबरनाथ पश्चिमेतील लादी नाका परिसरात अंबर केअर रूग्णालय आहे. या रूग्णालयासमोर भागातून १५ मार्च रोजी पहाटे सव्वा पाच वाजण्याच्या सुमारास नौदलातून नुकतेच निवृत्त झालेले शिवाप्रसाद गौड हे सायकल चालवत होते. यावेळी राज्य महामार्गावरून अंबर केअर रूग्णालयाच्या समोर सायकलस्वार गौड यांच्या मागून आलेल्या एका भरधाव टेम्पोने त्यांना जोरदार धडक दिली. त्यानंतर रूग्णालयाच्या समोर उभ्या असलेल्या दोन रुग्णवाहिकांनाही हा टेम्पो धडकला. या अपघातानंतर टेम्पो चालक घटनास्थळावरून फरार झाला होता. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या शिवाप्रसाद गौड यांना जवळील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र गुरुवारी उपचारांदरम्यान त्यांचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी अंबरनाथ पश्चिम पोलिसांनी फरार टेम्पोचालकाचा शोध घेत भिवंडीतून त्याला अटक करत त्याचा टेम्पो जप्त केला आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या अध्यक्षपदी बालाजी बनसोडे, तर सचिवपदी अमरदीप बोरे



**देवणी** : देवणी येथील बौद्ध समाज मंदिरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अनिल कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली यावेळी देवणी तालुक्यातील बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते जयंती समितीचे अध्यक्ष म्हणून बालाजी शेषराव बनसोडे, तर सचिवपदी अमरदीप विनायकराव बोरे यांची निवड करण्यात आली उर्वरित कार्यकारिणी खालील प्रमाणे उपाध्यक्ष जयभीम तुकाराम देवणिकर, संदीप शिवाजी सूर्यवंशी, कार्याध्यक्षपदी शिंदे आशिष प्रकाशराव, सहसचिव किरण विलास गायकवाड, कोषाध्यक्ष रंजीत भगवानराव गायकवाड, सहकोषाध्यक्ष बोरे भीमदर्शन राजकुमार, सहकोषाध्यक्ष कांबळे आकाश केरबा, मिरवणूक प्रमुख अक्षय मल्हारी शिंदे, प्रशांत ढवळे, विक्रम सांभाळे, विद्यासागर शिंदे, प्रमोद शिंदे, अनिकेत पतंगे, सल्लागार प्रमुख पतंगे देविदास राजाराम, कांबळे अनिल साधुराम, अजय मल्हारी शिंदे, संजय शिंदे, प्रसिद्धीप्रमुख गिरीधर गायकवाड, प्रा.नरसिंग सूर्यवंशी, लक्ष्मण रणदिवे, कार्यकारणी सदस्य गणेश सूर्यवंशी, विशाल घोरपडे, अंबादास गायकवाड, पंकज वाघमारे, संदीप शिंदे, सद्दाम मिर्झा, मल्हारी पतंगे, धम्मदीप सूर्यवंशी, प्रबुद्ध शिंदे यांचा समावेश आहे.

## जव्हार, मोखाड्यातील २१ ग्रामपंचायतींचा वीजप्रश्न निकाली



**जव्हार/प्रतिनिधी**

विजेची समस्या ही जव्हार व मोखाडा तालुक्यातील नागरिकांच्या पाचवीला पुजलेली. पावसाळ्यात तर या तालुक्यात विजेचे दर्शन दुर्मिळच. दरम्यान, जव्हार व मोखाडा तालुक्यातील २१ ग्रामपंचायतीतील नागरिकांनी पालघर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रकाश निकम यांची भेट घेत त्यांना भेडसावणारी विजेची समस्या मांडून ती सोडविण्याकरिता गाऱ्हाणे मांडले. यावर निकम यांनी सकारात्मकता दाखवीत ८४ लाख रुपये निधी मंजूर होऊन कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाली. जव्हार तालुक्यातील ८ ग्रामपंचायती आणि मोखाडा तालुक्यातील १३ ग्रामपंचायत परिसरात कमी दाबाने वीज पुरवठा होणे, जंगल परिसर असल्याने कोठेही विद्युत तार तुटल्यास सलग कित्येक दिवस विद्युत पुरवठा खंडित राहणे, शिवाय मोखाडा तालुक्यातील विद्युत केंद्रावर दोन तालुक्यातील अतिरिक्त भार असल्याने वीज प्रवाह आणि विद्युत दाबात नेहमीच फरक जाणवायचा. मात्र जिल्हा परिषद अध्यक्ष पदाचा कार्यकाळ संपता संपता तरी जीवनावश्यक बाबीची समस्या शेवटी सोडविल्याने २१ ग्रामपंचायतीतील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. आता डहाणू- गंजाड उपकेंद्र मुख्यावाहिणीतून अखंड वीजपुरवठा सुरु राहिला तर उन्हाळा सुसह्य होईल, अशी भाबडी आशा गावकरी बाळगून आहे. जव्हार तालुक्यातील काही ग्रामपंचायतींना मोखाडा विद्युत केंद्रातून वीज पुरवठा सुरू करण्यात येत होता. मात्र कमी दाबाने वीज पुरवठा होणे, दिवसेंदिवस विद्युत खंडित होणे, अशा तक्रारींनी नागरिक बेजार झाले होते. मात्र पालघर जिल्हा परिषदेचे तत्कालीन अध्यक्ष प्रकाश निकम यांना ही समस्या सांगितल्याने त्यांनी गेल्या अनेक वर्षांची समस्या सोडविली आहे, असे झाप ग्रामपंचायतीचे सरपंच यांनी सांगितले.

## भिवंडी गुन्हे शाखेने घरफोडीच्या गुन्ह्यातील १५ लाखांचा महागडा धातू केला जप्त, एकास अटक

**भिवंडी/प्रतिनिधी**




भिवंडी पोलीस उपायुक्त परिमंडळ क्षेत्रातील गोदाम पट्ट्यात मोठ्या प्रमाणावर घरफोडीच्या घटना होत असून अशाच एका घरफोडीच्या गुन्ह्यातील चोरीस गेलेला १५ लाख रुपये किमतीचा महागडा धातू चा मुद्देमाला जप्त करून एका आरोपीस अटक करण्यात भिवंडी गुन्हे शाखेला यश आले आहे. नारपोली पोलिस ठाण्यात ११ मार्च रोजी दाखल घरफोडीच्या गुन्ह्यात गोदामातील १५ लाख रुपये किमतीचा महागडा कार्बाइड इन्सर्ट, टंगस्टन या धातूचे इंडस्ट्रियल टूल्स यांचा ५५० किलो माल चोरीस गेला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास करीत असताना भिवंडी गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक धनराज केदार यांना गुप्त बातमीदाराकडून सदरची घरफोडी चोरी सराईत आरोपी अभिजीत चंद्रकांत टेकळे रा.कात्रज, पुणे याने केली असल्याची माहिती मिळून आली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक जनार्दन सोनावणे यांच्या मार्गदर्शना खाली सहाय्यक पोलिस निरीक्षक धनराज केदार व पोलिस पथकातील सुधाकर चौधरी, राणे, सचिन जाधव, अमोल इंगळे, भावेश घरात, विजय कुंभार या पथकाने आरोपीच्या मोबाईल फोनची तांत्रिक माहिती घेत आरोपी अभिजीत टेकळे यास कात्रज पुणे येथून शिताफिने ताब्यात घेऊन त्याच्या जवळून चोरी झालेला संपूर्ण १५ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात यश आले आहे अशी माहिती गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जनार्दन सोनावणे यांनी दिली आहे.

## शहापूर-मुरबाड बस नियंत्रण सुटल्याने उलटली

शहापूर : मुरबाड एस.टी. बस आगारातून शहापूरकडे निघालेल्या शहापूर आगारातील बसला कुडवली जवळील उतारावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात होऊन बसमधील अनेक प्रवासी जखमी झाले. या जखमी प्रवाशांवर उपचार सुरु आहेत. प्रवाशांना बाहेर काढल्यानंतर बसने पेट घेतला. सुदैवाने जीवितहानी झाली नाही. मुरबाड येथून बुधवारी दुपारी १२ वाजून १० मिनिटांनी शहापूरकडे निघालेल्या बसवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने उताराला जाऊन अपघात घडला. बसमध्ये ७२ प्रवासी प्रवास करत असल्याची प्राथमिक माहिती मिळाली. प्रवाशांनी आरडाओरड केल्याने काही काळ गोंधळ उडाला होता. जखमी प्रवाशांवर मुरबाड येथील शासकीय रुग्णालय तसेच खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

31 MARCH TO 06 APRIL 2025 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 3/29/2025 8:49 PM Page 1



मांडवी पोलीस ठाण्याच्या नव्या इमारतीचे उद्घाटन

# सर्व पोलीस ठाणी लोकाभिमुख करून नागरिकांना चांगली सेवा देण्याचा प्रयत्न - आयुक्त मधुकर पांडे





**विरार/प्रतिनिधी**

मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील पोलीस ठाणे लोकाभिमुख करून नागरिकांना अधिकाअधिक चांगली सेवा देण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी सांगितले. विरार येथील मांडवी पोलीस ठाण्याच्या नव्या वास्तूचे आयुक्तांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्यावेळी त्यांनी पोलीस ठाण्याच्या बदलत्या कार्यशैलीची माहिती दिली. पालघर जिल्हा आणि ठाणे ग्रामीण पोलिसांचे विभाजन करून १ ऑक्टोबर २०20 रोजी 'मिरा भाईंदर वसई विरार' पोलीस आयुक्तालय सुरू करण्यात आले आहे. मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या स्थापनेवेळी १३ पोलीस ठाणी होती. त्यात वाढ करून आता १९ पोलीस ठाणी तयार झाली आहेत. विरार पोलीस ठाण्याचे विभाजन करून मांडवी पोलीस ठाणे तयार करण्यात आले आहे. या पोलीस ठाण्याची नवीन इमारत तयार करून पोलीस ठाण्याचे नूतनीकरण करण्यात आले आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय हजारे यांच्या संकल्पनेतून नव्या इमारतीची निर्मिती करण्यात आली आहे. माजी आमदार राजेश पाटील यांचा आमदार निधी तसेच सामजिक दायित्व निधीतून ही वास्तू तया करण्यात आली आहे. या वास्तूत विविध कक्ष, सभागृहाची निर्मिती करण्यात आली असून पटांगण विकसित करण्यात आले आहे. पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांच्या हस्ते या पोलीस ठाण्याच्या नव्या इमारतीचे एका शानदार सोहळ्यात उद्घाटन करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त दत्तात्रय शिंदे, परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त जंयत बजबळे, सहाय्यक पोलीस आयुक्त बजरंग देसाई, माजी खासदार बळीराम जाधव, वसईचे प्रांताधिकारी शेखर घाडगे, पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. नागरिकांना पोलीस ठाण्याचे कामकाज कसे चालते त्याची माहिती चित्रफितीद्वारे या पोलीस ठाण्यात उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्व पोलीस ठाणी लोकाभिमुख व्हावी, नागरिकांना चांगली सेवा मिळावी यासाठी आमची पोलीस ठाणे प्रयत्नशील असतील असे आयुक्तांनी यावेळी सांगितले. 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय', या महाराष्ट्र पोलिसांच्या ब्रीद वाक्याला स्मरून आम्ही समाजातील सद्प्रवृतींचे रक्षण तसेच अपप्रवृतींवर अंकुश ठेवण्याचा सतत प्रयत्न करत आहेत, ...पान ६ वर

# विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासूनच वाचन वाढवून स्वयं अध्ययन करावे -मंजुषा लटपटे



**अहमदपूर/फिरोज शेख**

विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासूनच अवांतर वाचन वाढवावे. स्वंय अध्ययन करावे. असे आवाहन उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे यांनी येथील संत ज्ञानेश्वर विद्यालयात नीतिमूल्य संस्कार परीक्षेचे प्रमाणपत्र वितरण व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ प्रसंगी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी संस्थेच्या सचिव तथा प्राचार्या रेखाताई हाके-तरडे, प्रमुख अतिथी उपजिल्हाधिकारी मंजुषा लटपटे, नैतिक मूल्य संस्कार परीक्षेचे प्रांताध्यक्ष संतोष कुलकर्णी, तालुका समन्वयक प्रमोद कुलकर्णी, भगवान कुलकर्णी, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख विश्वनाथ विळेगावे, डॉ.कामाक्षी पवार यांच्या सह माता पालक, शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुण्यांना स्काऊट गाईडच्या पथकाने मानवंदना देऊन औक्षण केले. उपस्थित मान्यवरांचा ग्रंथ, शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार व नीती मूल्य संस्कार परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, मेडल, शाल, पुष्पहार देऊन सन्मानित करण्यात आले. उपविभागीय अधिकारी मंजुषाताई लटपटे पुढे बोलताना म्हणाल्या की, ध्येय मोठं ठेवा. मेहनत घ्या. अभ्यासाचे नियोजन करा असे सांगत स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी याविषयी ही सखोल असे मार्गदर्शन केले. यावेळी संतोष कुलकर्णी यांनी भारतीय संस्कृतीचे महत्त्व विशद केले. प्राचार्या रेखाताई तरडे यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक आशाताई रोडगे यांनी केले. सूत्रसंचालन शारदा तिरुके यांनी तर आभार सतीश साबणे यांनी मानले. कार्यक्रमाचा समारोप मोरगे त्रिगुणा यांनी पसायदानाने केला.

# 'जागतिक क्षयरोग दिना' निमित्त महापालिकेची जनजागृती रॅली!



**विरार/प्रतिनिधी**

'जागतिक क्षयरोग दिन' निमित्त सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र येथील कार्यक्षेत्रात महापालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त (वैद्यकिय) यांचे आदेशान्वये जनजागृती रॅली काढण्यात आली. वसई विरार शहर महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील विरार होमिओपॅथी मेडिकल कॉलेज येथे रुग्ण मेळावा घेण्यात आला व त्यामध्ये एक्स-रे, स्फुटम स्वॅब, सॅम्पल, ब्लडप्रेशर व विविध आवश्यक त्या वैद्यकिय चाचण्या करण्यात आल्या. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, बिलालपाडा, आंबेडकरनगर, पाटणकर पार्क, झालावाड व नारंगी यांच्या कार्यक्षेत्रात आरोग्य सुविधा अंतर्गत विविध जनजागृती कार्यक्रम असे, क्षयरोग मार्गदर्शन प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, बिलालपाडा अंतर्गत येणाऱ्या बुलेट ट्रेन बांधकाम कामगारांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. या कार्यक्रमास उद्देशून बोलताना डॉ. भक्ती चौधरी, वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी क्षयरोगाचे लवकरात लवकर निदान व उपचार महानगरपालिके तर्फे देण्यात येणार असून ज्या व्दारे वसई विरार शहर महानरंगपालिका क्षयरोग मुक्त होण्यास मदत होईल. त्याचप्रमाणे कार्यक्षेत्रात अधीका अधीक 'निःक्षय मित्र' व्यावेत असे आवाहान केले आहे.

# सहकारी बँकेतील घोटाळे 'आरबीआय' पुरस्कृत -विश्वास उटगी



**वसई/प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षांत महिन्याकाठी देशात व महाराष्ट्रात सहकारी बँका आर्थिक घोटाळ्यामुळे बंद पडत आहेत. यामुळे बँकेचे भागधारक व विशेषतः ठेवीदार यांना त्याचा मोठा फटका बसत आहे. आरबीआय सहकारी बँकेचे सतत लेखापरीक्षण करत असते तसेच प्रत्येक आठवड्याला व महिन्याला बँकेचे अहवाल आरबीआयला पाठवले जातात, मग हे घोटाळे व त्रुटी आरबीआयच्या लक्षात काय येत नाहीत की जाणूनबुजून त्याकडे दुर्लक्ष केले जाते? बँकीग इतिहासांत आरबीआय नेहमीच महाराज धृतराष्ट्राच्या भूमिकेत कशी? सहकारी बँक बुडली तरी आरबीआयचा कुणीही दोषी कसा ठरत नाही? न्यू इंडिया कॉ-ओप. बँक घोटाळा व संचालक मंडळ व मॅनेजमेंटचा गुन्हा जानेवारी २०20 पासून आरबीआय उच्च पदस्थाना लेखी स्वरूपात कळविण्यात आला होता. त्यामुळे या बँकेच्या घोटाळ्याच आरबीआयचा हात आहे, असे ठेवीदार म्हणाले. तर त्यातच तथ्य आहे हे दिसेल. डीआयसीजीसी ने ५ लाख देणे व पांच लाख वरील रकमेचे शेवटी काय होते. यावर आता न्यायालयाने निर्णय द्यावा, कारण डीआयसीजीसीची भूमिका 'चौकीदार चोर है' अशीच आहे. याचाच अर्थ सदर घोटाळे आरबीआय पुरस्कृत असल्याचा आरोप प्रख्यात अर्थ व बँकिंग तज्ञ विश्वास उटगी यांनी वसई येथे एका सभेत केला. नुकताच न्यू इंडिया कॉ-ओप. बँकेवर १२२ कोटी ची रोख तिजोरीतून काढली गेली हे ईओडब्ल्यूने पकडले. हा तर या देशांतील सर्वांत मोठा गुन्हा आहे. ईओडब्ल्यूने सांगण्यापूर्वी आरबीआयला हे माहीत नाही असे म्हणणे मूर्खपणाचे आहे. आर्थिक अफरातफरीममुळे आरबीआयने निर्बंध लादले आहेत. त्यामुळे ग्राहक व ठेवीदार अडचणीत आलेले आहेत. वसईत बँकेच्या दोन शाखा असून हजारो ग्राहक व ठेवीदार अडचणीत आले आहेत. अशांना मार्गदर्शन करण्यासाठी अर्थतज्ञ विश्वास उटगी ह्याची सभा प्रा. स.गो.वर्टी मेमोरियल ट्रस्ट तर्फे न्यू इंग्लिश स्कूल वसई येथे आयोजित केली होती. सदर सभेला बँकेच्या ग्राहक व ठेवीदारांनी गर्दी केली होती. यावेळी बोलताना सहकारी क्षेत्र हे सध्या राजकारणी व नोकरशाहीचे भ्रष्टाचाराचे कुराण बनले आहे. सतत लेखापरीक्षण करणारी आरबीआयला हे धोके व त्रुटी माहीत असूनही योग्य वेळी कारवाई का होत नाही? सरकारी व प्रायव्हेट ...पान ६ वर

# नाशिक अर्धकुंभ मेळाच्या पार्श्वभूमीवर राज्य महामार्गच्या दुरुस्तीची मागणी



**वाडा/प्रतिनिधी**

नाशिक येथे भरला जाणारा अर्धकुंभ मेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर मनोर-पालघर आणि जव्हार-मनोर मार्गाच्या तातडीच्या विकासाची मागणी खासदार डॉ.हेमंत सवरा यांनी केळी आहे. अर्धकुंभ मेळा २०२७, नाशिक या महत्त्वपूर्ण धार्मिक सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर एनएच-१६०ए (मनोर-पालघर आणि जव्हार-मनोर) या महामार्गाच्या तातडीच्या विकासासाठी खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन मार्गाच्या दुरुस्ती व विस्तारासाठी निधी मंजूर करण्याची मागणी केली. अर्धकुंभ मेळा हा लाखो भक्त, पर्यटक आणि साधू-संतांचे केंद्रबिंदू असलेला ऐतिहासिक सोहळा आहे. नाशिककडे जाणाऱ्या ...पान ६ वर

# पालघर जिल्हा परिषदेचा ७६.५४ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प जाहीर

● शिक्षण, आरोग्य, कृषी व पायाभूत विकासाला गती ● विविध विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणात तरतूद



**पालघर/प्रतिनिधी**

पालघर जिल्हा परिषदेचा ७६ कोटी ५४ लाख रुपयांचा अर्थसंकल्प मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी सादर केला. २०२५-२६ चा मूळ अर्थसंकल्प आणि २०२४-२५ चा सुधारित अर्थसंकल्प जाहीर करण्यात आला असून, गतवर्षीच्या तुलनेत १०.३६% वाढलेला आहे.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक डॉ.रूपाली सातपुते, मुख्य लेखा वित्त अधिकारी धनराज पांडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर जगताप, लेखाधिकारी विकास पाटील तसेच सर्व विभाग प्रमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत हा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. यंदाच्या अर्थसंकल्पात बांधकाम, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, कृषी, पशुसंवर्धन, समाजकल्याण, महिला व बालविकास, दिव्यांग कल्याण आणि लघु पाटबंधारे यासारख्या क्षेत्रांसाठी मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद करण्यात आली आहे.

महत्त्वाचे मुद्दे आणि विभागनिहाय तरतुदी : बांधकाम विभाग- ११.५६ कोटी (१६% हिस्सा, ११.११% वाढ) गावांतर्गत रस्ते व मजबुतीकरण- १.४0 कोटीग्रामीण व जिल्हा महामार्ग विकास -१.२५ कोटी. नवीन योजना : जिल्हा परिषद आवारात सोलर पॅनल उभारणे (५0 लाख), गड-किल्ल्यांचे संवर्धन (८0 लाख), नवीन गाळे बांधकाम (२.५0 लाख), आणि बारमाही रस्ते विकसित करणे (५0 लाख). पाणीपुरवठा - ६.0२ कोटी (९% हिस्सा, ५.६% वाढ). प्रादेशिक नळपाणी योजना देखभाल व दुरुस्ती- १.४0 कोटी. नवीन योजना : प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनांचे एपशीसू ओंवळीं (३ लाख). ...पान ६ वर

# पालकमंत्र्यांच्या हस्ते सायबर सुरक्षित पालघर मोहिमेचा शुभारंभ

**पालघर/प्रतिनिधी**



सायबर फसवणूकीच्या माध्यमातून ऐश्वर्य संपादित करता येत नाही. तरुण पिढीने सुयोग्य मार्गाचा अवलंब करून कष्ट करून ऐश्वर्य संपादित करावे. सुयोग्य मार्गाने मिळालेले ऐश्वर्य कायमस्वरुपी टिकते. तरुणांनी सायबर फसवणूकीपासून सावध रहावे असे, आवाहन वनमंत्री तथा पालघर जिल्हयाचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी केले. आगामी होणारा जनता दरबार दि.७ एप्रिल २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नियोजन सभागृह येथे सकाळी १०.00 वा. आयोजित करण्यात आलेला आहे. नागरिकांनी आपल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी दि.७ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १०.00 वा. लेखी अर्जासह उपस्थित रहावे, असे आवाहन पालकमंत्री गणेश नाईक यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सात कलमी कार्यक्रमाच्या अनुषंगाने सुरु करण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत सायबर सुरक्षित योजनेचा शुभारंभ पालकमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय येथे संपन्न झाला त्यावेळी ते बोलत होते. या यावेळी खा. हेमंत सवरा, आ. विनोद निकोले, आ. हरिश्चंद्र भोये, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अपर जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगरे, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे आदि मान्यवर उपस्थित होते. आपला पिन, ओटीपी, पासवर्ड कोणालाही देऊ नका. आपल्या मोबाईलमध्ये आलेली कोणतीही अनोळखी लिंक मोबाईलमध्ये उघडू नका. अनोळखी फोन कॉल, व्हिडीओ कॉल स्विकारू नका. शेअर व इतर गुंतवणूकींमध्ये त्वरीत मोठा परतावा देणाऱ्या संशयास्पद गुंतवणूकीच्या ॲप्सद्वारे गुंतवणूक करणे टाळावे. जर आपली सायबर फसवणूक होत असल्याचे जाणवल्यास अथवा सायबर फसणूक झाल्यास १९३0/१९४५/१४४0७ या संपर्क नंबरवर कॉल करा ...पान ६ वर

# नाणे येथील जिल्हा परिषद शाळेत संगणक कक्षाचे उद्घाटन



**वाडा/प्रतिनिधी**

२१ व्या शतकात विद्यार्थ्यांच्या शिक्षणात संगणकाला अनन्यसाधारण महत्त्व आहे, हे ओळखून शाळा व्यवस्थापन समिती व रोटरी क्लबचे मेंबर व प्रोजेक्ट चेअरमन डॉ. राहूल नरेश पाटील यांच्या संकल्पनेतून व सततच्या पाठपुराव्यामुळे व रोटरी क्लब ऑफ मनोर हायवे आणि रोटरी क्लब ऑफ मीरा रोड यांच्या सौजन्याने जिल्हा परिषद शाळा नाणे येथील विद्यार्थ्यांना ६ संगणक संच उपलब्ध करून दिले. सदरच्या संगणक कक्षाचे उद्घाटन नुकतेच रोटरी क्लब ऑफ मीरा रोडचे प्रेसिडेंट आनंद भटकळ व रोटरी क्लब ऑफ मनोर हायवेच्या प्रेसिडेंट डॉ. श्रद्धा पावडे यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी क्लब ऑफ दहिसर मुंबईचे राजेंद्रन उन्नीकृष्णन, रोटरी क्लब ऑफ मनोर हायवेचे सेक्रेटरी ...पान ६ वर

# आदिवासी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटीबध्द -पालकमंत्री गणेश नाईक

**पालघर/प्रतिनिधी**



आदिवासी विकास विभागामार्फत कार्यान्वित असलेल्या २९ प्रकल्पांच्या माध्यमातून आदिवासी जनहिताय हे ब्रीद घेऊन आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी दर्जेदार शिक्षण व उत्तम भौतिक सुविधा देण्यासाठी शासन कटीबध्द आहे, असे प्रतिपादन वनमंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी केले. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प डहाणू अंतर्गत असलेल्या शासकीय आश्रमशाळा, कळमदेवी ता. डहाणू येथे प्रत्यक्ष तसेच शासकीय आश्रमशाळा, डोंगारी ता. तलासरी व शासकीय आश्रमशाळा एंबूर ता.जि.पालघर येथील नुतन शालेय इमारतीचे उद्धाटन व विज्ञान केंद्र भूमिपूजन दूरदृष्य प्रणालीद्वारे वनमंत्री तथा पालघर जिल्हयाचे पालकमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते कळमदेवी ता.डहाणू येथे संपन्न झाला त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास खा. हेमंत सवरा, आमदार विनोद निकोले, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, प्रकल्प अधिकारी डहाणू सत्यम गांधी आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. पालकमंत्री गणेश नाईक म्हणाले की, डहाणू प्रकल्पांतर्गत ३३ शासकीय आश्रमशाळांमधून ९ हजार ६0 मुले व ९ हजार १३२ मुली असे एकूण १८ हजार २२१ विद्यार्थी ज्ञानार्जनाबरोबरच उत्तम नागरिकत्वाचे धडे घेत आहेत. दऱ्याखोऱ्यात वास्तव्यास असणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण व उत्तम ...पान ६ वर

# सोनाळे येथे सादर झाले बातलावणी नाट्यविष्कार



**वाडा/प्रतिनिधी**

रेड थ्रेड एंटरटेनमेंट प्रस्तुत बस्तावन जाईवा जाईवा संगीत बात लावणीची एक छोटीशी नाटिका सोनाळे येथील तारपा हॉल येथे सादर करण्यात आली. लेखक दिग्दर्शक सागर भोईर, मार्गदर्शक, चिन्मय केळकर, संगीत दिग्दर्शक शंतनू हेर्लेकर निर्माता श्रीराम चौधरी. यांच्या माध्यमातून एक सुंदर अशी नाटिका सादर करण्यात आली होती. निधनानंतर आदिवासी समाजामध्ये आजही अनेक ठिकाणी बातलावणी केली जाते, व्यक्तीच्या आठवणी या जिवंत करण्यासाठी रात्रीच्या सुमारास बातलावणी केली जाते. ज्यामध्ये गावातील, एक व्यक्ती हातामध्ये अंबाडीची काडी एका तांब्याच्या भांड्यावर ठेवून मेनावरती चिटकवून हाताने सरकवून संगीत निर्माण ...पान ६ वर